**अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.**

**मा.स्थायी समिती सभा क्रमांक : ८**

नगरसचिव कार्यालय

दिनांक : ५/९/२०१४

प्रति,

मा. -------------------------------------

स्थायी समिती, सदस्य

अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.

अहमदनगर महानगरपालिकेची स्थायी समिती **सभा क्र-८ बुधवार दि. १०/०९/२०१४ रोजी दुपारी १.०० वाजता** महानगरपालिका नवीन प्रशासकीय इमारत, औरंगाबाद रोड येथील **मा.स्थायी समिती सभागृहात** खालील विषयावर विचार-विनीमय करण्यासाठी बोलविण्यांत आलेली आहे.

तरी सदर सभेत आपण उपस्थित रहावे हि विनंती.

सही /-

प्र. नगरसचिव,

मा.सभापती साहेब यांच्या आदेशान्वये. अहमदनगर महानगरपालिका.

**बुधवार दिनांक- १०/०९ /२०१४ ची विषय पत्रिका**

| **विषय क्र.** | **विषय सुची** |
|---|---|
| ७६ | मा.स्थायी समिती ठराव क्र.-२ दि.२/६/२०१४ अन्वये मा.स्थायी समिती सभा क्रमांक- ७ दिनांक २३/१०/२०१३ व सभा क्रमांक-८ दिनांक ०१/११/२०१३ रोजीच्या सभेचे कार्यवृत्त कायम करणे. |
| ७७ | मा.स्थायी समिती सभा क्रमांक-१ (अंदाजपत्रक) गुरूवार दिनांक १५/०५/२०१४ , सभा क्रमांक- २ सोमवार दिनांक ०२/०६/२०१४ व सभा क्रमांक- ०३ सोमवार दिनांक १६/०६/२०१४ रोजीच्या सभेचे कार्यवृत्त कायम करणे. |
| ७८ | मा.स्थायी समिती ठराव क्र.४ दि.२/६/२०१४ अन्वये अर्जदार श्री.भारत नानाकराम गुरूनानी दिपक ना. गुरूनानी भोग.- सौ.मनिषा दिलीप गालम , रा. कुष्ठधाम रोड, सावेडी अ.नगर यांना नळ कनेक्शन नसतांना प्रभाग समिती क्र.१ , वॉर्ड क्रमांक ५४, बील क्रमांक १४८ आकारणी केलेली पाणीपट्टी+शास्तीची रक्कम निर्लेखित करण्यांस मंजूरी मिळणेबाबतचा फेरसादर. |
| ७९ | अर्जदार श्री.शंकर निवृत्ती सोनवणे, रा. ओंकर कॉलनी, नागापुर,अ.नगर. यांना नळ कनेक्शन नसतांना प्रभाग समिती क्र.१ ,वॉर्ड क्रमांक ७२, बील क्रमांक ३३८ , पाणीपट्टी रक्कम+शास्ती निर्लेखित करण्यांस मंजूरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट. |
| ८० | अर्जदार श्री. बाबासाहेब बन्सीलाल औटी, रा. घर नं.७८/१ रेणुकनगर बोल्हेगांव २५ नागापुर ,अ.नगर यांना नळ कनेक्शन नसतांना प्रभाग समिती क्र.१ ,वॉर्ड क्रमांक ६९, बील क्रमांक ५०, कर आकारणी पाणीपट्टी रक्कम+शास्ती निर्लेखित करण्यांस मंजूरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट. |
| ८१ | अर्जदार श्रीमती तेरेजा रभाजी पाळदे , रा. डॉन बॉस्को ,अ.नगर यांना ओपन प्लॉट आकारणी प्रभाग समिती क्र.१ ,वॉर्ड क्रमांक ७०, बील क्रमांक १००३, घरपट्टी रक्कम+शास्ती निर्लेखित करण्यांस मंजूरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट. |

| | |
|---|---|
| ८२ | अर्जदार दत्तात्रय भंडारे भोग- श्री.सुधाकर जोशी , रा. बु-हापुर,अ.नगर यांना नळ कनेक्शन नसतांना प्रभाग समिती क्र.२ ,वॉर्ड क्रमांक ९, बील क्रमांक ९७३, पाणीपट्टी रक्कम+शास्ती निर्लेखित करण्यांस मंजूरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट. |
| ८३ | अर्जदार श्री. ओमप्रकाश गौरीलाल खंडेलवाल, रा. बेलदार गल्ली, अ.नगर यांना नळ कनेक्शन नसतांना प्रभाग समिती क्र.३ ,वॉर्ड क्रमांक ४, बील क्रमांक ७३, पाणीपट्टी रक्कम+शास्ती निर्लेखित करण्यांस मंजूरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट. |
| ८४ | मा.स्थायी समिती ठराव क्र.११९ दि.२१/६/२०१३अन्वये अर्जदार श्री.शामसुंदर जी. जग्गी,भागीदार अशोका टुरीस्ट हॉटेल,रा.झेंडीगेट,अ.नगर यांना नळ कनेक्शन नसतांना प्रभाग समिती क्र.३ ,वॉर्ड क्रमांक १०,बील क्र.२७,पाणीपट्टी रक्कम+शास्ती निर्लेखित करण्यांस मंजूरी मिळणेबाबतचा फेरसादर. |
| ८५ | अर्जदार श्रीमती शेख लुतफूरे रहेमान, रा. समिरनगर, अ.नगर यांना नळ कनेक्शन नसतांना प्रभाग समिती क्र.३ ,वॉर्ड क्रमांक ८५, बील क्रमांक २५१, पाणीपट्टी रक्कम+शास्ती निर्लेखित करण्यांस मंजूरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट. |
| ८६ | अर्जदार श्री.शेख असलम यासीन, रा. घर नं.५४/९९, शिरीनबाग,,अ.नगर यांना नळ कनेक्शन नसतांना प्रभाग समिती क्र.३ ,वॉर्ड क्रमांक ८५, बील क्रमांक ६३०, पाणीपट्टी रक्कम+शास्ती निर्लेखित करण्यांस मंजूरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट. |
| ८७ | अहमदनगर महानगरपालिकेचे अहमदनगर शहर पाणी पुरवठा योजना फेज-२ योजने अंतर्गत वसंतटेकडी येथे पंपहाउस बांधणेची अतिरिक्त बार्बीची दरसुची अंतर्गत सदरच्या कामास येणा-या रक्कम रूपये ३४,३३,०९७/- खर्चास मंजूरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट निर्णयार्थ. |
| ८८ | मा.महाराष्ट्र शासन परिपत्रकानुसार रक्त आणि रक्त घटक पुरवठा यासाठी आकारण्यात येणा-या सुधारित सेवा शुल्काबाबतचा ऑफिस रिपोर्ट. |
| ८९ | श्री. श्रीकांत अनारसे, मुख्यलेखापरिक्षक यांचे अर्जानुसार अहमदनगर महानगरपालिकेचे मुख्य लेखा परिक्षक यांना कार्यालयीन कामकाजासाठी स्वतःचे वाहन वापरले बाबत वाहन वापर खर्चाची प्रतिपूर्ती देणेबाबतचा ऑफिस रिपोर्ट. |
| ९० | मा.स्थायी समिती ठराव क्र.१२ दिनांक ०२/०६/२०१४ अन्वये अहमदनगर महानगरपालिका हददीतील पाईपलाईन रस्त्यावरील मनमाड रस्त्याजवळील पुलाचे रूंदीकरण करणेबाबतचा फेरसादर. |
| ९१ | मा.स्थायी समिती ठराव क्र.१० दि.०२/०६/२०१४ अन्वये अहमदनगर महनगरपालिकेचे पाणी पुरवठा विभाग अत्यावश्यक सेवेसाठी कंत्राटी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात कनिष्ठ अभियंता (सिव्हील) व (मॅकेनिकल) या पदांवर तांत्रिक खंड देवुन अटी व शर्ती नुसार सहा महिन्याकरीता मानधनावर केलेल्या संबधितांच्या करारबध्द पुर्ननियुक्तीस कार्योत्तर मंजुरी मिळणेबाबतचा ऑफिस रिपोर्ट. |
| ९२ | मा.स्थायी समिती ठराव क्र.८ दि.२/६/२०१४ अन्वये अहमदनगर महानगरपालिकेचे पाणी पुरवठा विभाग अत्यावश्यक सेवेसाठी कंत्राटी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात पंपचालक, विजतंत्री या पदांवर तांत्रिक खंड देवुन अटी व शर्ती नुसार सहा महिन्याकरिता मानधनावर केलेल्या संबधितांच्या करारबध्द पुर्ननियुक्तीस मंजुरी मिळणेबाबतचा फेरसादर. |

| | |
|---|---|
| ९३ | मा.स्थायी समिती ठराव क्र.५ दिनांक २/६/२०१४ अन्वये अहमदनगर महानगरपालिकेचे पाणी पुरवठा विभाग अत्यावश्यक सेवेसाठी कंत्राटी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात पंपचालक, विजतंत्री व जोडारी या पदांवर तांत्रिक खंड देवुन अटी व शर्ती नुसार सहा महिन्याकरिता मानधनावर केलेल्या संबधितांच्या करारबध्द पुर्ननियुक्तीस मंजुरी मिळणेबाबतचा फेरसादर. |
| ९४ | मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०६(३) अन्वये अहमदनगर महानगरपालिकेचे सन २०१२-२०१३ चे बाबवार जमा- खर्चाचे वार्षिक लेखे, वार्षिक लेख्यांचा गोषवारा व मत्ता- दायित्वे तसेच मुख्य लेखापरिक्षकांचा सन २०१२-२०१३ चा अहवाल व स्थानिक निधी लेखापरिक्षा सन २०११-२०१२ चा लेखापरिक्षा अहवालबाबतचा ऑफिस रिपोर्ट. |
| ९५ | अहमदनगर महानगरपालिकेचे महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियान योजने अंतर्गत अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील मार्केट यार्ड चौक, चांदणी चौक, जुनी महानगरपालिका चौक , काटनेटीक चौक, राज चेंबर चौक, अप्पु हत्ती चौक येथे ट्रॅफिक सिग्नल बसविणेकामी मागविण्यांत आलेल्या कमीचे निविदा दरास मंजुरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट. |

सही /-
प्र. नगरसचिव,
अहमदनगर महानगरपालिका

**सोबत-** १] **विषय क्रमांक- ७६ :-** मा.स्थायी समिती ठराव क्र.-२ दि.२/६/२०१४ अन्वये मा.स्थायी समितीने मागविलेले सभा क्रमांक- ७ दिनांक २३/१०/२०१३ व सभा क्रमांक-८ दिनांक ०१/११/२०१३ रोजीच्या सभेचे ठराव अंमलबजावणीच्या अहवालाची प्रत

२] **विषय क्रमांक- ७७ :-** मा.स्थायी समिती सभा क्रमांक-१ (अंदाजपत्रक) गुरूवार दिनांक १५/०५/२०१४ , सभा क्रमांक- २ सोमवार दिनांक ०२/०६/२०१४ व सभा क्रमांक- ०३ सोमवार दिनांक १६/०६/२०१४ रोजीच्या सभेचे इतिवृत्ताची प्रत

२] **विषय क्रमांक- ७८ ते ९५** च्या टिपणीच्या झेरॉक्स प्रती

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा. स्थायी समिती सभा क्रमांक- ८**

विषय क्रमांक- ७६ बुधवार दि.१०/०९/२०१४

ठराव क्रमांक- ७६ बुधवार दि.१०/०९/२०१४

**प्रस्तावाचा विषय :-** मा.स्थायी समिती ठराव क्र.-२ दि.२/६/२०१४ अन्वये मा.स्थायी समिती सभा क्रमांक- ७ दिनांक २३/१०/२०१३ व सभा क्रमांक-८ दिनांक ०१/११/२०१३ रोजीच्या सभेचे कार्यवृत्त कायम करणे.

**प्रस्तावाचा मजकूर :-** विविध विभागांनी खालीलप्रमाणे तक्ता

| ठराव क्र. | **मा.स्थायी समिती सभा क्र-७ दिनांक २३/१०/२०१३** | विभाग |
|---|---|---|
| १३२ | मा.स्थायी समिती सभा क्रमांक-५ शनिवार दिनांक ३१/०८/२०१३ व मा.स्थायी समिती सभा क्र.६ बुधवार दिनांक २५/९/२०१३ रोजीच्या सभेचे कार्यवृत्त कायम करणे. | नगरसचिव विभाग |
| १३३ | अहमदनगर महानगरपालिकेच्या सन २०१३-२०१४ या वित्तीय वर्षाचे सादर करण्यांत आलेले रूपये २,५८,९२,०००/- पुनर्विनियोजन अंदाजपत्रकास मंजूरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट. | अर्थ विभाग |
| १३४ | अहमदनगर महानगरपालिकेच्या सन २०१३-२०१४ या वित्तीय वर्षाचे सादर करण्यांत आलेले रूपये २,१६,००,०००/- पुनर्विनियोजन अंदाजपत्रकास मंजूरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट. | अर्थ विभाग |
| १३५ | अहमदनगर महानगरपालिकेच्या स्थावर मिळकतीच्या नोंदी अद्ययावत करणेबाबतचे कामासाठी नगररचना विभाग कडील मिळकत व्यवस्थापन विभागाकडील पथकास पुढील सहा महिन्याकरीता मुदतवाढ देणेस व नेमणूक देणेस व त्याकामीचे रूपये २,९६,०००/- मानधन रकमेचे खर्चास मंजूरी मिळणे बाबत ऑफिस रिपोर्ट. | नगररचना विभाग |
| १३६ | अहमदनगर महानगरपालिकेचे मा. पदाधिकारी व अधिकारी यांना स्वतःचे वाहन वापरल्यास सद्यस्थितीत चालू असलेली महानगरपालिकेचे आर्थिक हिताची असल्याने वाहन प्रतिपुर्ती योजना चालू ठेवणे बाबत ऑफिस रिपोर्ट. | पाणी पुरवठा विभाग |
| १३७ | अहमदनगर महानगरपालिकेचे अहमदनगर शहर पाणी पुरवठा वितरण केंद्र वसंतटेकडी येथील मुख्य संतुलन टाकी नुतनीकरण करणेबाबतचा ऑफिस रिपोर्ट. | पाणी पुरवठा विभाग |
| १३८ | अहमदनगर महानगरपालिकेस सन २०१३-२०१४ या आर्थिक वर्षाकरिता अहमदनगर महानगरपालिका दवाखान्यासाठी व रक्तपेढीसाठी लागणारी सर्व प्रकारची औषध, रसायने, वैद्यकीय साहित्य व उपकरणे साहित्य खरेदी कामी मागविण्यांत आलेल्या कमीचे निविदा दरास मंजूरी मिळणे बाबत ऑफिस रिपोर्ट. | स्टोअर विभाग |
| १३९ | अहमदनगर महानगरपालिकेचे कै.बाळासाहेब देशपांडे दवाखाना अत्यावश्यक सेवेसाठी कंत्राटी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात वैद्यकीय अधिकारी यापदी १] डॉ. सौरभ अनिल लिमये, २] डॉ. मनिषा मनोहर गडदे, ३] डॉ. सोनल राजेंद्र दुधेडीया / व्यवहारे यांची दिनांक १३/०८/२०१३ पासून सहा महिन्याकरीता अटी व शर्ती नुसार दरमहा मानधनावर केलेल्या करारबध्द नियुक्तीस कार्योत्तर मंजूरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट. | आस्थापना विभाग |

| | | |
|---|---|---|
| १४० | अहमदनगर महानगरपालिकेचे इलेक्ट्रीक विभाग अत्यावश्यक सेवेसाठी कंत्राटी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात वायरमन यापदी डहाळे सौरभ भाउसाहेब यांची दिनांक २५/९/२०१३ पासून सहा महिन्याकरीता अटी व शर्ती प्रमाणे दरमहा मानधनावर केलेल्या करारबध्द नियुक्तीस कार्योत्तर मंजूरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट. | आस्थापना विभाग |
| १४१ | अहमदनगर महानगरपालिकेचे रक्तपेढी विभाग अत्यावश्यक सेवेसाठी कंत्राटी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात वैद्यकीय अधिकारी तथा रक्त संक्रमण अधिकारी या पदी डॉ. सौ. रूपाली आनंद कुलकर्णी यांची अटी व शर्ती नुसार दिनांक ७/११/२०१३ पासून सहा महिन्याकरीता मानधनावर केलेल्या करारबध्द नियुक्तीस कार्योत्तर मंजूरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट. | आस्थापना विभाग |
| १४२ | अहमदनगर महानगरपालिकेचे रक्तपेढी विभाग अत्यावश्यक सेवेसाठी कंत्राटी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात लॅब टेक्नीशियन या पदी मोरे पल्लवी दगडू यांची अटी व शर्ती नुसार दिनांक २२/११/२०१३ पासून सहा महिन्याकरीता मानधनावर केलेल्या करारबध्द नियुक्तीस कार्योत्तर मंजूरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट. | आस्थापना विभाग |
| १४३ | अहमदनगर महानगरपालिकेचे कै. बाळासाहेब देशपांडे दवाखाना अत्यावश्यक सेवेसाठी कंत्राटी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात वैद्यकीय अधिकारी या पदी डॉ. ज्योती लालासाहेब शिंदे (सोनवणे) यांची अटी व शर्ती नुसार दिनांक २३/९/२०१३पासून सहा महिन्याकरीता मानधनावर केलेल्या करारबध्द नियुक्तीस कार्योत्तर मंजूरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट. | आस्थापना विभाग |
| १४४ | अहमदनगर महानगरपालिकेचे कै.बाळासाहेब देशपांडे दवाखाना अत्यावश्यक सेवेसाठी कंत्राटी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात परिचारीका या पदांवर अटी व शर्ती नुसार दिनांक१३/१०/२०१३ पासून सहा महिन्याकरीता मानधनावर केलेल्या करारबध्द नियुक्तीस कार्योत्तर मंजूरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट. | आस्थापना विभाग |
| १४५ | अहमदनगर महानगरपालिकेचे बांधकाम विभाग अत्यावश्यक सेवेसाठी कंत्राटी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात कनिष्ठ अभियंता (सिव्हील) यापदी अटी व शर्ती नुसार सहा महिन्याकरीता मानधनावर केलेल्या करारबध्द नियुक्तीस कार्योत्तर मंजूरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट. | आस्थापना विभाग |
| १४६ | अहमदनगर महानगरपालिकेचे पाणी पुरवठा विभाग अत्यावश्यक सेवेसाठी कंत्राटी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात पंपचालक व विजतंत्री या पदांवर अटी व शर्ती नुसार सहा महिन्याकरीता मानधनावर केलेल्या करारबध्द नियुक्तीस कार्योत्तर मंजूरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट. | आस्थापना विभाग |
| १४७ | अहमदनगर महानगरपालिकेचे पाणी पुरवठा विभाग अत्यावश्यक सेवेसाठी कंत्राटी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात कनिष्ठ अभियंता (सिव्हील) व (मॅकेनिकल) यापदी अटी व शर्ती नुसार सहा महिन्याकरीता मानधनावर केलेल्या करारबध्द नियुक्तीस कार्योत्तर मंजूरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट. | आस्थापना विभाग |
| १४८ | अहमदनगर महानगरपालिकेचे रक्तपेढी विभाग अत्यावश्यक सेवेसाठी कंत्राटी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात जनसंपर्क अधिकारी , लॅब टेक्नीशियन, स्टाफ नर्स या पदांवर अटी व शर्ती नुसार सहा महिन्याकरीता मानधनावर केलेल्या करारबध्द नियुक्तीस कार्योत्तर मंजूरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट. | आस्थापना विभाग |

मा. स्थायी समिती ठराव क्रमांक- २ दि. ०२/०६/२०१४ अन्वये ठराव पारित खालील नमुद केलेले आहे.

**ठराव :-** मा.स्थायी समिती सभा क्रमांक- ७ बुधवार दिनांक २३/१०/२०१३ व मा. स्थायी समिती सभा क्रमांक- ८ शुक्रवार दिनांक ०१/११/२०१३ रोजीच्या सभेचे कार्यवृत्त कायम करणे बाबत. मा.सभेमध्ये झालेल्या चर्चेनुसार पुढीलप्रमाणे निर्णय घेण्यांत येत आहे.

संबंधीत विभागाकडून सादर केलेले प्रस्ताव ,त्यावर केलेले ठराव, ठरावाच्या करण्यात आलेल्या अंमलबजावणीची कार्यवाही व आजपर्यंतची स्थीती, त्या अनुशंगाने केलेली कामे, याप्रकरणी दा करावयाच्या देयकांची सद्यस्थिती याबाबत सर्व तपशिलवार अहवाल संबंधीत विभागाकडून प्राप्त करून घेण्यात यावा. सर्व अहवाल प्राप्त झाल्यानंतर इतिवृत्तासोबत सादर करावे. त्यानंतर यावर निर्णय घेतला जाईल. सध्या हा विषय तहकुब ठेवावा व माहितीसह सादर करा. सर्व अहवाल प्राप्त होईपर्यंत विषय तहकुब ठेवा. नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

सबब प्रकरण अहवाल मा. स्थायी समिती सभेपुढे सादर.

--**--

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- मागील मा.स्थायी समिती सभा क्र.२ दि.२/६/२०१४ अन्वये हा इतिवृत्त कायम करण्याचा विषय तहकुब ठेवावाआणी संबंधीत विभागांकडून माहिती मागवावी असे ठरले होते. सर्व अहवाल विषय वाचन केले.

मा.श्री. दिप चव्हाण :- मागील मा.स्थायी समितीचे दिनांक २/६/२०१४ च्या संदर्भात माहिती सांगा.

प्र.नगरसचिव श्री. वैदय :- कार्यवृत्त कायम करणेसाठी विषय आल्यानंतर त्या संदर्भात दि.२/६/२०१४ च्या सभेच्या निर्णयानुसार विविध विभागांकडून जे अहवाल आले ते सादर केले आहेत.

मा.श्री.दिप चव्हाण :- विषय क्रमांक ७७ चे कार्यवृत्त काय ?

प्र.नगरसचिव श्री. वैदय :- मागील ३ सभांचे इतिवृत्त दिले आहे.

मा.श्री.दिप चव्हाण :- मा.सभापती साहेब एवढी कागदपत्रे वाचण्यास वेळ पाहिजे असतो.

मा.श्री. अजिंक्य बोरकर :- आयुक्त साहेब मिटींगला हजरच रहात नाही.

मा.उपायुक्त (सा.) श्री. चारठणकर :- साहेबांनी स्वतःचा परिचय करून दिला. औरंगाबाद, उस्मानाबाद , नांदेड, शिर्डी अशा वेगेगळया १० ठिकाणी काम केले. सन १९९१ पासून काम करीत आहे.

मा.श्री. सचिन जाधव :- श्री. चारठणकर साहेब आपल्या महानगरपालिकेत रूजू झाल्याबद्दल व श्री. डागवाले साहेब यांचा दिनांक ०९/०९/२०१४ रोजी वाढदिवसानिमित्त होता. त्याबद्दल दोघांचही अभिनंदन.

मा.श्री. दिप चव्हाण :- दिनांक २/६/२०१४ च्या अनुशंगाने ही इतिवृत्ते मंजूर करतो. पण दिनांक २३/१०/२०१३ च्या वेळेला समिती अस्तित्वात नव्हती दिनांक ०१/११/२०१३ चे ऑफिस रिपोर्ट सर्व विषय मंजूरला मान्यता त्यावेळीच्या कार्यवृत्तला मान्यता देण्यांत येत आहे.

मा.श्री. सचिन जाधव :- मिटींगच्या वेळी ऑडीओ किंवा व्हिडीओ रेकॅडींग व्हायला पाहिजे.

मा.श्री.शेख फैयाज अजिजोद्दीन:- मागील सभेचे कार्यवृत्त कायम करण्यांस मंजूरी देण्यांत यावी.

मा.श्री.अजिंक्य बोरकर :- कार्यवृत्त कायम करण्यांस मंजूरी देण्यांत यावी.

मा.सभापती साहेब :- कार्यवृत्तांच्या संबंधीत प्राप्त अहवाल व समिती सभागृहात झालेल्या चर्चेनुसार स्थायी समिती सभा क्रमांक- ७ दिनांक २३/१०/२०१३ व सभा क्रमांक-८ दिनांक ०१/११/२०१३ रोजीच्या सभेचे कार्यवृत्त कायम करण्यांस सर्वानुमते मंजूरी देण्यांत यावी.

**<u>ठराव :-</u>** मा.स्थायी समिती ठराव क्र.-२ दि.२/६/२०१४ अन्वये कार्यवृत्तांच्या संबंधीत प्राप्त अहवालांचे अवलोकन केले. त्याप्रमाणे स्थायी समिती सभा क्रमांक- ७ दिनांक २३/१०/२०१३ व सभा क्रमांक-८ दिनांक ०१/११/२०१३ रोजीच्या सभेचे कार्यवृत्त कायम करण्यांत येत आहे.

सुचक :- मा.श्री.शेख फैयाज अजिजोद्दीन सही /-

अनुमोदक :- मा.श्री. अजिंक्य बोरकर सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा. स्थायी समिती सभा क्रमांक- ८**

विषय क्रमांक- ७७ बुधवार दि.१०/०९/२०१४

ठराव क्रमांक- ७७ बुधवार दि.१०/०९/२०१४

**प्रस्तावाचा विषय :-** मा.स्थायी समिती सभा क्रमांक-१ (अंदाजपत्रक) गुरूवार दिनांक १५/०५/२०१४ , सभा क्रमांक- २ सोमवार दिनांक ०२/०६/२०१४ व सभा क्रमांक- ०३ सोमवार दिनांक १६/०६/२०१४ रोजीच्या सभेचे कार्यवृत्त कायम करणे.

**प्रस्तावाचा मजकूर :-** मा.स्थायी समिती सभा क्रमांक-१ (अंदाजपत्रक) गुरूवार दिनांक १५/०५/२०१४ , सभा क्रमांक- २ सोमवार दिनांक ०२/०६/२०१४ व सभा क्रमांक- ०३ सोमवार दिनांक १६/०६/२०१४ रोजीच्या सभेचे कार्यवृत्त कायम करणेसाठी मा. स्थायी समिती पुढे ठेविले.

सबब कार्यवृत्त मा.स्थायी समिती सभेपुढे सादर.

--**--

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- मा.स्थायी समिती सभा क्र.-१ दिनांक १५/०५/२०१४ , सभा क्र.- २ दिनांक ०२/०६/२०१४ व सभा क्र.-०३ दि.१६/०६/२०१४ रोजीच्या सभेचे कार्यवृत्त कायम करणेस मंजूरी देणे विषयी कार्यवृत्त आहे.

मा.श्री.दिप चव्हाण :- सभागृहाने मंजुरी दिली. पारगमन गृहीत धरून केलेले आहे. आम्ही जो मंजूर केला तो तसाच आहे. गंगा उदयानची चर्चा बजेट मध्ये केली होती. ॲज इटइज गंगा उदयान संदर्भात २.५ एकर जमीन देउन रूपये ७०,०००/- देतो. रॉयल्टी काय ? रू.७०,०००/- कशाच्या आधारे देता. त्याची कालमर्यादा कमी करा.

मा.सभापती साहेब :- काय उपयोग झाला चर्चा करून.

शहर अभियंता श्री. मगर :- आमच्याकडे ठराव नाही त्यामुळे आम्ही काही करू शकत नाही.

मा.उपायुक्त (कर) श्री. बेहेरे :- त्या प्रकरणावर मी स्वत: शेरा लिहून फाईल दिलेली आहे.

मा.सभापती साहेब :- गार्डन विभाग स्वंतत्र असतानाही बांधकामाकडे का येतो.

मा.उपायुक्त (कर) श्री. बेहेरे :- १०० रू. ची खरेदी असली तरी बांधकामाकडे का जावे लागते.

मा.श्री.दिप चव्हाण :- बजेट मधील माझी याबाबतची चर्चा वाचा.

बजेटच्या मा.स्थायी समितीच्या चर्चेतील पान नं.२८ वाचले.

मा.सभापती साहेब :- आधीच्या प्रस्ताव रद्द केला का ?

उदयान प्रमुख श्री. गोयल :- नाही. गंगा उदयान बी.ओ.टी. वर देणेबाबत जो प्रस्ताव होतो. ती मा.उपायुक्त चा अभिप्राय घेउन फाईल बांधकाम विभागाकडे दिली होती.

मा.अजिंक्य बोरकर :- ते गार्डन हस्तांतर करा.

मा.उपायुक्त (कर) श्री. बेहेरे :- आधीच्या रद्द करून दुसरा द्यावा लागेल.

बांधकाम विभाग श्री. पारखे :- गार्डनचा मूळ प्रस्ताव वाचला.

मा.श्री. दिप चव्हाण :- हा मगर साहेब फाईल का नाही दिली. फाईल येत नाही म्हणजे काय ? कुठे आहे.

शहर अभियंता श्री. मगर :- माझेकडे नाही गार्डन कडे असेल.

मा.सभापती साहेब :- गार्डन सेप्रेट डिपार्टमेंट आहे. बांधकाम विभागचा काय संबंध आहे.

मा.श्री.दिप चव्हाण :- फाईल येउस्तवर काय करायचे.

मा.उपायुक्त (कर) श्री. बेहेरे :- फाईल दिल्यानंतर बघू. रद्द करा असे नाही म्हणणार.

मा.श्री. दिप चव्हाण :- इतिवृत्ताच्या ठरावात काय घेतले ते सांगा. चर्चा फक्त ५ व्या महिन्याची दाखवली.

शहर अभियंता श्री. मगर :- बांधकाम विभागाकडून फक्त वर्क ऑर्डर दिलेली आहे.

मा.उपायुक्त (कर) श्री. बेहेरे :- गार्डनही म्हणते आमच्या कडून झालेले नाही.

शहर अभियंता श्री. मगर :- दि.४/३/२०१४ पासून ३६ महिन्यासाठी वर्कऑर्डर दिलेली आहे.

मा.श्री.दिप चव्हाण :- मा. आयुक्तांची मंजूरी दाखवा.

बांधकाम विभाग श्री. पारखे :- मेंटनससाठी दिले आहे.

मा.श्री.दिप चव्हाण व मा.श्री. सचिन जाधव :- करारनामा व टेंडर वाचून दाखवा.

बांधकाम विभाग श्री. पारखे :- टेंडर वाचून दाखवले शहर अभियंता ठरवतील त्याप्रमाणे रक्कम मनपात भरावी लागेल. मनपाला आवश्यक वाटेल तेव्हा करारनामा रद्द करता येईल. बाग दररोज सकाळी ५.३० ते ८.३० व सांयकाळी ४ ते ८.३० यावेळेत चालू ठेवावी लागेल. तिकीटाचे दर व ३ ते १२ पर्यत २/- रू. व पुढे ५/- रू राहिल.

मा.उपायुक्त (कर) श्री. बेहेरे :- कोणकोत्या कामांसाठी निविदा काढली ते वाचा.

मा.श्री.सचिन जाधव :- टेंडर वाचून द्या.

मा.श्री. दिप चव्हाण :- टेंडर पासून जाउ

बांधकाम विभाग श्री. पारखे :- करारनाम्याच्या अटी शर्ती वाचल्या.

मा.श्री. दिप चव्हाण :- लाईट बिल त्याने भरले का ?

मा.शहर अभियंता श्री. मगर :- ठेकेदाराने

मा.श्री. दिप चव्हाण :- तिकीट कोण घेतो.

मा.श्री. दिप चव्हाण :- तेच घेतात.

मा.श्री.दिप चव्हाण व मा.श्री. अजिंक्य बोरकर :- तो अटी शर्ती प्रमाणे वागत नाही डिझार्डन मधल्या रस्त्याचे त्यानी जॉगींग पार्क करून तो पैसे घेतो स्नेहसंमेलनाचे सुध्दा तो पैसे घेतो. जी खेळणी आहे त्याचे तिथे पैसे घेतले जातात.

मा.श्री. सचिन जाधव :- आपण त्याला मेटेंनसला दिले ते राहू द्या. पण खेळणीचे पैसे घेउ नये.

मा.श्री. दिप चव्हाण :- रॉयल्टीच्या दृष्टीकोनातून विचार करा. अडीच एकर जमीन देउन परत रू.७०,०००/- देउन सुध्दा तो कमर्शीयल वापर करून तो पैसे कमवतो. ही संस्था नाही त्यावर कंट्रोल कोणाचे नाही.

मा.उपायुक्त (कर) श्री. बेहेरे :- या चर्चेच्या अनुषंगाने कारणे दाखवा नोटीस देउन खुलासा घ्यावा.

मा.श्री.दिप चव्हाण :- त्याच्या कायदेशीर बाबी पाहून कार्यवाही करावा. नोटीस देउन जर टेंडर रद्द करता आले तर करा.

मा.श्री. अजिंक्य बोरकर :-  मागील सभेचे कार्यवृत्त कायम करण्यांस मंजूरी देण्यांत यावी.
मा.श्री.शेख फैयाज अजिजोद्दीन :- कार्यवृत्त कायम करण्यांस मंजूरी देण्यांत यावी.
मा.सभापती साहेब :-मा.स्थायी समिती सभा क्र-१ दि.१५/०५/२०१४, सभा क्र.-२ दि.०२/०६/२०१४  व सभा क्र.-०३ दि.१६/०६/२०१४रोजीच्या सभेचे कार्यवृत्त कायम करण्यांस सर्वानुमते मंजूरी देण्यांत यावी.

**ठराव :-** मा.स्थायी समिती सभा क्रमांक-१ (अंदाजपत्रक) गुरूवार दिनांक १५/०५/२०१४ , सभा क्रमांक- २ सोमवार दिनांक ०२/०६/२०१४  व सभा क्रमांक- ०३ सोमवार दिनांक १६/०६/२०१४ रोजीच्या सभेचे कार्यवृत्त कायम करण्यात येत आहे.

सुचक :- मा.श्री. अजिंक्य बोरकर                    सही /-

अनुमोदक :- मा.श्री.शेख फैयाज अजिजोद्दीन        सही /-
ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा. स्थायी समिती सभा क्रमांक- ८**

विषय क्रमांक- ७८ बुधवार दि.१०/०९/२०१४

ठराव क्रमांक- ७८ बुधवार दि.१०/०९/२०१४

**प्रस्तावाचा विषय :-** मा.स्थायी समिती ठराव क्र.४ दि.२/६/२०१४ अन्वये अर्जदार श्री.भारत नानाकराम गुरूनानी दिपक ना. गुरूनानी भोग.- सौ.मनिषा दिलीप गालम , रा. कुष्ठधाम रोड, सावेडी अ.नगर यांना नळ कनेक्शन नसतांना प्रभाग समिती क्र.१ , वॉर्ड क्रमांक ५४, बील क्रमांक १४८ आकारणी केलेली पाणीपट्टी+शास्तीची रक्कम निर्लेखित करण्यांस मंजूरी मिळणेबाबतचा फेरसादर.

**प्रस्तावाचा मजकुर :-** अहमदनगर महानगरपालिका प्रभाग समिती क्र.१ सावेडी वसुली

फेरसादर,

विनंती पुर्वक उपरोक्त विषयान्वये प्रभाग समिती क्र.१ सावेडी वसुली विभागाकडुन फेर रिपोर्ट सादर करण्यात येते की, सावेडी वसुली विभागातील वॉर्ड क्र.५४ बिल क्र.१४८ वर दुकानास आकारण्यात आलेली पाणी पट्टीची रक्कम व सदरील आकारणी रद्द होणेबाबत दि.२०/१०/२००९ व दि.१९/४/२०१२ रोजी इकडेस खरेदीदार यांनी अर्जाद्वारे सौ. मनिषा दिलीप गालम यांनी अर्ज दिलेला आहे. प्रस्तृत प्रकरणी असे दिसुन येते की अर्जदार यांची मिळकत ही मयुर कॉम्प्लेक्स मध्ये दुकान या स्वरूपाची असल्याची दिसते. सदर कॉम्पलेक्स हे तळ घर, तळमजला, पहिला मजला, दुसरा मजला अशा स्वरूपाच्या इमारत असुन त्यामध्ये मिळकत धारक यांचे दुकान तळ मजल्यास असल्याचे दिसुन येते. संपुर्ण इमारतीस घरपट्टी व नळपट्टी कराची आकारणी सन २००३-२००४ या आर्थिक वर्षामध्ये झालेली असुन सदर इमारती नळ कनेक्शनच्या नोंदी संगणकावर करतांना अपार्टमेंट च्या नावे १/२" तीन नळ कनेक्शनची नोंद प्लॅट क्र.३ वर करण्यांत आलेली आहे. सदरची नोंद बिल्डर्सच्या नावाने करण्यात आलेली दिसुन येते ती नोंद संगणकामध्ये करताना तत्कालीन लिपिक यांच्या कडून व संगणक ऑपरेटर यांच्या कडुन नजर चुकीने अर्जदार यांच्या तळ मजल्यास असलेल्या दुकानास नळ कनेक्शन नसताना ही वरील प्लॅट क्र.३ ची नळाच्या आकारणीची नोंद करण्यात आलेली दिसुन येत आहे.

सदर बाबत समक्ष पाहणी अहवाल पाणी पुरवठा विभाग सावेडी पाणी पुरवठा फिटर यांचा दि.१३/५/२०१३ च्या अहवालामध्ये नमूद केल्याप्रमाणे सदर जागेमध्ये नळ कनेक्शन नसल्याचे दिसून येत आहे. त्यानंतर जा.क्र.सा.प्र.वि. पी.ए. १९७६ दि.३०/१/२०१३ अन्वये देण्यांत आलेल्या आदेशाप्रमाणे सदर जागेची पाहणी दि.३०/७/२०१३ रोजी प्रभाग अभियंता,प्रभाग अधिकारी, प्रभाग समिती क्र.१ यांच्या पाहणी अहवालामध्ये सुध्दा नळ कनेक्शन नसल्याचे आढळुन आलेले आहे. वर नमुद केल्याप्रमाणे पा.पु.विभाग फिटर यांच्या प्रमाणे पाहणी समिती यांच्या अभिप्राय नुसार व पाहणी अहवालानुसार मा.उपायुक्त (कर), व मा.आयुक्त साहेब यांच्या आदेशान्वये सदरच्या नळाच्या आकारणी मुळ रक्कम सन २०१३-२०१४ अखेर रू.५०,९४३/- व त्यावर आकारलेली दरमहा २% शास्ती रू.३१२५३/- मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम १५२ नुसार रक्कम निर्लेखित करण्याबाबत मा.स्थायी समिती यांच्या कडे प्रस्ताव सादर केलेला होता.

तथापि दरम्यानच्या काळात मनपाची सार्वत्रिक निवडणूक व आचारसंहिता असल्याने सदरच्या प्रस्तावावर निर्णय होवु शकला नाही. परंतु अर्जदार सौ. गालम हया मनपाच्या सार्वत्रिक निवडणूकीमध्ये उमेदवार असल्याने व त्यांचे उमेदवार अर्जासोबत जोडावयाच्या ना हरकत प्रमाणपत्रामध्ये मनपाची काही थकबाकी नसल्याबाबत ना हरकत प्रमाणपत्र आवश्यक असल्याने त्यांचेकडील असलेली थकबाकी रक्कम रूपये ८२,२००/- पावती क्र.एएस /३१६८२ दि.१३/११/२०१३ अन्वये भरून घेवुन ना हरकत प्रमाणपत्र देण्यात आलेले आहे.

परंतु सौ. गालम यांचकडे नळ कनेक्शन नसतांना आकारण्यात आलेली पाणीपट्टी रक्कम शास्तीसह निर्लेखित करणे बाबतचा प्रस्ताव दि.२/६/२०१४ ने मा. स्थायी समिती सभे पुढे निर्णयास्तव आला असता. त्याबाबत मा.स्थायी समिती सभा क्र.२ विषय क्र.४ चर्चा होवुन फेर अहवाल सादर करण्याबाबत कळविले आहे. वरीलप्रमाणे झालेल्या पारित ठरावानुसार सौ.गालम यांनी थकबाकी पोटी भरलेली रक्कम व पाणीपट्टी सन २०१४-२०१५ च्या करापोटी वजा करावयाची रक्कम वजा जता निव्वळ परतावा दयावया बाबतची माहिती खालील प्रमाणे देण्यांत येत आहे.

| | |
|---|---|
| पाणीपट्टी करापोटी जादा भरलेली रक्कम | रूपये ४८,२५०/- |
| २ % दंडात्मक करापोटी भरलेली रक्कम | रूपये ३१२५३/- |
| एकूण रक्कम | रूपये ७९५०३/- |
| सन २०१४-२०१५ या वर्षाचा मालमत्ता कर व सन २००८-२००९ ते सन २०१४-२०१५ अखेर वसुल करावयाची जनरल पाणीपट्टीची रक्कम | रूपये २६९३/-<br>रूपये १७५०/-<br>एकुण रू. ४४४३/- |
| जादा भरलेली एकुण रक्कम वजा सन २०१४-२०१५ चा मालमत्ता कर व सन २००८-२०१५ वसुल करावयाची जनरल पाणीपट्टीसह | रूपये ७९५०३/-<br>रूपये ४४४३/- |
| निव्वळ परतावा दयावयाची एकुण रक्कम | रूपये ७५,०६०/-<br>अक्षरी रूपये पंच्याहत्तर हजार साठ फक्त |

वरील अहवालानुसार प्रस्ताव मान्यतेस्तव सविनय सादर.

येणेप्रमाणे प्रभाग अधिकारी क्र.१ यांचा अहवाल असे.

यावर मा.उपायुक्त (कर) यांचा अभिप्राय की, मे. स्थायी समिती सभा ठराव क्र.४ दि.२/६/२०१४ नुसार उक्त प्रकरणी रक्कम निर्लेखित करणेच्या फेरप्रस्ताव सादर करणेत असे म्हटले आहे. त्यानुसार उक्त प्रस्ताव मे. स्थायी समिती सभेसमोर फेरसादर करावा. असे मत आहे मे. आदेशार्थ स. सादर.

यावर मा.आयुक्त साहेब यांचा अभिप्राय की, नमूद इमारतीत किती नळ कनेक्शन आहेत ? तपशील सादर करावा.

यावर प्रभाग अधिकारी क्र.१ यांचा अभिप्राय की, फेरसादर सदर प्रकरणी मा.आयुक्त सो. यांच्या दिनांक १२/०८/२०१४ रोजीच्या आदेशानुसार सावेडी पाणीपुरवठा फिटर यांच्या समक्ष पहाणी अहवालानुसार मयुर कॉम्प्लेक्स कुष्ठ धाम रोड सावेडी या ठिकाणी सद्यस्थितीत ३/४" इंची एक नळ कनेक्शन चालु आहे. तरी आदेशार्थ मान्यतेस्तव सादर.

यावर मा.आयुक्त साहेब यांचा अभिप्राय की, नमूद अहवालाचे अवलोकन केले. तसेच समक्ष चर्चाही केली. त्यानुसार प्रस्तावीत केलेप्रमाणे मान्यता देणेत येते. नमूद विषयी मे.स्थायी समितीकडे प्रस्ताव पाठवावा.

सबब प्रकरण मा. स्थायी समिती सभे पुढे सादर.

--**--

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- अर्जदार सौ.मनिषा दिलीप गालम यांनी पाणीपट्टी+शास्तीची रक्कम निर्लेखित करण्यांस मंजूरी मिळणे विषयी फेरप्रस्ताव आहे.

मा.श्री.अजिंक्य बोरकर :- फेरसादर वाचून दाखवा. ऑफिस रिपोर्ट सभेमध्ये वाचून दाखविण्यात आला.

मा.श्री.सचिन जाधव :- फेरसादर कशासाठी केले.

मा.श्री. दिप चव्हाण :- शास्तीमाफीचा अधिकार आपल्याला नाही म्हणून फेरसादर केले.

प्रभाग अधिकारी क्र. १ श्री. तडवी :- सौ. मनिषा गालम रू.८२२००/- भरले , ४८,२५०/-+२% दंडापोटी रू.३१२५३/- त्यांना रू.७५०६०/- परतावा देणेबाबत प्रस्ताव ठेवला आहे.

मा.श्री.दिप चव्हाण :- आपण कुणाला परतावा दिलेला आहे का? दंडात्मक करापोटी भरलेली रक्कम रू.३१२५३/- माफ करता येते का ?आयुक्तांनी काय लिहिल ते वाचा.

मा.उपायुक्त (कर) श्री. बेहेरे :- आयुक्तांनी पुर्ण कामा करिता रिपोर्ट सादर केला आहे.

मा.श्री.दिप चव्हाण :- चालू वर्षात रक्कम किती निर्लेखित होती.

मा.सभापती साहेब :- सन २०१४-२०१५ च्या कराची रक्कम वजा करून उर्वरीत परतावा देण्यास मंजूरी देण्यांत येत आहे.

मा.श्री.कुमार वाकळे :- ऑफिस रिपोर्ट निर्लेखित मंजूर करावा.

मा.श्री. शेख फैयाज :- ऑफिस रिपोर्ट निर्लेखित मंजूर करावा.

मा. सभापती साहेब :- ऑफिस रिपोर्टमध्ये नमूद निर्लेखित करण्यांस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येत आहे. शास्ती निर्लेखीत करण्याचा अधिकार स्थायी समितीला नसल्याने त्याबाबत निर्णय प्रशासकीय पातळीवर घेण्यात यावा.

**ठराव :-**अर्जदार श्री.भारत नानकराम गुरूनानी दिपक ना. गुरूनानी भोग.- सौ.मनिषा दिलीप गालम , रा. कुष्ठधाम रोड, सावेडी अ.नगर यांना नळ कनेक्शन नसतांना प्रभाग समिती क्र.१ , वॉर्ड क्रमांक ५४, बील क्रमांक १४८ वर आकारणी केलेली फक्त पाणीपट्टीची रक्कम निर्लेखित करण्यांस मान्यता देण्यात येत आहे. अर्जदार यांचेकडून येणे असलेला सर्व कर परताव्याच्या रकमेतून वजावट करून उर्वरीत पाणीपट्टीची रक्कम निर्लेखीत करण्यास व विहीत पध्दतीने रकमेचा परतावा देण्यास मान्यता देण्यात येत आहे.

शास्ती निर्लेखीत करण्याचा अधिकार स्थायी समितीला नसल्याने त्याबाबत निर्णय प्रशासकीय पातळीवर घेण्यात यावा.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- मा.श्री.कुमार वाकळे सही /-

अनुमोदक :- मा.श्री. शेख फैयाज सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा. स्थायी समिती सभा क्रमांक- ८**

विषय क्रमांक- ७९ बुधवार दि.१०/०९/२०१४

ठराव क्रमांक- ७९ बुधवार दि.१०/०९/२०१४

**प्रस्तावाचा विषय :-** अर्जदार श्री.शंकर निवृत्ती सोनवणे, रा. ओंकर कॉलनी, नागापुर,अ.नगर. यांना नळ कनेक्शन नसतांना प्रभाग समिती क्र.१ ,वॉर्ड क्रमांक ७२, बील क्रमांक ३३८ , पाणीपट्टी रक्कम+शास्ती निर्लेखित करण्यांस मंजूरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-** अहमदनगर महानगरपालिका प्रभाग समिती क्र.१ सावेडी वसुली

विनंती रिपोर्ट नागापुर वसुली लिपिक वॉर्ड नं.७२ यांजकडून देण्यात येतो की, अर्जदार श्री. शंकर निवृत्ती सोनवणे , वॉर्ड नं.७२ , बिल नं.३३८ ओंकार कॉलनी नागापूरच्या मिळकत ही मोकळी जागा असुन, सदर ठिकाणी नळ कनेक्शन नसताना सुध्दा पाणीपट्टी कर आकारणी केलेली असल्याने रद्द करणेबाबत अर्ज महापालिकेकडे दि.३/९/२०१३ रोजी अर्ज केलेला आहे.

त्याकरीता अर्जदार यांच्या अर्जानुसार व म्यु.पल. पाणीपुरवठा फिटर यांजकडील रिपोर्ट नुसार सदरची मिळकत ही मोकळी जागा असल्याचे व सदर मिळकतीत नळ कनेक्शन नसल्याचे आढळुन आलेल्या रिपोर्टनुसार सदरच्या बिलाची पाणीपट्टी कर निर्लेखित करण्याबाबत मुंबई प्रांतिक मनपा अधिनियम १९४९ मधील कलम नं.१५२ नुसार सदरची सन २०१३-२०१४ अखेर पाणीपट्टी कर रक्कम रूपये सातशे बाहत्तर (रू.७७२/-)+२% दंडात्मक कर रूपये सहा हजार सातशे अठ्ठयाहत्तर (रू.६७७८/-) निर्लेखित करणेस मंजुरीस्तव सविनय सादर.

येणेप्रमाणे वसुली लिपिक यांचा अहवाल असे.

यावर करनिरीक्षक यांचा अभिप्राय की, वॉर्ड क्र.७२ वसुली लिपिक यांचे प्रस्तावानुसार मान्यतेसतव सविनय सादर.

यावर वॉर्ड ऑफिसर यांचा सहमती दर्शक सही

यावर प्रभाग अधिकारी क्र.१ यांचा अभिप्राय की, प्रस्तावानुसार मान्यतेस्तव सादर.

यावर मु.ले.प. यांचा अभिप्राय की, वसुली लिपिक वॉर्ड क्र.७२ व कर निरीक्षक तसेच पाहणी अहवाल यांचे अभिप्रायानुसार मान्यतेस्तव सादर.

यावर मा. उपायुक्त (कर ) यांचा अभिप्राय की, प्रस्तावात नमूद केलेनुसार नळ कनेक्शन नसतांना पाणीपट्टीची रक्कम आकारणी केलेली दिसुन येते. पाहणी अहवाल पाहता प्रस्तावात नमुद केलेली रक्कम + नोटीस फी + दंडात्मक रक्कम माफ करणे बाबत महाराष्ट्र मनपा अधिनियमातील कलम १५२ नुसार रक्कम निर्लेखित करण्यांचे अधिकार मा. स्थायी समितीस असल्याने , निर्णयार्थ तथा आदेशार्थ मा.स्थायी समिती समोर प्रस्ताव ठेवणे उचित सबब आदेशार्थ.

यावर मा.आयुक्त साहेब यांचा सहमती दर्शक सही

सबब प्रकरण मा. स्थायी समिती सभे पुढे सादर.

--**--

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :-अर्जदार श्री.शंकर निवृत्ती सोनवणे  यांनी पाणीपट्टी+शास्तीची रक्कम निर्लेखित करण्यांस मंजूरी मिळणे विषयी प्रस्ताव आहे.

मा.श्री. अजिंक्य बोरकर :- ऑफिस रिपोर्ट  वाचून दाखवा.

त्याप्रमाणे ऑफिस रिपोर्ट सभेमध्ये वाचून दाखविण्यात आला.

मा.श्री. दिप चव्हाण :- शास्तीचे बाबत मी मागेही सांगितले  त्याबाबत कार्यवाही का केली नाही. आम्हाला अधिकार नाही मग आमच्याकडे का ठेवता. पाणी पट्टी निर्लेखित करण्यासंबंधी आम्ही मान्यता देतो.

मा.उपायुक्त (कर) श्री. बेहेरे :- हे प्रस्ताव आधीचे आहेत.

मा.श्री. दिप चव्हाण :- मुळ रक्कम निर्लेखित  करू बाकीचे नाही.

मा.श्री. कुमार  वाकळे  :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.श्री. शेख फैयाज :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.सभापती साहेब :- ऑफिस रिपोर्टमध्ये नमूद केलेली पाणीपट्टी निर्लेखित करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येत आहे.शास्ती निर्लेखीत करण्याचा अधिकार स्थायी समितीला नसल्याने त्याबाबत निर्णय प्रशासकीय पातळीवर घेण्यात यावा.

**ठराव :-** ऑफिस रिपोर्टानुसार अर्जदार श्री.शंकर निवृत्ती सोनवणे, रा.ओंकर कॉलनी, नागापुर,अ.नगर. यांना नळ कनेक्शन नसतांना प्रभाग समिती क्र.१ ,वॉर्ड क्रमांक ७२, बील क्रमांक ३३८ , वरील फक्त पाणीपट्टी रक्कम निर्लेखित करण्यांस मंजूरी देण्यांत येत आहे.

शास्ती निर्लेखीत करण्याचा अधिकार स्थायी समितीला नसल्याने त्याबाबत निर्णय प्रशासकीय पातळीवर घेण्यात यावा.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- मा.श्री. मा.श्री. कुमार  वाकळे          सही /-

अनुमोदक :- मा.श्री. मा.श्री. शेख फैयाज          सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

**मा. स्थायी समिती सभा क्रमांक- ८**

विषय क्रमांक- ८० बुधवार दि.१०/०९/२०१४

ठराव क्रमांक- ८० बुधवार दि.१०/०९/२०१४

**प्रस्तावाचा विषय :-** अर्जदार श्री. बाबासाहेब बन्सीलाल औटी, रा. घर नं.७८/१ रेणुकनगर बोल्हेगांव २५ नागापुर ,अ.नगर यांना नळ कनेक्शन नसतांना प्रभाग समिती क्र.१ ,वॉर्ड क्रमांक ६९, बील क्रमांक ५०, कर आकारणी पाणीपट्टी रक्कम+शास्ती निर्लेखित करण्यांस मंजूरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-** अहमदनगर महानगरपालिका प्रभाग समिती क्र.१ सावेडी वसुली

विनंती रिपोर्ट नागापुर वसुली लिपिक वॉर्ड नं. ६९ यांजकडून देण्यात येतो की, अर्जदार श्री. बाबासाहेब बन्सीलाल औटी वॉर्ड नं.६९ बिल नं.५० येथे माझे मालकी हक्काचे घरामध्ये रहात असुन मी रहात असलेपासुनच सदर जागेमध्ये माझी स्वत:ची खाजगी कुपनलिका (बोअर) घेतलेला आहे. तसेच मी आजपर्यत तत्कालीन बोल्हेगांव ग्रामपंचायतकडे व मनपाकडे नवीन नळ कनेक्शनासाठी मागणी अर्ज केलेला नाही व त्यासाठी कोणतेही डिपॉझीट भरलेले नाही. तरी मी पिण्याचे पाण्याचे नळ कनेक्शन घेतलेले नाही व माझा कुठलाही नवीन नळ कनेक्शन मागणी अर्ज आपणाकडे प्रलंबित नाही. तरी सदर मिळकतीला नळ कनेक्शन नसताना सुध्दा पाणीपट्टी कर आकारणी केलेली असल्याने ती रद्द करणेबाबत.अर्ज मनपाकडे केलेला आहे. तसेच सदर बिलाला पाणीपट्टी आकारणीमुळे आकारण्यात आलेली नोटीस फी, २% दंडात्मक कर रद्द करणेबाबत अर्ज मनपाकडे केलेला आहे.

त्याकरिता अर्जदार यांच्या अर्जाप्रमाणे व म्यु.पल. पाणीपुरवठा फिटर यांजकडील रिपोर्टनुसार सदर मिळकतीत नळ कनेक्शन नसल्याचे आढळुन आलेले आहे.

त्याकरिता मुंबई प्रांतिक मनपा अधिनियम १९४९ मधील कलम १५२ नुसार सदरची पाणीपट्टी कर रक्कम रू.२०,२८९/- + नोटीस फी + २% दंडत्मक कर निर्लेखित करणेस मंजुरीस्तव सविनय सादर.

येणेप्रमाणे वसुली लिपिक यांचा अहवाल असे.

यावर कर निरीक्षक यांचा अभिप्राय की, वसुली लिपिक वॉर्ड क्र.६९ सादर केलेल्या प्रस्तावानुसार दिनांक २६/९/२०१३ रोजी समक्ष जागा पाहणी केली असता मालमत्ता धारक बाबासाहेब बन्सीलाल औटी , रा. रेणुकानगर बोल्हेगांव फाटा यांनी पिण्याचे नळ कनेक्शन घेतलेले आढळुन आलेले असुन मालमत्ता धारक हे बोअरचा वापर करित असल्याचे आढळुन आले असुन तरतुदीनुसार सदर बिलांवरील पाणीपट्टी रक्कम रू.२०२८९/- +नोटीस फी + शास्तीसह निर्लेखित करणेबाबत मान्यतेस्तव सविनय सादर.

यावर रिव्हीजन विभाग यांचा सहमती दर्शक सही

यावर वॉर्ड ऑफिसर क्र.१ यांचा अभिप्राय की, सादर दि.३/९/२००३ रोजी अर्ज आलेला असुन त्यावेळी ज्यांचकडे सदर कामी कार्यवाही करणे अपेक्षित होते. त्यांनी त्याचवेळी का कार्यवाही केली नाही या बाबत त्यांचा खुलासा घ्यावा.अ/

यावर वसुली लिपिक यांचा अभिप्राय की, फेरसादर श्री. बाबासाहेब बन्सीलाल औटी, वॉर्ड नं.६९ बिल नं.५० चा अर्ज यापुर्वी दि.०३/०९/२००३ व दि.१९/१२/२००३ रोजी मनपाकडे नळकनेक्शन नसतांना आकारण्यात आलेली पाणीपट्टी कर निर्लेखित करणेबाबत अर्ज मनपाकडे दिलेले होते.

परंतु तत्कालीन वसुली लिपिक कै. नवगिरे अजित व मदतनीस कै. कोलते अशोक हे मयत झालेले असुन सदर अर्जदार यांची मुळ अर्ज व तद्नंतर कारवाई केल्याबाबत कोणत्याही प्रकारचा प्रस्ताव आढळुन येत नसल्याने व पाणीपट्टी कमी न झालेने अर्जदार यांनी दि.२९/५/२०१३ रोजी परत अर्ज दिल्यानुसार पाणीपट्टी निर्लेखितचा रिपोर्ट देण्यात आलेला आहे. पुढील कार्यवाहीस्तव खुलासा सविनय सादर.

यावर सहा.मुल्य नि.क.सं.अधिकारी यांचा अभिप्राय की, कै. नवगीरे व कै. कोलते यांचेकडून प्रस्ताव न आलेमुळे तसेच सद्यस्थितीत वसुली लिपिक श्री. सप्रे पी.व्ही. यांचे कडे अर्जदारांने पुन्हा अर्ज दिलेला असले मुळे निर्लेखित बाबत मान्यतेस्तव रिपोर्ट सादर.

यावर प्रभाग अधिकारी क्र.१ यांचा अभिप्राय की, प्रस्तावानुसार मान्यतेस्तव सादर.

यावर मुख्यलेखापरिक्षक यांचा अभिप्राय की, वॉर्ड क्र.६९ बील नं.५० पाणीपट्टी आकारणी निर्लेखित करणेबाबत प्रभाग अधिकारी क्र.१ तसेच सहाय्यक मुल्य निर्धारक तथा कर संकलन अधिकारी यांचे अभिप्रायानुसार मान्यतेस्तव व पाहणी अहवाल यांचा अभिप्रायानुसार मान्यतेस्तव.

यावर लिपिक यांचा अभिप्राय की, दि.१३/२/२०१४ च्या परि. "अ" स्थित अभिप्रायानुसार कार्यवत असणा-या जबाबदार संबंधीत अधिकारी / कर्मचारी यांचा खुलासा मागवून आवश्यक त्या प्रशासनिक कार्यवाही नुसार निर्णय घेणे उचित ठरेल.

यावर मा.उपायुक्त (कर) यांचा अभिप्राय की, "अ" बाबत कोण जबाबदार आहेत कै. अशोक कोलते व कै. अजित नवगिरे हे कधी मयत झाले त्यानंतर सन २००३ ते सन २०१४ पर्यत कोणकोण संबंधीत लिपिक होते याचाही खुलासा करावा.

यावर प्रभाग अधिकारी क्र.१ यांचा अभिप्राय की, श्री. गोडकळकर प्र. कर निरीक्षक , नागापूर कार्या. प्र.स.क्र.१ सविस्तर खुलासा सादर करावा.

यावर करनिरीक्षक यांचा अभिप्राय की, विनंती पुर्वक खुलासा सादर करण्यात येतो की, अर्जदार श्री. बाबासाहेब बन्सीलाल औटी वॉर्ड नं.६९, बील नं.५०, रेणुकानगर बोल्हेगाव फाटा अ,नगर यांचे दि.२९/५/२०१३चे अर्जानुसार नळ कनेक्शन नसताना सुध्दा सन २००३ पासुन पाणीपट्टी बील आकारणी रद्द करणेबाबत व सुधारित बिल देणे बाबत नमूद करून विनंती केलेली आहे. तद्नुषंगाने सादर केलेल्या प्रस्तावावर विचारणा केलेल्या मुद्दयाबाबत खालील प्रमाणे खुलासा देण्यात येत आहे.

१.] कै. अजित नवगिरे व कै. अशोक कोलते यांचेकडे सदर वसुली वॉ.क्र.६९ चे कामकाज होते.

२.] दिनांक ५/१/२०११ अजित नवगिरे हे मयत झाले आहेत.

३.] दिनांक ८/१/२०१२ अशोक कोलते हे मयत झाले आहेत.

तद्नंतर सदर वसुली वॉर्ड कामकाज श्री. पी.व्ही. सप्रे यांचेकडे सन २०१३-१४ मध्ये सोपविले होते. दरम्यान काळात सदर वॉर्डकरिता वसुली लिपिक व कर्मचारी उपलब्ध नव्हते सदर वॉर्डचे अभिलेख नागरिकांच्या आलेल्या अडचणीनुसार अभिलेख शोधुन पुर्तता करून घेतली जात होती त्यामुळे संबंधीत अर्जदार यांचाही नमुद तारखा अर्ज घेवुन प्रस्ताव सादर करून पुढील कार्यवाहीस्तव प्रकरण सादर केलेले आहे.

यावर प्रभाग अधिकारी क्र.१ यांचा अभिप्राय की, प्रस्तावानुसार कर निरीक्षक नागापूर कार्या. यांनी सादर केलेला खुलासा आदेशार्थ सादर.

यावर मा.उपायुक्त (कर) यांचा अभिप्राय की,१] सन २००३ ते २०११ अखेर श्री. अजित नवगिरे हे लिपिक हेते ते दि.५/१/११रोजी मयत झाले.,२]नंतर श्री.अशोक कोलते हे लिपिक दि.८/१/१२ रोजी मयत झाले ३] सबब सन २००३ ते २०११-१२ पर्यत का कमी केले नाही खुलासा मिळू शकत नाही., ४] म्हणून प्रस्तावीत नुसार रक्कम निर्लेखित करणेबाबतचा प्रस्ताव मे. स्थायी समिी सभेसमोर महाराष्ट्र मनपा अधि. १९४९ चे कलम १५२ नुसार सादर करणे उचित होईल मे. आदेशार्थ स.सादर.

यावर मा.आयुक्त साहेब यांचा सहमती दर्शक सही

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--**--

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :-अर्जदार श्री. बाबासाहेब बन्सीलाल औटी यांनी पाणीपट्टी+शास्तीची रक्कम निर्लेखित करण्यांस मंजूरी मिळणे विषयी प्रस्ताव आहे.

मा.श्री. अजिंक्य बोरकर :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवा.

त्याप्रमाणे ऑफिस रिपोर्ट सभेमध्ये वाचून दाखविण्यात आला.

मा.श्री. कुमार वाकळे :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.श्री. शेख फैयाज :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा. सभापती साहेब :- ऑफिस रिपोर्टमध्ये नमूद केलेली पाणीपट्टी निर्लेखित करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येत आहे.शास्ती निर्लेखीत करण्याचा अधिकार स्थायी समितीला नसल्याने त्याबाबत निर्णय प्रशासकीय पातळीवर घेण्यात यावा.

**ठराव :-** ऑफिस रिपोर्टानुसार अर्जदार श्री. बाबासाहेब बन्सीलाल औटी, रा. घर नं.७८/१ रेणुकनगर बोल्हेगांव २५ नागापुर ,अ.नगर यांना नळ कनेक्शन नसतांना प्रभाग समिती क्र.१ ,वॉर्ड क्रमांक ६९, बील क्रमांक ५०, वरील फक्त पाणीपट्टी रक्कम निर्लेखित करण्यांस मंजूरी देण्यांत येत आहे.

शास्ती निर्लेखीत करण्याचा अधिकार स्थायी समितीला नसल्याने त्याबाबत निर्णय प्रशासकीय पातळीवर घेण्यात यावा.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- मा.श्री. कुमार वाकळे सही /-

अनुमोदक :- मा.श्री. शेख फैयाज सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा. स्थायी समिती सभा क्रमांक- ८**

विषय क्रमांक- ८१ बुधवार दि.१०/०९/२०१४

ठराव क्रमांक- ८१ बुधवार दि.१०/०९/२०१४

**प्रस्तावाचा विषय :-** अर्जदार श्रीमती तेरेजा रभाजी पाळदे , रा. डॉन बॉस्को ,अ.नगर यांना ओपन प्लॉट आकारणी प्रभाग समिती क्र.१ ,वॉर्ड क्रमांक ७०, बील क्रमांक १००३, घरपट्टी रक्कम+शास्ती निर्लेखित करण्यांस मंजूरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-** अहमदनगर महानगरपालिका प्रभाग समिती क्र.१ सावेडी वसुली

नागापूर उपविभागीय कार्यालय वॉर्ड क्र.७० वसुली लिपिक श्री.डि.एम. कांडेकर यांजकडून विनंती रिपोर्ट देण्यांत येतो की, वॉ. क्र. ७० मधील मालमत्ता धारक भोग. श्रीमती तेरेजा रभाजी पाळद बिल नं.१०४० रा. डॉन बॉस्के यांनी दि.२४/६/२०१३ रोजी इकडील कार्यालयाकडे अर्ज देवुन कळविले आहे की सन ०७-०८ आर्थिक वर्षात बांधकाम परवानगी काढुन मोकळया जागेत घराचे बांधकाम केलेले आहे. मला मोकळया जागेचे व बांधकामाचे अशी दोन बिले एकाच मिळकतीची येतात तरी वॉर्ड नं.७० बिल नं.१००३ ओपन प्लॉट जागेचे बील रद्द करण्याबाबत विनंती केलेली आहे.

मालमत्ता धारक यांनी दाखल केलेल्या अर्जानुसार तसेच दाखल दस्त ऐवज नुसार समक्ष पाहणी केली असता एकाच मालमत्तेचे दोन बिले असल्याचे आढळुन आले आहे सन ०७-०८ आर्थिक वर्षात रि. विभागामार्फत ओपन प्लॉट कर आकारणी नो. नं. १४३९ करयोग्य मुल्य रू.५९५/- सं.कर १६१/- अन्वये नोटीस बजावणेत आलेली असुन तसेच नियमानुसार मनपा वसुली अभिलेखा नावे नोंद केलेली आहे.

तसेच मालमत्ताधारक यांनी सन २००७-०८ याच आर्थिक वर्षात मनपा बांधकाम मंजुरी व प्रारंभ प्रमाणपत्र टी.पी.जा.क्र. १६६१ दि.१८/८/२००७ अन्वये घेण्यात आलेले असुन सदर बांधकाम नोंद व बांधकाम आकारणी सन ०७-०८ मध्ये बील क्र.१०४० वर घेण्यात आलेली आहे. सदर खुल्या भुखंडाची नोंद मनपा मा.सु.के.टो.क्र.२००५६ दि.२५/७/२००७ अन्वये रि.ऑ. तत्कालीन यांनी बील क्र.१००३ वर घेण्यात आलेली होती. परंतु तत्कालीन वसुली कर्मचारी सदर बांधकाम नोंद बिल क्र. १००३ वर घेणे क्रमप्राप्त असताना बांधकम नोंद स्वतंत्र्यरित्या बील क्र.१०४० घेण्यात आलेने सदर ओपन प्लॅट बिल क्र.१००३ वर रद्द व होता स्वतंत्र्यरित्या ओपन प्लॉट व बांधकाम अशी दोन बिले देण्यात येतात. तथापी मालमत्ता धारक यांचे ओपन प्लॉट बील क्र.१००३ व त्यावरील थकबाकी सन ०७ ते १४ अखेर रू.३३७६/-+ शास्तीसह बील रद्द करणे बाबत अहवाल मान्यतेस्तव आदेशार्थ सविनय सादर.

येणेप्रमाणे वसुली लिपिक यांचा अहवाल असे.

यावर कर निरीक्षक यांचा अभिप्राय की, वसुली लिपिक यांचे समक्ष जागा पहाणी केली असता दि.२५/६/२०१३ रोजी एकाच मिळकतीचे दोन बिले देण्यांत येत असल्याबाबत निदर्शनास आले असुन खुला भुखंड बिल क्र.१००३ थकबाकी + शास्तीसह बिील रद्द होणेस मान्यतेस्तव आदेशार्थ सविनय सादर.

यावर प्रभाग अधिकारी क्र.१ यांचा सहमती दर्शक

यावर सहा.मु.नि. क.सं. अधिकारी यांचा अभिप्राय की, कर आकारणी करतांना संबंधीत वसुली लिपिक यांच्या कामात हलगर्जीपणा दिसुन येतो कर आकारणीचे पुर्वी खुल्या भुखंडाची कर आकारणी आहे किंवा नाही याची खात्री करत नाहीत. त्यामुळे असे प्रकार सतत घडत आहेत मिळकत धारकास एकाचा मिळकतीचे दोन मागणी बिले दिले जात असेल तर त्यामध्ये मनपाची कारण नसतांना बदनामी होत आहे. यापुढे असे प्रकार घडल्यास संबंधीत कर निरीक्षक व संबंधीत वसुली लिपिक यांचेवर शिस्तभंगा सारखी कारवाई

करण्यात येईल. याची दखल घ्यावी. खुला भुखंड बिल नं.१००३ वर असलेली थकबाकी रू.३३७६/-+ शास्ती वसुल होणारी रक्कम नसल्याने मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधि.१९४९ मधील कलम १५२ नुसार मा.स्थायी समितीच्या मान्यते निर्लेखित करणे आवश्यक आहे तथापि आदेशार्थ सादर.

यवर मा.उपायुक्त (कर) यांचा अभिप्राय की, मु.ले.प. यांचा अभिप्राय घेणे.

यावर मु.ले.प. यांचा अभिप्राय की, प्रभाग अधिकारी प्र.स.क्र. १ तसेच सहा. मुल्य निर्धारक तथा संकलन अधिकारी यांचे अभिप्रायानुसार मान्यतेस्तव सादर.

यावर मा.उपायुक्त (कर) यांचा अभिप्राय की, "अ" नुसार मान्यतेस तथा आदेशार्थ.

यावर मा.आयुक्त साहेब यांचा सहमती दर्शक सही

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--**--

**<u>चर्चा :-</u>**

मा.सभापती साहेब :-अर्जदार तेरेजा रभाजी पाळद यांनी घरपट्टी+शास्तीची रक्कम निर्लेखित करण्यांस मंजूरी मिळणे विषयी प्रस्ताव आहे.

मा.श्री. अजिंक्य बोरकर :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवा.

त्याप्रमाणे ऑफिस रिपोर्ट सभेमध्ये वाचून दाखविण्यात आला.

मा.श्री. कुमार वाकळे :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.श्री. शेख फैयाज :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा. सभापती साहेब :- ऑफिस रिपोर्टमध्ये नमूद केलेली घरपट्टी निर्लेखित करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येत आहे.शास्ती निर्लेखीत करण्याचा अधिकार स्थायी समितीला नसल्याने त्याबाबत निर्णय प्रशासकीय पातळीवर घेण्यात यावा.

**<u>ठराव :-</u>** ऑफिस रिपोर्टानुसार अर्जदार श्रीमती तेरेजा रभाजी पाळदे , रा. डॉन बॉस्को ,अ.नगर यांना ओपन प्लॉट आकारणी प्रभाग समिती क्र.१ ,वॉर्ड क्रमांक ७०, बील क्रमांक १००३, वरील फक्त घरपट्टी रक्कम निर्लेखित करण्यांस मंजूरी देण्यांत येत आहे.

शास्ती निर्लेखीत करण्याचा अधिकार स्थायी समितीला नसल्याने त्याबाबत निर्णय प्रशासकीय पातळीवर घेण्यात यावा.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- मा.श्री. कुमार वाकळे सही /-

अनुमोदक :- मा.श्री. शेख फैयाज सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा. स्थायी समिती सभा क्रमांक- ८**

विषय क्रमांक- ८२ बुधवार दि.१०/०९/२०१४

ठराव क्रमांक- ८२ बुधवार दि.१०/०९/२०१४

**प्रस्तावाचा विषय :-** अर्जदार दत्तात्रय भंडारे भोग- श्री.सुधाकर जोशी , रा. बु-हाणपुर,अ.नगर यांना नळ कनेक्शन नसतांना प्रभाग समिती क्र.२ ,वॉर्ड क्रमांक ९, बील क्रमांक ९७३, पाणीपट्टी रक्कम+शास्ती निर्लेखित करण्यांस मंजूरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-** अहमदनगर महानगरपालिका प्रभाग समिती क्र.२

विनंती पुर्वक रिपोर्ट की, वॉर्ड क्र.९, बिल क्र.९७३, घर क्र. ...... मालमत्ताधारक श्री. दत्तात्रय भंडारे भोग- सुधाकर जोशी यांनी दि.२६/११/२०१२ रोजी अर्ज देउन सदर जागेत नळ नाही सबब बिलामध्ये दर्शविण्यात आलेली पाणीपट्टी कमी करून दुरूस्त बिल मिळावे पाणीपट्टी कमी करावी सदरचे बिल भरणेस मी तयार आहे असा विनंती अर्ज इकडेस दिलेला आहे.

सदर अर्जानुसार पाणीपुरवठा फिटर , हेड फिटर, वसुली लिपिक, करनिरीक्षक , शाखा अभियंता पा.पु. प्रभाग अधिकारी यांनी प्रत्यक्ष पहाणी केली असता संबंधीत जागेत नळ कनेक्शन आढळुन आलेले नाही. याबाबतचा पहाणी अहवाल सोबत धारिकेत समाविष्ठ केलेला आहे. सबब मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम १५२ मध्ये आयुक्तास स्थायी समितीच्या मान्यतेने, कोणतेही कराबद्दल किंवा कोणताही कर वसुल करण्यासाठी झालेल्या खर्चाबद्दल येणे असलेली जी कोणतीही रक्कम त्यांच्या मते वसुल होण्याजोगी नसेल ती वेळोवेळी निर्लेखित करता येईल अशी तरतुद आहे.

अर्जदार यांनी दिलेला अर्ज पहाणी समितीचा अहवाल व उक्त अधिनियमातील तरतुद पहाता रक्कम रूपये १४७४९/- २% शास्ती निर्लेखित करणे योग्य होईल करिता सदरचे प्रकरण मा.स्थायी समितीकडे पाठविणेस मंजुरी मिळावी ही विनंती आदेशार्थ सादर.

येणेप्रमाणे कर निरीक्षक यांचा अहवाल असे.

यावर प्रभाग अधिकारी क्र. २ यांचा अभिप्राय की, कर निरीक्षक यांच्या अहवालानुसार कर निर्लेखित करणेकामी स्थायी समितीकडे मंजुरीसाठी ठेवणेस आदेशार्थ सादर.

यावर मुख्य लेखा परिक्षक यांचा अभिप्राय की, कर निरीक्षक यांचा अहवालानुसार व अधिनियमातील तरतुदीनुसार रक्कम निर्लेखित करणेकामी सदर प्रस्ताव मा.स्थायी समितीकडे पाठविणेस उचित वाटते.

यावर मा.उपायुक्त साहेब यांचा अभिप्राय की, यथाप्रस्तावीत व रिपोर्टानुसार विषय मे. स्थायी समिती सभेत सादर करणेसाठी मे.आदेशार्थ स. सादर.

यावर मा.आयुक्त साहेब यांचा सहमती दर्शक सही

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--**--

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :-अर्जदार दत्तात्रय भंडारे भोग- श्री.सुधाकर जोशी यांनी पाणीपट्टी+शास्तीची रक्कम निर्लेखित करण्यांस मंजूरी मिळणे विषयी प्रस्ताव आहे.

मा.श्री. अजिंक्य बोरकर :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवा.

त्याप्रमाणे ऑफिस रिपोर्ट सभेमध्ये वाचून दाखविण्यात आला.

मा.श्री. शेख फैयाज :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.श्री. कुमार वाकळे :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा. सभापती साहेब :- ऑफिस रिपोर्टमध्ये नमूद केलेली पाणीपट्टी निर्लेखित करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येत आहे.शास्ती निर्लेखीत करण्याचा अधिकार स्थायी समितीला नसल्याने त्याबाबत निर्णय प्रशासकीय पातळीवर घेण्यात यावा.

**ठराव :-**ऑफिस रिपोर्टानुसार अर्जदार दत्तात्रय भंडारे भोग- श्री.सुधाकर जोशी , रा. बु-हाणपुर,अ.नगर यांना नळ कनेक्शन नसतांना प्रभाग समिती क्र.२ ,वॉर्ड क्रमांक ९, बील क्रमांक ९७३,वरील फक्त पाणीपट्टी रक्कम निर्लेखित करण्यांस मंजूरी देण्यांत येत आहे.

शास्ती निर्लेखीत करण्याचा अधिकार स्थायी समितीला नसल्याने त्याबाबत निर्णय प्रशासकीय पातळीवर घेण्यात यावा.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- मा.श्री. शेख फैयाज सही /-

अनुमोदक :- मा.श्री. कुमार वाकळे सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

**मा. स्थायी समिती सभा क्रमांक- ८**

विषय क्रमांक- ८३ बुधवार दि.१०/०९/२०१४

ठराव क्रमांक- ८३ बुधवार दि.१०/०९/२०१४

**प्रस्तावाचा विषय :-** अर्जदार श्री. ओमप्रकाश गौरीलाल खंडेलवाल, रा. बेलदार गल्ली, अ.नगर यांना नळ कनेक्शन नसतांना प्रभाग समिती क्र.३ ,वॉर्ड क्रमांक ४, बील क्रमांक ७३, पाणीपट्टी रक्कम+शास्ती निर्लेखित करण्यांस मंजूरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-** अहमदनगर महानगरपालिका प्रभाग समिती क्र.३ झेंडीगेट

विनंती रिपोर्ट सादर करण्यात येतो की, श्री. ओमप्रकाश खंडोलवाल यांनी इकडेस अर्ज देवुन विनंती केलेली आहे की, सदर घराला नळ कनेक्शन नसतांनाही सदर घराला सन २००२-२००३ पासुन अचानक पाणीपट्टी आकारून पाणीपट्टीचे बिल देण्यांत आलेले आहे.सदर ठिकाणची समक्ष पाहणी करून सदरचे चुकीचे बील रद्द करण्यात यावे अशी विनंती केलेली आहे.

वॉर्ड क्र.४ बिल क्र.७३ वर श्री ओमप्रकाश गौरीलाल खंडेलवाल यांचे घर असुन त्यांच्या नांवे सन मार्च २०१४ अखेर शास्तीसह घरपट्टी रू.२०६७/- व पाणीपट्टी रू.१९८०४/- असे दोन्ही मिळुन रू.३९३४८/- इतकी थकबाकी आहे.

अर्जदार यांच्या अर्जानुसार सदर ठिकाणी पिण्याचे पाण्याचे नळ कनेक्शन आहे किंवा नाही या बाबतचा अहवाल प्रभाग समिती क्र.३ झेंडीगेट मधील पाणीपुरवठा फिटर यांना सादर करणेबाबत सांगिते असता त्यांनी श्री. ओमप्रकाश गौरीलाल खंडेलवाल यांच्या घरी दिनांक -------- रोजी समक्ष पाहणी केली असता सदर ठिकाणी नळ कनेक्शन आढळुन येत नाही अस्तित्वात नाही या बाबतचा अहवाल दिनांक --------- रोजी इकडेस सादर केलेला आहे.

तरी सदर ठिकाणी नळ कनेक्शन नसल्याने व प्रभाग समिती क्र.३ मधील पाणी पुरवठा फिटर यांच्या अहवालानुसार चुकून आकारलेली पाणी पट्टी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १५२ नुसार शास्तीसह पाणीपट्टी निर्लेखित करणे संयुक्तीक वाटते. तथापी आदेशार्थ सादर. /**अ**

येणेप्रमाणे वसुली लिपिक यांचा अहवाल असे.

यावर प्रभाग अधिकारी क्र.३ यांचा "अ" नुसार मान्यतेस सादर.

यावर मुख्य लेखा परिक्षक यांचा अभिप्राय की, उपरोक्त प्रस्ताव व यासोबतच्या जोडपत्रावरून अर्जदार यांचा दि.२८/४/१० चा अर्ज पहाता २०००-२००५ या आर्थिक वर्षात नळ कनेक्शन बंद केल्याचे दिसून येते तथापि नळ कनेक्शन बंद केल्याचे खात्री करून लगतच्या आथ्रिक वर्षापर्यतंचे पाणी पट्टी भरून घेउन उर्वरीत नळपट्टी व त्यावरील शास्ती माफ कार्य उचित होईल. सबब नमूद कार्यवाही पध्दत मा.स्थायी समिती सभेचे मान्यतेने मनपा अधि. अधि.१९४९ चे कलम १५२ नुसार मा.प्रभाग अधिकारी यांचे शिफारीप्रमाणे "अ" नुसार कार्यवाही करणे योग्य राहील.१] विलंबाबाबत आवश्यक ती प्रशासनिक कार्यवाही करावी. २] प्रभाग पाणीपुरवठा अभियंता यांनी खात्री करून अहवाल द्यावा.,३] कर मुल्य निर्धारक यांचे अभिप्राय घेउन नियमानुसार पुढील कार्यवाही करावी.

यावर प्रभाग अधिकारी क्र.३ यांचा अभिप्राय की, फेरसादर, १] प्रस्तुत प्रकरणी आस्थापना विभागाकडे अहवाल सादर केला आहे., २] सोबत स्थळ पाहणी अहवाल जोडलेला आहे.

यावर सहा. मुल्य निर्धारक कर संकलन अधिकारी यांचा अभिप्राय की, प्रभाग अधिकारी यांचे कडील जा.क्र.८-०६३५ दि.१४/८/२०१४ च्या खुलासा व त्याचप्रमाणे प्रभाग अभियंता व हेडफिटर यांचे पाहणी अहवालानुसार सादर ठिकाणी नळ जोड आढळून येत नसल्याने चुकून लागलेली नळ पट्टीची आकारणी कमी करण्यांस हरकत नाही.

यावर मुख्यलेखापरिक्षक यांचा अभिप्राय की, "अ" प्रमाणे सहा. मुल्य निर्धारक तथा कर संकलन अधिकारी यांचा प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

यावर मा.उपायुक्त साहेब यांचा अभिप्राय की, विभागाने प्रस्तावीत केलेनुसार व रिपोर्टमध्ये रक्कम निर्लेखित करणेच्या प्रस्ताव मंजूरीस्तव मे.स्थायी समिमी सभेत ठेवणे बाबत मे. आदेशार्थ स. सादर.

यावर मा.आयुक्त साहेब यांचा सहमती दर्शक सही

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--***--

**<u>चर्चा :-</u>**

मा.सभापती साहेब :-अर्जदार ओमप्रकाश गौरीलाल खंडेलवाल यांनी पाणीपट्टी+शास्तीची रक्कम निर्लेखित करण्यांस मंजूरी मिळणे विषयी प्रस्ताव आहे.

मा.श्री. अजिंक्य बोरकर :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवा.

त्याप्रमाणे ऑफिस रिपोर्ट सभेमध्ये वाचून दाखविण्यात आला.

मा.श्री.शेख फैयाज :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.श्री.कुमार वाकळे :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा. सभापती साहेब :- ऑफिस रिपोर्टमध्ये नमूद केलेली पाणीपट्टी निर्लेखित करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येत आहे.शास्ती निर्लेखीत करण्याचा अधिकार स्थायी समितीला नसल्याने त्याबाबत निर्णय प्रशासकीय पातळीवर घेण्यात यावा.

**ठराव :-** ऑफिस रिपोर्टानुसार अर्जदार श्री. ओमप्रकाश गौरीलाल खंडेलवाल, रा. बेलदार गल्ली, अ.नगर यांना नळ कनेक्शन नसतांना प्रभाग समिती क्र.३ ,वॉर्ड क्रमांक ४, बील क्रमांक ७३, वरील फक्त पाणीपट्टी रक्कम निर्लेखित करण्यांस मंजूरी देण्यांत येत आहे.

शास्ती निर्लेखीत करण्याचा अधिकार स्थायी समितीला नसल्याने त्याबाबत निर्णय प्रशासकीय पातळीवर घेण्यात यावा.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- मा.श्री. शेख फैयाज सही /-

अनुमोदक :- मा.श्री. कुमार वाकळे सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

**मा. स्थायी समिती सभा क्रमांक- ८**

विषय क्रमांक- ८४ बुधवार दि.१०/०९/२०१४

ठराव क्रमांक- ८४ बुधवार दि.१०/०९/२०१४

**प्रस्तावाचा विषय :-** मा.स्थायी समिती ठराव क्र.११९ दि.२१/६/२०१३अन्वये अर्जदार श्री.शामसुंदर जी. जग्गी,भागीदार अशोका टुरीस्ट हॉटेल,रा.झेंडीगेट,अ.नगर यांना नळ कनेक्शन नसतांना प्रभाग समिती क्र.३ ,वॉर्ड क्रमांक १०,बील क्र.२७,पाणीपट्टी रक्कम+शास्ती निर्लेखित करण्यांस मंजूरी मिळणेबाबतचा फेरसादर.

**प्रस्तावाचा मजकुर :-** अहमदनगर महानगरपालिका प्रभाग समिती क्र.३ झेंडीगेट

फेरसादर,

विनंती अहवाल सादर की, या प्रभागाकडील पाणीपुरवठा फिटर यांना "अशोका हॉटेल" या मिळकतीची समक्ष पाहणी करून किती नळ कनेक्शन आहेत, त्याचा आकार या बाबतचा अहवाल सादर करणेबाबत कळविले असता पा.पु.जा.क्र.८५६ दि.३१/१२/२०११ अन्वये "अशोका हॉटेल" या मिळकतीमध्ये १" चे फक्त एकच नळ कनेक्शन आहे असा अहवाल सादर केलेला आहे.

मा.आयुक्त साहेब यांच्या आदेशानुसार "पाणीपट्टीची रक्कम निर्लेखित करणेसाठी दिनांक ३०/१/२००३ अन्वये गठीत समिती स्थापन केलेली आहे." सदर गठीत समितीने "अशेका हॉटेल" या मिळकतीस दिनांक १४/२/२०१३ रोजी समक्ष पाहणी केली असता १" चे एकच नळ कनेक्शन आढळुन आलेले आहे. सदरचे नळ कनेक्शन हे व्यापारी असलेमुळे सन २००३-२००४ पासुन मा. प्रशासकीय ठराव क्रमांक-१ दि.१७-७-२००३ अन्वये दरवर्षास रू.२२,०००/- प्रमाणे आकारणी करणे योग्य वाटते.

सन २००३-०४ पासुन सदर मिळकतीवर दरवर्षास रू.४९,०००/- नुसार पाणीपट्टीची आकारणी करीत आहे. सन २००३ ते २०१३ अखेर पाणीपट्टीची रू.४,९०,०००/- इतकी रक्कम होत आहे व प्रत्यक्ष पाहणी नुसार सन २००३-०४ पासुन दरवर्षास रू. २२,०००/- नुसार सन २००३ ते २०१३ अखेर रू.२,२०,०००/- होत आहे.

वरील दोन्ही पाणीपट्टीमधील तफावत रू.२,७०,०००/- येत असल्याने सदरची रक्कम मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १५२ अनुसार निर्लेखित करणे योग्य वाटते. तसेच पाणी पुरवठा विभागाकडील उपलब्ध असलेले सन १९९८-९९ ते २००१-०२ चे डिमांड रजिस्टर पाहता "अशोक हॉटेल" या मिळकतीस एकही नळ कनेक्शन नसल्याचे दाखवित आहे.

त्यामुळे सन २०१२-१३ अखेर पाणीपट्टी रू.२,७०,०००/- व त्यावर आकारलेली नोटीस फी / शास्तीची रक्कम निर्लेखित करणे बाबतचा प्रस्ताव सादर करण्यांत आलेला आहे. सदर ठिकाणी पहाणी दि.१/८/२०१३ रोजी केली आहे.

तरी सदरची रक्कम आपल्यास्तरावर निर्लेखित करणेस्तव आदेशार्थ सादर.

येणेप्रमाणे वसुली मदतनीस यांचा अहवाल असे.

यावर मा.आयुक्त यांचे आदेशानुसार गठीत समिती , फिटर, हेडफिटर, इंजिनिअर, प्रभाग अधिकारी यांचा सहमती दर्शक सही

यावर कर निरीक्षक यांचा अभिप्राय की, मा.स्थायी समिती ठ.नं.४ दि.२१/६/२०१३ अ नुसार पहाणी समितीने सदर ठिकाणी दि.१/८/२०१३ रोजी फेर तपासणी केली असुन सदर ठिकाणी १" चे एकच कनेक्शन व्यापारी तत्वावर असलेचे आढळले सबब फेरप्रस्ताव सादर.

यावर सहाय्यक आयुक्त यांचा अभिप्राय की, सादर पाहणी समितीचा अहवाल व प्रस्तावीक केलेनुसार सन २०१२-२०१३ अखेर पाणीपट्टीची रक्कम रू.२,७०,०००/- व त्यावर आकारलेली नोटीस फी / शास्तीची रक्कम निर्लेखित करणेकामी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम १५२ नुसार मा.स्थायी समिती समोर सादर करणे उचित वाटते. सबब आदेशार्थ तथा निर्णयास्तव सादर./**अ**

यावर मा. उपायुक्त (कर) यांचा अभिप्राय की, "अ" नुसार व प्रभाग अधिकारी क्र.३ यांचे फेर स्थळ पाहणीनुसार प्रस्ताव मा. स्थायी समितीपुढे निर्णयासाठी ठेवणेस्तव आदेशार्थ सादर.

यावर मा.आयुक्त साहेब यांचा सहमती दर्शक सही

सबब प्रकरण मा. स्थायी समिती सभे पुढे सादर.

--***--

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :-अर्जदार श्री.शामसुंदर जी. जग्गी,भागीदार अशोका टुरीस्ट हॉटेल यांनी पाणीपट्टी+शास्तीची रक्कम निर्लेखित करण्यांस मंजूरी मिळणे विषयी प्रस्ताव आहे.

मा.श्री. अजिंक्य बोरकर :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवा.

त्याप्रमाणे ऑफिस रिपोर्ट सभेमध्ये वाचून दाखविण्यात आला.

मा.श्री. शेख फैयाज :- फेर ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.श्री. कुमार वाकळे :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा. सभापती साहेब :- ऑफिस रिपोर्टमध्ये नमूद केलेली पाणीपट्टी निर्लेखित करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येत आहे.शास्ती निर्लेखीत करण्याचा अधिकार स्थायी समितीला नसल्याने त्याबाबत निर्णय प्रशासकीय पातळीवर घेण्यात यावा.

**ठराव :-** फेरऑफिस रिपोर्टानुसार मा.स्थायी समिती ठराव क्र.११९ दि.२१/६/२०१३अन्वये अर्जदार श्री.शामसुंदर जी. जग्गी,भागीदार अशोका टुरीस्ट हॉटेल,रा.झेंडीगेट,अ.नगर यांना नळ कनेक्शन नसतांना प्रभाग समिती क्र.३ ,वॉर्ड क्रमांक १०,बील क्र.२७,वरील फक्त पाणीपट्टी रक्कम निर्लेखित करण्यांस मंजूरी देण्यांत येत आहे.

शास्ती निर्लेखीत करण्याचा अधिकार स्थायी समितीला नसल्याने त्याबाबत निर्णय प्रशासकीय पातळीवर घेण्यात यावा.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- मा.श्री. शेख फैयाज सही /-

अनुमोदक :- मा.श्री. कुमार वाकळे सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा. स्थायी समिती सभा क्रमांक- ८**

विषय क्रमांक- ८५ बुधवार दि.१०/०९/२०१४

ठराव क्रमांक- ८५ बुधवार दि.१०/०९/२०१४

**प्रस्तावाचा विषय :-** अर्जदार श्रीमती शेख लुतफूरे रहेमान, रा. समिरनगर, अ.नगर यांना नळ कनेक्शन नसतांना प्रभाग समिती क्र.३ ,वॉर्ड क्रमांक ८५, बील क्रमांक २५१, पाणीपट्टी रक्कम+शास्ती निर्लेखित करण्यांस मंजूरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-** अहमदनगर महानगरपालिका प्रभाग समिती क्र.३ झेंडीगेट

विनंती रिपोर्ट सादर करण्यात येतो की, श्री.शेख लुतफूरे रहेमान यांनी इकडेस अर्ज देवून विनंती केलेली आहे की, सदर घराला नळ कनेक्शन नसतांनाही सदर घराला सन २००७-२००८ पासून अचानक पाणीपट्टी आकारून पाणीपट्टीचे बील देण्यात आलेले आहे.सदर ठिकाणची समक्ष पाहणी करून सदरचे चुकीचे बील रद्द करण्यांत यावे अशी विनंती केलेली आहे.

वॉर्ड नं. ८५ बील क्र.२५१ वर श्री. शेख लुतफेर रहेमान यांचे घर असुन त्यांच्या नावे सन मार्च २०१५ अखेर शास्तीसह घरपट्टी रू. ....... व पाणीपट्टी रू.१०५००/- असे दोन्ही मिळुन रू.१६९६७/- इतकी थकबाकी आहे.

अर्जदार यांच्या अर्जानुसार सदर ठिकाणी पिण्याचे पाण्याचे नळ कनेक्शन आहे किंवा नाही या बाबतचा अहवाल प्रभाग समिती क्र.३ झेंडीगेट मधील पाणीपुरवठा फिटर यांना सादर करणेबाबत सांगिते असता त्यांनी श्री. शेख लुतफेर रहेमान यांच्या घरी दिनांक २५/७/२०१४रोजी समक्ष पाहणी केली असता सदर ठिकाणी नळ कनेक्शन आढळुन येत नाही अस्तित्वात नाही या बाबतचा अहवाल दिनांक २६/७/२०१४ रोजी इकडेस सादर केलेला आहे.

तरी सदर ठिकाणी नळ कनेक्शन नसल्याने व प्रभाग समिती क्र.३ मधील पाणी पुरवठा फिटर यांच्या अहवालानुसार चुकून आकारलेली पाणी पट्टी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १५२ नुसार शास्तीसह पाणीपट्टी निर्लेखित करणे संयुक्तीक वाटते. तथापी आदेशार्थ सादर. /**अ**

येणेप्रमाणे वसुली लिपिक / मदतनीस यांचा अहवाल असे.

यावर कर निरीक्षक यांचा अभिप्राय की, "अ" नुसार मान्यतेस आदेशार्थ सादर.

यावर प्रभाग अधिकारी क्र.३ यांचा अभिप्राय की, "अ" नुसार प्रभाग अधिकारी व पाहणी समिती यांच्या शिफारशीनुसार मनपा अधि. १९४९ चे कलम १५२ नुसार कार्यवाहीस हरकत नाही तथापि पाणीपट्टी थकबाकी नसल्याबाबत खात्री करावी.

यावर मुख्यलेखापरिक्षा यांचा अभिप्राय की, बिल नं.२५१ , घरपट्टी- १६५२, पाणीपट्टी-१०५००/- , दंड-४८१५/- =१६९६७/- ,१] विलंबाबाबत आवश्यक ती प्रशासनिक कार्यवाही करावी. ,२] प्रभाग पाणीपुरवठा अभियंता यांनी खात्री करून अहवाल द्यावा,३] कर मुल्य निर्धारक यांचे अभिप्राय योग्य नियमानुसार पुढील कार्यवाही करावी.

यावर प्रभाग अधिकारी क्र.३ यांचा अभिप्राय की, फेरसादर, १] प्रस्तुत प्रकरणी आस्थापना विभागाकडे अहवाल सादर केला आहे. ,२] सोबत स्थळ पाहणी अहवाल जोडलेला आहे.

यावर सहा. मु.नि.क.सं. अधिकारी यांचा अभिप्राय की, प्रभाग अधिकारी यांचे जा.क्र.८-०६३३५ दि.१४/८/२०१४ चा खुलासा व त्याचप्रमाणे प्रभाग अभियंता व हेड फिटर यांचे पाहणी अहवालानुसार सदर ठिकाणी नळजोड आढळुन येत नसल्याने चुकून लागलेली नळ पट्टीची आकारणी कमी करण्यास हरकत नाही.

यावर मुख्यलेखापरिक्षक यांचा अभिप्राय की, "अ" प्रमाणे सहाय्यक मुल्य निर्धारक तथा संकलन अधिकारी यांचा प्रस्ताव मान्यतेस्तव सादर

यावर मा.उपायुक्त साहेब यांचा अभिप्राय की, विभागाने प्रस्तावीत केल्यानुसार रिपोर्टामधील रक्कम निर्लेखित केल्याचा प्रस्ताव मंजूरीस्तव मे. स्थायी समिती समोर ठेवण्यास आदेशार्थ सादर.

यावर मा.आयुक्त साहेब यांचा सहमती दर्शक सही

सबब प्रकरण मा. स्थायी समिती सभे पुढे सादर.

--***--

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :-अर्जदार श्रीमती शेख लुतफूरे रहेमान यांनी पाणीपट्टी+शास्तीची रक्कम निर्लेखित करण्यांस मंजूरी मिळणे विषयी प्रस्ताव आहे.

मा.श्री. अजिंक्य बोरकर :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवा.

त्याप्रमाणे ऑफिस रिपोर्ट सभेमध्ये वाचून दाखविण्यात आला.

मा.श्री. शेख फैयाज :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.श्री.कुमार वाकळे :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा. सभापती साहेब :- ऑफिस रिपोर्टमध्ये नमूद केलेली पाणीपट्टी निर्लेखित करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येत आहे.शास्ती निर्लेखीत करण्याचा अधिकार स्थायी समितीला नसल्याने त्याबाबत निर्णय प्रशासकीय पातळीवर घेण्यात यावा.

**<u>ठराव :-</u>** ऑफिस रिपोर्टानुसार अर्जदार श्रीमती शेख लुतफूरे रहेमान, रा. समिरनगर, अ.नगर यांना नळ कनेक्शन नसतांना प्रभाग समिती क्र.३ ,वॉर्ड क्रमांक ८५, बील क्रमांक २५१,वरील फक्त पाणीपट्टी रक्कम निर्लेखित करण्यांस मंजूरी देण्यांत येत आहे.

शास्ती निर्लेखीत करण्याचा अधिकार स्थायी समितीला नसल्याने त्याबाबत निर्णय प्रशासकीय पातळीवर घेण्यात यावा.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- मा.श्री. शेख फैयाज सही /-

अनुमोदक :- मा.श्री. कुमार वाकळे सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा. स्थायी समिती सभा क्रमांक- ८**

विषय क्रमांक- ८६ बुधवार दि.१०/०९/२०१४

ठराव क्रमांक- ८६ बुधवार दि.१०/०९/२०१४

**प्रस्तावाचा विषय :-** अर्जदार श्री.शेख असलम यासीन, रा. घर नं.५४/९९, शिरीनबाग,,अ.नगर यांना नळ कनेक्शन नसतांना प्रभाग समिती क्र.३ ,वॉर्ड क्रमांक ८५, बील क्रमांक ६३०, पाणीपट्टी रक्कम+शास्ती निर्लेखित करण्यांस मंजूरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-** अहमदनगर महानगरपालिका प्रभाग समिती क्र.३ झेंडीगेट

विनंती रिपोर्ट सादर करण्यात येतो की, श्री.शेख असलम यासीन यांनी इकडेस अर्ज देवून विनंती केलेली आहे की, सदर घराला नळ कनेक्शन नसतांनाही सदर घराला सन २००७-२००८ पासून अचानक पाणीपट्टी आकारून पाणीपट्टीचे बील देण्यात आलेले आहे.सदर ठिकाणची समक्ष पाहणी करून सदरचे चुकीचे बील रद्द करण्यांत यावे अशी विनंती केलेली आहे.

वॉर्ड नं. ८५ बील क्र.६३० वर श्री. श्री.शेख असलम यासीन यांचे घर असुन त्यांच्या नावे सन मार्च २०१४ अखेर शास्तीसह घरपट्टी रू. १७९६/-. व पाणीपट्टी रू. ९०००/- असे दोन्ही मिळुन रू. १५०७९/- इतकी थकबाकी आहे.

अर्जदार यांच्या अर्जानुसार सदर ठिकाणी पिण्याचे पाण्याचे नळ कनेक्शन आहे किंवा नाही या बाबतचा अहवाल प्रभाग समिती क्र.३ झेंडीगेट मधील पाणीपुरवठा फिटर यांना सादर करणेबाबत सांगिते असता त्यांनी श्री.शेख असलम यासीन यांच्या घरी दिनांक ४/७/२०१४रोजी समक्ष पाहणी केली असता सदर ठिकाणी नळ कनेक्शन आढळुन येत नाही अस्तित्वात नाही या बाबतचा अहवाल दिनांक ५/७/२०१४ रोजी इकडेस सादर केलेला आहे.

तरी सदर ठिकाणी नळ कनेक्शन नसल्याने व प्रभाग समिती क्र.३ मधील पाणी पुरवठा फिटर यांच्या अहवालानुसार चुकून आकारलेली पाणी पट्टी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १५२ नुसार शास्तीसह पाणीपट्टी निर्लेखित करणे संयुक्तीक वाटते. तथापी आदेशार्थ सादर. /**अ**

येणेप्रमाणे वसुली लिपिक / मदतनीस यांचा अहवाल असे.

यावर कर निरीक्षक यांचा अभिप्राय की, "अ" नुसार मान्यतेस आदेशार्थ सादर.

यावर प्रभाग अधिकारी क्र.३ यांचा अभिप्राय की, प्रभाग अधिकारी व पाहणी समिती यांच्या शिफारशीनुसार थकबाकी नसल्याची खात्री करून मनपा अधि.१९४९ कलम १५२ नुसार कार्यवाही करणेस "अ" नुसार हरकत नाही.

यावर मुख्य लेखा परिक्षक यांचा अभिप्राय की, , बिल नं.६३० , घरपट्टी- १७९६, पाणीपट्टी-९०००/- , दंड-४२८३/- = १५०७९/- ,१] विलंबाबाबत आवश्यक ती प्रशासनिक कार्यवाही करावी. ,२] प्रभाग पाणीपुरवठा अभियंता यांनी खात्री करून अहवाल दयावा.,३] कर मुल्य निर्धारक यांचे अभिप्राय योग्य नियमानुसार पुढील कार्यवाही करावी.

यावर प्रभाग अधिकारी क्र.३ यांचा अभिप्राय की, फेरसादर, १] प्रस्तुत प्रकरणी आस्थापना विभागाकडे अहवाल सादर केला आहे. ,२] सोबत स्थळ पाहणी अहवाल जोडलेला आहे.

यावर सहा.मु.नि.क.सं. अधिकारी यांचा अभिप्राय की, प्रभाग अधिकारी यांचे जा.क्र.८-०६३३५ दि.१४/८/२०१४ चा खुलासा व त्याचप्रमाणे प्रभाग अभियंता व हेड फिटर यांचे पाहणी अहवालानुसार सदर ठिकाणी नळजोड आढळुन येत नसल्याने चुकून लागलेली नळ पट्टीची आकारणी कमी करण्यास हरकत नाही.

यावर मुख्यलेखापरिक्षक यांचा अभिप्राय की, "अ" प्रमाणे सहाय्यक मुल्य निर्धारक तथा संकलन अधिकारी यांचा प्रस्ताव मान्यतेस्तव सादर

यावर मा.उपायुक्त साहेब यांचा अभिप्राय की, विभागाने प्रस्तावीत केल्यानुसार रिपोर्टामधील रक्कम निर्लेखित केल्याचा प्रस्ताव मंजूरीस्तव मे. स्थायी समिती समोर ठेवण्यास आदेशार्थ सादर.

यावर मा.आयुक्त साहेब यांचा सहमती दर्शक सही

सबब प्रकरण मा. स्थायी समिती सभे पुढे सादर.

--***--

**<u>चर्चा :-</u>**

मा.सभापती साहेब :-अर्जदार श्री.शेख असलम यासीन यांनी पाणीपट्टी+शास्तीची रक्कम निर्लेखित करण्यांस मंजूरी मिळणे विषयी प्रस्ताव आहे.

मा.श्री. अजिंक्य बोरकर :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवा.

त्याप्रमाणे ऑफिस रिपोर्ट सभेमध्ये वाचून दाखविण्यात आला.

मा.श्री.शेख फैयाज :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.श्री. कुमार वाकळे :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा. सभापती साहेब :- ऑफिस रिपोर्टमध्ये नमूद केलेली पाणीपट्टी निर्लेखित करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येत आहे.शास्ती निर्लेखीत करण्याचा अधिकार स्थायी समितीला नसल्याने त्याबाबत निर्णय प्रशासकीय पातळीवर घेण्यात यावा.

**<u>ठराव:-</u>** ऑफिस रिपोर्टानुसार अर्जदार श्री.शेख असलम यासीन, रा. घर नं.५४/९९, शिरीनबाग,,अ.नगर यांना नळ कनेक्शन नसतांना प्रभाग समिती क्र.३ ,वॉर्ड क्रमांक ८५, बील क्रमांक ६३०, वरील फक्त पाणीपट्टी रक्कम निर्लेखित करण्यांस मंजूरी देण्यांत येत आहे.

शास्ती निर्लेखीत करण्याचा अधिकार स्थायी समितीला नसल्याने त्याबाबत निर्णय प्रशासकीय पातळीवर घेण्यात यावा.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- मा.श्री. शेख फैयाज सही /-

अनुमोदक :- मा.श्री. कुमार वाकळे सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा. स्थायी समिती सभा क्रमांक- ८**

विषय क्रमांक- ८७ बुधवार दि.१०/०९/२०१४

ठराव क्रमांक- ८७ बुधवार दि.१०/०९/२०१४

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे अहमदनगर शहर पाणी पुरवठा योजना फेज-२ योजने अंतर्गत वसंतटेकडी येथे पंपहाउस बांधणेची अतिरिक्त बार्बीची दरसुची अंतर्गत सदरच्या कामास येणा-या रक्कम रूपये ३४,३३,०९७/- खर्चास मंजूरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट निर्णयार्थ.

**प्रस्तावाचा मजकुर :-** अहमदनगर महानगरपालिका पाणी पुरवठा विभाग

संदर्भ :- म.जी.प्रा.चे. जा.क्र.६१७ दि. ०४/०९/२०१३ रोजी चा प्रस्ताव

उपरोक्त विषयांकित योजनेचे काम प्रगतीपथावर असून याकामी म.जी.प्रा. ची प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणून नेमणूक केलेली आहे.

विषयांकित योजनेचा वर्कींग सर्व्हे म.जी.प्रा.मार्फत करण्यात आलेला आहे.त्यानुसार सदरच्या योजनेमध्ये काही बार्बीचा समावेश करणे आवश्यक असल्याचे **PMC**म.जी.प्रा. यांनी निदर्शनास आणून दिलेले आहे.

कामाचा आढावा घेणेच्या दि.२८/८/२०१३ रोजी झालेल्या आढावा बैठकीत सर्व अतिरिक्त कामांबाबत सविस्तर चर्चा झाली असून सदरच्या प्रस्तावास मंजुरी देण्यात येईल असे मा.आयुक्त यांनी सांगितले तसेच सदरचे प्रस्ताव लवकरात लवकर सादर करणेबाबत **PMC** म.जी.प्रा. यांना सुचना करण्यात आल्या होत्या.

या अनुषंगाने म.जी.प्रा.चे. वरील संदर्भिय पत्र प्राप्त झाले असुन सोबत खालीलप्रमाणे नमूद अतिरिक्त बाबीच्या दरसुचीचा प्रस्ताव अंदाजपत्रका सोबत विहित नमुन्यात प्राप्त झाला होता. सदरच्या कामाच्या अंदाजपत्रकाची किंमत रू.३७,३७,८७०/- इतकी असून अतिरिक्त बार्बीची दरसुचीची किंमत रू.३३,८५,९३०/- इतकी होती. परंतु सदर प्रस्तावात काही दुरूस्ती करणे आवश्यक असल्यामुळे सदरचा प्रस्ताव दि.१६/९/२०१३ रोजी समक्षात म.जी.प्रा. कडे देण्यात आला. म.जी.प्रा.कडून त्यामध्ये दुरूस्ती करून रक्कम रू.३४,३३,०९७/- चा सुधारित प्रस्ताव मनपा कडे सादर करण्यात आला.

**वसंतटेकडी येथे पंपहाउस बांधणे - रूपये ३४,३३,०९७/-**

वरील नमूद प्रस्ताव सादर करते वेळेस सदरच्या अतिरिक्त बाबीस कामाच्या आवश्यकतेनुसार मनपाच्या स्तरावर सदर बाबीस अनुक्रमांक देणेबाबत तसेच सदरच्या कामाची मुळ अंदाजपत्रकात तरतुद नसल्यामुळे या कामासाठी येणारा खर्च महानगरपालिकेस स्वनिधीमधून करावा लागणार असल्याचे नमूद केले आहे व त्यासाठी मनपा फंडात तरतूद करणे विषयी देखील शिफारस केलेली आहे.

या अनुषंगाने खालीलप्रमाणे सादर करण्यात येते की,

विषयांकित योजनेचे काम प्रगतीपथावर आहे. सदरच्या योजनेचे काम पुर्ण करणेच्या दृष्टीने म.जी.प्रा. मार्फत वर्कींग सर्व्हे करण्यात आलेला आहे. सदरचा वर्कींग सर्व्हेच्या अनुषंगाने विविध उपांगा मध्ये अतिरिक्त कामांचा समोवश करणेचे आवश्यक असल्याचे म.जी.प्रा.मार्फत नमुद करण्यात आले होते. त्यानुसार सदरचा प्रस्ताव त्वरीत सादर करणेबाबत दि.२८/८/२०१३रोजी झालेल्या बैठकीत मा.आयुक्त यांनी सुचित केलेले होते.

या अनुषंगाने म.जी.प्रा.कडून खालीलप्रमाणे नमूद प्रस्ताव प्राप्त झालेले आहेत.

**अतिरिक्त बाब क्र.३ :** वसंतटेकडी येथे पंपहाउस बांधणे- रक्कम रू.३४,३३,०९७/-

विषयांकित योजनेअंतर्गत  मुळानगर, विळद, नागापुर व वसंतटेकडी येथे अस्तित्वात असलेल्या पंपहाउस मध्ये नव्याने प्रस्तावीत असलेले पंप बसविणे शक्य नसल्याचे म.जी.प्रा.मार्फत आढावा बैठकीत सांगण्यात आलेले आहे. या  अनुषंगाने म.जी.प्रा.ने संदर्भिय पत्र क्र.३ नुसार सदरचा प्रस्ताव मनपास सादर केला असून त्यास रक्कम रूपये ३४,३३,०९७/- इतका खर्च अपेक्षित आहे.

वरीलप्रमाणे नमुद अतिरिक्त केलेल्या बाबींचे दरसुचीचा प्रस्तावामध्ये नमुद केलेली कामे मुळ अंदाजपत्रकात समाविष्ट नसल्यामुळे सदर कामांचा अतिरिक्त बाबींचे दरसुची प्रस्ताव करणे क्रमप्राप्त आहे. व निविदा अटी शर्तीनुसार सदरचे कामे मे.तापी प्रिस्ट्रेस प्रोडक्ट JVयांचेकडून करून घेणे आवश्यक आहे.

वरील नमूद अतिरिक्त कामासाठी रू.३४,३३,०९७/-  इतकर अतिरिक्त खर्च अपेक्षित आहे.सदरचा प्राप्त प्रस्ताव मनपाच्या लेखा /ऑडीट विभागाकडून निविदा शर्तीनुसार तपासून घेणे आवश्यक आहे. सदरच्या प्रस्तावास मा. स्थायी समितीची मंजूरी घेणे आवश्यक आहे. तसेच सदरच्या अतिरिक्त बाब क्र.१ ही स्विकृत निविदेचाच भाग राहिल असे ठेकेदारास कळविणे देखील आवश्यक आहे.

करिता

१] म.जी.प्रा.कडून प्राप्त अतिरिक्त बाबीचे लेखा / ऑडीट विभागामार्फत मंजूर निविदा शर्तीनुसार तपासणी होणेस व त्याप्रमाणे रजिस्टरला नोंदी घेणेस

२] वसंतटेकडी येथे पंपहाउस बांधणे कामास रक्कम अतिरिक्त बाबींच्या दरसुची अंतर्गत सदरच्या कामास येणा-या रक्कम रू.३४,३३,०९७/- खर्चास मंजूरी मिळणेसाठी सदर प्रस्ताव मा.स्थायी समितीकडे पाठविणेस

३] विषयांकित काम मे. तापी प्रिस्ट्रेस प्रोडक्ट JV मंजूर अतिरिक्त क्र.२ अंतर्गत करून घेणेस व सदरचे काम हे स्विकृत निविदेचाच भाग राहिल असे ठेकेदारास कळविणेस

४] सदरचे कामास येणा-या खर्चासाठी म.जी.प्रा.च्या शिफासीनुसार मनपा फंडात त्याची तरतुद करणे बाबतची कार्यवाही लेखा विभागामार्फत करणेस

तथापी मंजूरीस्तव ऑफिस रिपोर्ट सविनय सादर.

येणेप्रमाणे कनिष्ठ अभियंता पाणी पुरवठा विभाग यांचा अहवाल असे.

यावर कार्यकारी अभियंता यांचा अभिप्राय की, अहवालातील मुद्दा क्र. (१) (२) (३) (४) अन्वये मान्यतेस सादर.

यावर मु.ले.प. यांचा अभिप्राय की, प्रस्तावाप्रमाणे मान्यतेस्तव सादर.

यावर उपायुक्त (सा.) यांचा अभिप्राय की, प्रस्तावानुसार मान्यतेस्तव सादर.

यावर आयुक्त साहेब यांची अभिप्राय की, मान्य.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती पुढे सभे सादर.

--**--

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- शहर पाणी पुरवठा  योजना फेज-२ योजने अंतर्गत वसंतटेकडी येथे पंपहाउस बांधणे प्रस्ताव विषयी आहे.

मा. श्री. अजिंक्य बारेकर :- ऑफिस रिपोर्ट  वाचून दाखवा.

त्याप्रमाणे ऑफिस रिपोर्ट सभेमध्ये वाचून दाखविण्यात आला.

मा. श्री. दिप चव्हाण :-याकरीता बजेट प्रोव्हीजन आहे का.

मॅके.इंजि. श्री. निकम :-  हा प्रस्ताव मार्चच्या अगोदर पाठवला त्यावेळी बजेट नव्हते.फेज २ मध्ये आहे.

मा.श्री. दिप चव्हाण :- आयुक्तांची मान्यता कधीची आहे. २०१४ ला मान्य झाले होते. जर तुमच्या फेज-२ ला प्रोव्हीजन होती. तर ते १ ते ४ हे शेरे कसे आले हे पैसे कोणत्या याच्यातून वजा करणार.

मॅके.इंजि. श्री. निकम :- अतिरिक्त बाबींचे बजेट प्रोव्हीजनचा हा विषय नाही मनपा हिस्साची तरतूद बजेटला केली आहे त्यातून हा खर्च करणार.

मा.श्री. दिप चव्हाण :- ठिक आहे बजेटला प्रोव्हीजन केली असेल ते दाखवा.

अर्थ विभाग श्री. लोंढे :- सन २०१४-२०१५ ला एक लाख आणि सन २०१३-१४ ला दोन कोटी मनपा हिस्सा आहे.

मा.श्री. दिप चव्हाण :- हिस्सा सांगितले, पैसे आणायचे कुठून रू.११६ कोटी कमी पडतो, परत मनपा फंडातून पैसे मागता हे होणार नाही.

मा.उपायुक्त (कर) श्री. बेहेरे :- बजेटला दुरूस्ती करावी लागेल.

मा.श्री.दिप चव्हाण :- रू. १ लाख बजेट ठेवता रू.३४ लाखाला आमची मंजूरी घेता मंजूरी देणार कशी

मा.उपायुक्त (सा.) श्री. चारठणकर :- यु.आय.डी. मध्ये असेल ना प्रोव्हीजन.

मा.श्री.दिप चव्हाण :- फेज-२ च्या संदर्भात तुमचे पाईप सडत पडले आहे. काम अपूर्ण आहे कुठे कॉक्रीटीकरण झाले मला दाखवा.

मा.श्री. सचिन जाधव :- त्याची मुदत किती होती.

मा.श्री.दिप चव्हाण :- २ वर्ष झाले मुदत संपली.

मा.श्री. सचिन जाधव :- कामात सुसत्रता नाही त्याला ब्लॅक लिस्टमध्ये टाकून दया. ४०, ५० वर्षापूर्वीची लाईन आहे. त्यामुळे लोक आजारी पडले. त्याच्यावर आपण काय कार्यवाही करू शकतो.

मा.श्री. दिप चव्हाण व मा. श्री. अजिंक्य बोरकर :- विषय नंतर घ्या. हा विषय ठेवत असता ना बाकीच्या गोष्टी तपासून पहायला हव्या होत्या.आजची परिस्थिती काय.

मॅके.इंजि. श्री. निकम :- पंप हाउसच काम चालू केले. आयुक्त साहेबांनी आदेश दिले त्यानुसार काम चालू केले.

मा.श्री. दिप चव्हाण व मा. श्री. अजिंक्य बारेकर :- त्याला मंजूरीचे जे काही आहे ते आयुक्त पाहून घेतील, किती तारखेला आयुक्तांनी आदेश दिले.

मॅके.इंजि. श्री. निकम :- पंपहाउस लहान पडत म्हणून आपण बांधकाम चालू केले.

मा.श्री. दिप चव्हाण :- आढावा बैठकीचे व स्थायी समितीच्या विषयाबाबत सांगा. फेज-२ चे काम रू. ११६ कोटीचे आहे.

मॅके.इंजि. श्री. निकम :- ते बांधकामाला पैसे देत नाही.

मा.श्री.दिप चव्हाण :- बजेट प्रोव्हीजनला रू.१ लाख दाखवले आहे.

मा.श्री.सचिन जाधव :- हा लोकांच्या जिव्हाळयाचा प्रश्न आहे हे काम पूर्ण व्हायला पाहिजे.

मा.श्री.दिप चव्हाण :- तुम्ही गॅरटी देता का? तुम्हाला लगेच पाणी येईल.

मा.श्री. सचिन जाधव :- जुन्या लाईनवर ऑपरेट करू शकतात.

मा.सभापती साहेब :- सर्वांनी व्हिजीट दिली. पंपहाउस बांधल्याशिवाय पाणी देता येत नाही. कुठल्याही निधीतून वर्ग पैसे करता येईल.

मा.श्री. दिप चव्हाण :- कोणत्या फंडातून वर्ग करणार ते सांगा.

मा.उपायुक्त (कर) श्री. बेहेरे :- हा प्रस्ताव फेब्रुवारी मध्ये मान्यता दिलेली आहे. पंप हाउस करणे हा गरजेचा विषय आहे म्हणून आपण त्याला मान्यता दिली पाहिजे.

मा.श्री.दिप चव्हाण :- आधीचे कॅफो श्री. शेलारनी बजेट तयार करताना त्याच लक्ष नव्हते हे मान्य करा. पाणीपुरवठया संदर्भात आम्ही बोलतो हा महत्वाचा विषय आहे. तरतूद किती कमी दाखवली आम्ही त्यांना कारणे दाखवा नोटीस व निलंबनाची कार्यवाही करा म्हटले तर तुम्ही काय केले.

मा.श्री. सचिन जाधव :- नगरवासियांना पाणी मिळाले पाहिजे.

मा.श्री.दिप चव्हाण :- तुम्ही तुमची चुक कबूल करा.आणखी काही अडचणी आहेत का ते सांगा. प्रस्ताव मान्य करा पण बजेटची प्रोव्हीजन करा.

मा.श्री. सचिन जाधव :- पुढच्या मिटींगला प्रत्येका समोर माईक पाहिजे. आम्हाला बोलायच असते. आम्ही बोलायच नाही का, लोकांना कावीळ झाली.

मॅके.इंजि. श्री. निकम :- कामाची जशी जशी प्रगती होत जाते,तशा अडचणी समजतात. पहिल्या टप्प्यात जो पाणीपुरवठा होणार तो निश्चितच आहे.

मा.श्री. सचिन जाधव :- आपण निविदा दिली नाही पण तिथे बांधकाम झालेले आहे.

मा.सभापती साहेब :- श्री. सावळे माईकची व्यवस्था व फॅनची व्यवस्था करा.

मा.श्री. संपत बारस्कर :- ऑफीस रिपोर्ट मंजूर करा.

मा. श्री. अजिंक्य बोरकर :- ऑफीस रिपोर्ट मंजूर करा.

मा.सभापती साहेब :- ऑफीस रिपोर्टानुसार सर्वानुमते प्रस्ताव मंजूर करण्यात यावा.

**<u>ठराव :-</u>** ऑफिस रिपोर्टानुसार अहमदनगर महानगरपालिकेचे अहमदनगर शहर पाणी पुरवठा योजना फेज-२ योजने अंतर्गत वसंतटेकडी येथे पंपहाउस बांधणेची अतिरिक्त बार्बीची दरसुची अंतर्गत सदरच्या कामास येणा-या रक्कम रूपये ३४,३३,०९७/- खर्चास ऑफीस रिपोर्ट नुसार ही सभा मान्यता देत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर, खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- मा.श्री. संपत बारस्कर सही /-

अनुमोदक :- मा. श्री. अजिंक्य बोरकर सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती,
स्थायी समिति
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

**मा. स्थायी समिती सभा क्रमांक- ८**

विषय क्रमांक- ८८ बुधवार दि.१०/०९/२०१४

ठराव क्रमांक- ८८ बुधवार दि.१०/०९/२०१४

**प्रस्तावाचा विषय :-** मा.महाराष्ट्र शासन परिपत्रकानुसार रक्त आणि रक्त घटक पुरवठा यासाठी आकारण्यात येणा-या सुधारित सेवा शुल्काबाबतचा ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-** अहमदनगर महानगरपालिका रक्तपेढी विभाग

संदर्भ :-१] केंद्र शासनाच्या आरोग्य व कुटुंब कल्याण विभागाच्या मार्गदर्शक सुचनापत्र क्र.एस-१२०१६ /०१/२०१२ नॅको (एनबिटीसी), दि.१२ फेब्रुवारी २०१४

२] सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन परिपत्रक क्र.रा.से.२०१३ २०१३/प्र.क्र.-२२४/आ-५ दि.१८/६/२०१४

३] संचालक, राज्य रक्तसंक्रमण परिषद पत्र क्र.रा.र.संप/राष्ट्रीय रक्तधोरण/२०१४/४६३, दि.१९ जून २०१४

उपरोक्त विषयान्वये सादर करण्यात येते की, अहमदनगर महानगरपालिका स्थायी समितीच्या दि.२२/६/२०१० ठराव क्र.४७ अन्वये महानगरपालिका रक्तपेढी मध्ये रक्त / रक्त घटकाचे सेवा शुल्क ठरविण्यात आलेले असुन ते खालील तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे आहेत.

| अ.क्र. | तपशिल | सवलत पत्र असल्यास | सवलत पत्र नसल्यास |
|---|---|---|---|
| १ | Whole Blood | ३५०/- | ५००/- |
| २ | P.C.V. | ३५०/- | ५००/- |
| ३ | Platelets | ३५०/- | ५००/- |
| ४ | F.F.P. | ३५०/- | ५००/- |

संदर्भ क्र. १ नुसार राज्यातील जनतेला रक्त पुरवठा व्यवस्थीत रित्या होण्याकरिता तसेच राष्ट्रीय रक्त धोरणाची अंमलबजावणी योग्य रित्या होण्याकरिता राज्यातील धर्मदाय संस्था संचालीत व खाजगी रक्त पेढयांमार्फत रक्त व रक्त घटक पुरवठा या साठीचे सेवा शुल्क निश्चित करण्यात आले होते.त्यानुसार यापुढे राज्यातील सर्व शासकीय / धर्मदाय संस्था संचालीत / खाजगी रक्तपेंढयानी रक्त व रक्त घटक पुरवण्यासाठी पुढील रकान्यात नमुद केल्याप्रमाणे सेवा शुल्क आकारण्यात यावे.

| Sr No | Description | Existing Govt. Charges | Recived Government charges as per NBTC Guidelines |
|---|---|---|---|
| 1 | Whole Blood | Rs.450/- Per unit | Rs.1050/- Per unit |
| 2 | Packed Red Cell | Rs.450/- Per unit | Rs.1050/- Per unit |
| 3 | Fresh Frozen Plasma | Rs.450/- Per unit | Rs.300/- Per unit |
| 4 | Platelat Concentrate | Rs.450/- Per unit | Rs.300/- Per unit |
| 5 | Cryoperecipitate | Rs.450/- Per unit | Rs.200/- Per unit |

तसेच राष्ट्रीय रक्तसंक्रमण परिषद, नवी दिल्ली यांनी दिलेल्या मार्गदर्शक सुचनांनुसार राज्यातील सर्व रक्तपेढयांनी खाली नमुद आजारांनी बाधीत रूग्णास मोफत रक्त पुरवठा करणे बंधनकारक राहील.

१) थॅलेसिमीया आजाराने बाधीत रूग्ण.

२) हिमोफिलीया आजाराने बाधीत रूग्ण.

३) सिकलसेल ॲनेमिया आजाराने बाधीत रूग्ण.

४) इतर रक्ताशी निगडीत आजार (ज्या आजारात रूग्णास जिवीत राहण्यासाठी वारंवार रक्तसंक्रमण करावे लागते, अशा आजाराने बाधीत रूग्ण)

तसेच राष्ट्रीय रक्तसंक्रमण परिषद नवी दिल्ली यांनी दिलेल्या मार्गदर्शक सुचनांचे पालन सर्व रक्तपेंढयांनी करणे बंधन कारक असुन रक्त व रक्तघटक पुरवठया साठी वरील सुधारीत सेवा शुल्क आकारणे बंधन कारक आहे. या नुसार कार्यवाही न करणा-या रक्त पेंढयांवर नियमानुसार कडक कारवाई करण्यात येईल. असे ही नमुद करण्यात आलेले आहे.

तसेच रक्तपिशवी वरील वेगवेगळया विशेष चाचण्यासाठीचे दर ही २५ जुन रोजी पारित केलेल्या शासनाच्या परिपत्रकामध्ये नमुद केलेला आहे. परंतु त्या विशेष चाचण्यांची सुविधा आपल्या रक्तपेढी मध्ये उपलब्ध नाही. परंतु रक्तपिशवी वरील सर्व आवश्यक चाचण्या केल्या असता सध्या प्रती रक्त पिशवी रक्त दाता असल्यास रू.३५०/- व रक्तदाता नसल्यास रू.५००/- असा दर आकारण्यात येतो. पंरतु शासनाच्या निर्देशनुसार आपल्या रक्तपेढी मधील Whole Blood (संपुर्ण रक्त ) याचा दर रक्तदाता असल्यास रूपये ९००/- तर रक्तदाता नसल्यास रूपये १०५०/- प्रति पिशवी होउ शकतो.

तरी वर नमुद केलेल्या तक्त्यानुसार संपुर्ण रक्त तसेच ईतर रक्तघटक यांची साठीचे सेवा शुल्क आकरणे बाबतचा धोरणात्मक निर्णय घेणेस प्रस्ताव मा. स्थायी समितीकडे ठेवण्यास मान्येतेस्तव सादर.**/अ**

**सोबत-** १. शासनाचे परिपत्रक दि.१८/६/२०१४ , २. मा.स्थायी समिती ठराव दि.२२/६/२०१० प्रस्ताव क्र.४७

येणेप्रमाणे रक्त संक्रमण अधिकारी यांचा अहवाल असे.

यावर वैदयकीय आरोग्यधिकारी यांचा अभिप्राय की, प्रस्तावीत **"अ"** प्रमाणे संदर्भित शासन परिपत्रक क्रमांक रा.से.२०१३/प्र.क्र.-२२४/आ-५, दि.१८/६/२०१४ अन्वये राष्ट्रीय रक्तसंक्रमण परिषद , नवी दिल्ली यांचे सुचनाप्रमाणे शासकीय / धर्मदाय संस्था सचालित व सर्व खाजगी रक्तपेढी मधील रक्त व रक्त घटक सेवा शुल्कामध्ये वाढ करणेबाबत कार्यवाही निर्देशित केलेली आहे. ज्या अनुषंगाने महापालिका ही संस्था स्थानिक स्वराज्य संस्था असल्याने व सदरची रक्तपेढी महापालिका स्वनिधीतून चालवित असल्याने उपरोक्त शुल्कात वाढ करणेबाबत सदरचा विषय मा. स्थायी समितीमध्ये चर्चेस्तव व शुल्क निश्चित करणेसाठी घेणे योग्य राहील तरी मान्यतेस्तव तथापी आदेशार्थ सविनय सादर.

यावर मुख्यलेखापरिक्षक यांचा अभिप्राय की, प्रस्तावाप्रमाणे महानगरपालिकेच्या रक्तपेढी विभागाने रक्त व रक्त घटक पुरवठा यासाठी मा. महाराष्ट्र शासन , सार्वजनिक आरोग्य विभाग शासन परिपत्रक क्रमांक रा.से.२०१३/प्र.क्र.-२२४/आ-५, दि.१८/६/२०१४ अनुसार सुधारित सेवा शुल्क आकारणेकरिता मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ९९ प्रमाणे दर व कराबाबत निर्णय घेणेकरिता मा.स्थायी समिती समोर ठेवणेस मान्यतेस्तव सादर.

यावर मा.उपायुक्त साहेब यांचा अभिप्राय की, विभागाने प्रस्तावीत केल्यानुसार प्रस्ताव चर्चेसाठी मे.स्थायी समिती सभेत निर्णयार्थ देणेबाबत मे.आदेशार्थ सविनय सादर.

यावर मा.आयुक्त साहेब यांचा अभिप्राय की, सहमती दर्शक सही

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--**--

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- रक्त आणि रक्त घटक पुरवठा यासाठी आकारण्यात येणा-या सुधारित सेवा शुल्काबाबत विषयी प्रस्ताव आहे.

मा. श्री. दिप चव्हाण :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवा.

त्याप्रमाणे ऑफिस रिपोर्ट सभेमध्ये वाचून दाखविण्यात आला.

मा.श्री. दिप चव्हाण :- दर कर वाढवण्याची तरतूद जर २० फेब्रुवारी पुर्वी वाढवायची तर आता न घेता २० फेब्रुवारी वेळी घेउ.

मा.उपायुक्त (कर) श्री. बेहेरे :- ही कर आकारणी नाही सेवा शुल्क आहे.

मा.श्री.दिप चव्हाण :- याबाबत ९९ कलमानुसार मार्गदर्शन मागवून पुढच्या सभेत ठेवा.

मा.श्री.अजिंक्य बोरकर :- हा विषय पुढील सभेमध्ये ठेवा.

मा.श्री. संपत बारस्कर :- हा विषय पुढील सभेमध्ये ठेवा.

मा.सभापती साहेब :-महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम ९९ च्या संदर्भाने मा.शासनाकडून मार्गदर्शन मागवून घेउन नंतर निर्णयानुसार विषय करावा. हा विषय पुढील स्थायी समिती पुढे सभेमध्ये घ्या.

**ठराव :-** ऑफीस रिपोर्ट मध्ये नमुद केलेल्या संदर्भीय शासन निर्णय आणी परिपत्रके यानुसार अहमदनगर महानगरपालिकेच्या रक्तपेढी मधून वितरीत करण्यात येणा-या रक्ताच्या व रक्त घटकांचे सुधारीत शुल्क आकारणी करता येईल किंवा कसे याबाबत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम ९९ च्या संदर्भाने मा.शासनाकडून मार्गदर्शन मागवून घेउन नंतर निर्णयार्थ स्थायी समिती पुढे ऑफीस रिपोर्ट सादर करावा.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- मा.श्री.अजिंक्य बोरकर सही /-

अनुमोदक :- मा.श्री. संपत बारस्कर सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

**मा. स्थायी समिती सभा क्रमांक- ८**

विषय क्रमांक- ८९ बुधवार दि.१०/०९/२०१४

ठराव क्रमांक- ८९ बुधवार दि.१०/०९/२०१४

**प्रस्तावाचा विषय :-** श्री. श्रीकांत अनारसे, मुख्यलेखापरिक्षक यांचे अर्जानुसार अहमदनगर महानगरपालिकेचे मुख्य लेखा परिक्षक यांना कार्यालयीन कामकाजासाठी स्वतःचे वाहन वापरले बाबत वाहन वापर खर्चाची प्रतिपूर्ती देणेबाबतचा ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-** अहमदनगर महानगरपालिका मोटार व्हेईकल विभाग

संदर्भ :- १. मा. मुख्यलेखा परिक्षक यांचा वाहन उपलब्ध होणे बाबतचा अर्ज दि.२६/३/२०१४

२. मा. स्थायी समिती ठराव क्र.८० दि.२५/१/२०१२

३. मा.स्थायी समिती ठराव क्र.१३६ दि.२३/१०/२०१३

उपरोक्त संदर्भ व विषयान्वये विनंती रिपोर्ट सादर करण्यांत येतो की, अहमदनगर महानगरपालिकेचे मुख्यलेखा परिक्षक श्री. श्रीकांत अनारसे यांनी संदर्भिय क्र.१ इकडेस देउन दि.६/३/२०१४ रोजी मुख्य लेखा परिक्षक अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर या पदावर रूजू झाल्याने महानगरपालिकेचे भाडे करारावरील वाहन उपलब्ध करून देण्यात आलेले आहे. संदर्भिय क्र.२ व ३ नुसार महानगरपालिकेचे कार्यालयीन कामासाठी स्वतःचे वाहन वापरापोटी वाहन भत्ता देणेबाबत निर्णय घेण्यात आला आहे. तसेच भाडे करारावरील वाहनाचे प्रती माह मंजूर दर व मासिक सरासरी इंधन खर्च विचारात घेता स्वतःचे वाहन वापरणे आर्थिक दृष्टीकोनातुन भाडेकारारावरील वाहन उपलब्ध करून देणे अथवा स्वतःचे वाहन सेवरोल बीट पेट्रोल एमएच-२०/७४०३ वापरणे बाबत आवश्यक ती कार्यवाही व्हावी. असे म्हटले आहे.

या अनुषंगाने सादर की, महानगरपालिकेचे मा. पदाधिकारी व अधिकारी यांना शासन निर्णय क्र.वाहन /१००५/प्र.क्र.१३/२००५ विनियम मंत्रालय, मुंबई -३२ दि.२५/५/२००५ चा आधार घेवून संदर्भिय पत्र क्र.२ व ३ पारित ठरावान्वये वाहन वापराबाबत प्रतिपूर्ती देणेबाबत ठरावात नमूद करण्यांत आलेले आहे. महानगरपालिकेचे मुख्य लेखा परिक्षक यांना वाहन प्रतिपूर्ती देणे झाल्यास मा. स्थायी समिती यांची मंजूरी आवश्यक राहील. मुख्य लेखा परिक्षक यांना सुविधा पुरविणे बाबत अधिनियम १९४९ क ४७ नुसार मा. स्थायी समितीला अधिकार आहेत.

सद्यस्थितीत भाडेकरारावरील वाहन मुख्य लेखा परिक्षक यांचे कार्यालयीन कामकाजासाठी उपलब्ध करून देण्यांत आले आहे. परंतु त्यांची स्वतःचे वाहन कार्यालयीन कामकाजासाठी वापरून त्याबदली वाहनभत्ता दिल्यास महानगरपालिकेचे हिताचे ठरेल.

याकरिता मुख्य लेखा परिक्षक श्री. श्रीकांत अनारसे यांना महानगरपालिकेचे कार्यालयीन कामकाजासाठी स्वतःचे वाहन वापरून त्याबदली प्रतिपूर्ती मंजूर करणेकामी सदरचा प्रस्ताव मा. स्थायी समिती यांचेकडे पुढील निर्णयास्तव ठेवणेबाबत मंजुरीस्तव सविनय सादर.

येणेप्रमाणे मोटार व्हेईकल क्लार्क यांचा अहवाल असे.

यावर मा.मॅके.इंजि. पा.पु.वि.प्रमुख यांचा अभिप्राय की, अहवालानुसार मंजुरीस्तव सादर.

***

सादर, लेखापरिक्षण विभाग

विषय - मुख्यलेखापरिक्षक पदास वाहन उलपब्ध करून देणेबाबत.
संदर्भ - मनपा अधिनियम क ४७ (क)

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ , क ४५ (अ) व मनपा (सुधारित) अधिनियम २०११ क्रमांक १२ क. ५ अन्वये राज्य शासनाकडील उपसंचालक दर्जाच्या अधिका-याची सन १०/३/२०११ पासून महानगरपालिकेच्या मुख्यलेखापरिक्षक म्हणून नियुक्तीबाबत तरतूद आहे. त्या अनुषंगाने आता राज्य शासनाकडून उपसंचालक, महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा, वर्ग १(वरिष्ठ) या संवर्गातील अधिका-याची मुख्यलेखपरिक्षक या पदावर प्रतिनियुक्तीने नियुक्ती केली जाते.

सदरहू पद हे संवैधानिक दर्जाचे असून मनपा अधिनियम १९४९ स्थित तरतुदीनुसार लेखा परिक्षणाच्या कामकाजाकरीता निर्माण करण्यात आले आहे. लेखा परिक्षण कामकाजाच्या दृष्टीने जमा रक्कम, खर्च बाजूचे लेखा परिक्षणासाठी विविध विभाग, प्रभाग, जेथे आवश्यक वाटेल त्या ठिकाणी लेखा परिक्षण करणे, अभिलेखले उपलब्ध करून देणेबाबत तरतुदी आहेत. कामकाजाच्या अनुषंगाने इतर विभाग प्रमुखां प्रमाणे सदरहू संवैधानिक पदास देखील वाहन असणे गरजेचे ठरते.

मनपा अधिनियम १९४९ चे क ४७(क) नुसार मुख्य लेखा परिक्षक यांच्या सेवा पारिश्रामिक विशेषाधिकार व या संबंधीचे सर्व प्रश्नांचा निकाल करणे, निर्णय घेण्याचे स्थायी समितीस अधिकार आहेत. त्या अनुषंगाने मुख्य लेखा परिक्षक पदास वाहन सुविधा अनुज्ञेय करणेबाबत कार्यवाही व्हावी.

यापूर्वी स्थायी समिती ठराव क्र.८०, दि.२५/१/२०१२ , ठराव क्र.१२४ /२०१३ अन्वये मनपा सन्माननिय पदाधिकारी, अधिकारी यांना वाहन सुविधा लागू करण्यात आली आहे.

विविध पदांना वाहन अनुज्ञेय असल्यास स्थानिक प्राधिकरणाकडील उपलब्ध वाहने पुरविण्यात येतात. वाहने उपलब्ध नसल्यास वाहन उपलब्ध करून देणे क्रमप्राप्त ठरते. वाहन उपलब्धेतसाठी दोन पर्याय उपलब्ध ठरतात. वाहन भाडयाने उपलब्ध करून देणे अथवा स्वतःचे वाहन असल्यास, ते वापरण्यास परवानगी देवून होणा-या खर्चासाठी प्रतिपूर्ती देणे यापैकी आर्थिक दृष्टीकोनातून हितावह पर्याय स्विकृत करून उपरोक्त ठरावान्वये मान्यता देण्यात आल्याचे दिसून येते.

अधिका-यांसाठी पुरेशी वाहने उपलब्ध नसल्याचे उक्त ठराव व वाहन विभागाच्या संचिकेवरून दिसून येते. व खाजगी वाहनापेटी येणा-या खर्चापेक्षा स्वतःचे वाहन असल्याने, त्या वापरापोटी येणा-या खर्चाच्या प्रतिपूर्तीची रक्कम (डिझेल वाहन २००००/- रू. प्रतिमाह, पेट्रोल वाहन २२०००/- रू. प्रतिमाह) कमी असल्याने वाहन वापराची प्रतिपूर्ती देणे आर्थिक हिताच्या दृष्टीने फायदयाचे असल्याने स्थायी समिती ठराव क्र.१२४ /२०१३ अन्वये घेतलेला निर्णय प्राधिकरणासाठी आर्थिक दृष्टया हितकारक असून खर्चात बचत करणारा आहे.

मुख्य लेखा परिक्षक पदासाठी वाहन अनुज्ञेय ठरविल्यास खालील तीन पर्याय उपलब्ध आहेत.

नवीन वाहन खरेदी

आर्थिक दायित्व :- रू. ६.०० लक्ष + वाहनचालक पद व वेतन (रू.२००००/-) (कायमचे दायित्व, वेतन, निवृत्ती वेतन, अतिकालिन भत्ता, विविध प्रतिपूर्ती )+ इंधन खर्च

खरेदी खर्च :- रू. ६.०० लक्ष

वार्षिक खर्च :- इंधन : ९०००/- (प्रतिमाह)

(अंदाजे) :- वेतन : २५०००/-

विमा, देखभाल, दुरूस्ती इ. :- ६०००/-

४००००/- x १२ = ४८००००/-

खाजगी वाहन

खरेदी खर्च :- निरंक

वार्षिक खर्च :- इंधन : १४०००/- (प्रतिमाह)

(प्रत्यक्ष झालेल्या खर्चानुसार ) :- भाडे : १५७५०/-

२९७५०/- x १२ = ३५७०००/-

स्ववाहन प्रतिपूर्ती

खरेदी खर्च :- निरंक

वार्षिक खर्च :- इंधन : ९०००/-

(अंदाजे ) :- चालक : ८०००/-

विमा ,देखभाल दुरूस्ती इ. :- ५०००/-

२२०००/- x १२ = २६४०००/-

वार्षिक खर्च :-

प्राधिकरणाचे वाहन :- रू.४८००००/- (चालक-कायम दायित्व)

खाजगी वाहन :- रू. ३५७०००/-

स्ववाहन प्रतिपूर्ती :- रू.२६४०००/-

मुख्यलेखापरिक्षक श्री. अनारसे श्री. शं. यांचेकडे शेवरोल बीट MH२० BN७४०३ हे स्वतःचे पेट्रोल वाहन असून स्वतःचे वाहन वापरण्याची सुविधा दिल्यास भाडेतत्वावरील वाहनापेक्षा साधारणतः रू.९३०००/- रकमेची प्रतिवर्षी महानगरपालिकेची बचत होणार असल्याने स्वतःचे वाहन वापरास परवानगी देणे महानगरपालिकेच्या आर्थिक हिताच्या दृष्टीने संयुक्तीक ठरेल. सबब मनपा आर्थिक हिताच्या दृष्टीने स्थायी समितीमध्ये निर्णय होणेस हरकत नाही.

येणेप्रमाणे मुख्यलेखापरिक्षक यांचा अहवाल असे.

यावर मा.उपायुक्त यांचा अभिप्राय की, विभागाने प्रस्तावीत केलेनुसार श्री. अनारसे सोा., मुलेप यांनी त्यांना महाराष्ट्र प्रांतिक मनपा अधिनियम १९४९ चे कलम ४७(क) त्यांना देय सुविधांबाबत तरतुदी करणेसाठी यथाप्रस्तावीत "अ" नुसार विषय मे. स्थायी समिती सभेत घेणे उचित होईल. मे. आदेशार्थ स.सादर.

यावर मा.आयुक्त साहेब यांचा सहमती दर्शक सही

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--**--

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- मुख्य लेखा परिक्षक यांना कार्यालयीन कामकाजासाठी स्वतःचे वाहन वापरले बाबत वाहन वापर खर्चाची प्रतिपूर्ती देणे विषयी प्रस्ताव आहे.

मा. श्री. अजिंक्य बोरकर :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवा.

त्याप्रमाणे ऑफिस रिपोर्ट सभेमध्ये वाचून दाखविण्यात आला.

मा.उपायुक्त (सा.) श्री. बेहेरे :- यामध्ये श्री. चारठणकर साहेब यांच्यासह नाव समाविष्ठ करावे.

मा.सभापती साहेब :- श्री. चारठाणकर सोा. चे नाव यामध्ये समाविष्ठ करा. विषयाला वाहन प्रतिपूर्ती बाबत मंजूरी देण्यांत येत आहे.

मा.श्री.संपत बारस्कर :- मुख्यलेखापरिक्षक श्री.श्रीकांत अनारसे यांना आणि श्री.अजय चारठाणकर मा. उपायुक्त, यांचे वाहन वापर खर्चाची प्रतिपूर्ती देण्यास मंजूरी देण्यात यावी.तसेचऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.श्री.अजिंक्य बोरकर :- श्री.अजय चारठाणकर मा. उपायुक्त, यांचे वाहन वापर खर्चाची प्रतिपुर्ती देण्यासह ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.सभापती साहेब :- श्री.अनारसे साहेब ऑडीटर व श्री.चारठाणकर साहेब,उपायुक्त यांना वाहन खर्च प्रतिपुर्ती सर्वानुमते मंजूरी देण्यांत यावा.

**ठराव :-** श्री. श्रीकांत अनारसे, मुख्यलेखापरिक्षक यांचे अर्जानुसार तसेच सभागृहात झालेल्या चर्चेनुसार श्री.अजय चारठाणकर,उपायुक्त यांना अहमदनगर महानगरपालिकेचे कार्यालयीन कामकाजासाठी स्वतःचे वाहन वापरले बाबत वाहन वापर खर्चाची प्रतिपूर्ती देणेबाबत मा.सभेमध्ये झालेल्या चर्चेनुसार तसेच ऑफिस रिपोर्टानुसार महानगरपालिकेचे कार्यालयीन कामकाजासाठी स्वतःचे वाहन वापरून त्याबदली प्रतिपूर्ती देण्यास ही सभा मान्यता देत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर, खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- मा.श्री. संपत बारस्कर सही /-

अनुमोदक :- मा.श्री. अजिंक्य बोरकर सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

**मा. स्थायी समिती सभा क्रमांक- ८**

विषय क्रमांक- ९० बुधवार दि.१०/०९/२०१४

ठराव क्रमांक- ९० बुधवार दि.१०/०९/२०१४

**प्रस्तावाचा विषय :-**मा.स्थायी समिती ठराव क्र.१२ दि.०२/०६/२०१४ अन्वये अहमदनगर महानगरपालिका हददीतील पाईपलाईन रस्त्यावरील मनमाड रस्त्याजवळील पुलाचे रूंदीकरण करणेबाबतचा फेरसादर.

**प्रस्तावाचा मजकुर :-** अहमदनगर महानगरपालिका सार्व. बांधकाम विभाग

फेरसादर,

मा.छाननी समितीने केलेल्या शिफारशीनुसार सदरची निविदा ठेकेदार मे.ए.सी.कोठारी यांना निविदा दरापेक्षा २६.९३% जादा दराने देणेस सदरची निविदा मंजुरीस्तव तथा मा. स्थायी समितीसमोर निर्णयास्तव पाठविणेस मा.आयुक्त यांनी दि.१७/५/२०१४ रोजी मान्यता दिल्यानुसार सदरची निविदा मा.स्थायी समितीसमोर निर्णयास्तव सविनय सादर केली असता मा. स्थायी समितीने ठराव क्र.१२ दि.०२/०६/२०१४ अन्वये खालील प्रमाणे ठराव करून इकडेस पाठविला आहे.

**ठराव :-** अहमदनगर महानगरपालिका हद्दतील पाईप लाईन रस्त्यावरील मनमाड रस्त्याजवळील पुलाचे रूंदीरकण करणेकामी मागविण्यात आलेल्या निविदा दराचा तुलनात्मक तक्ता व त्यावरील ऑफिस रिपोर्ट यावर ठराव करण्यात येतो की, काम प्रस्तावीत केल्याचा दिनांक तत्कालिन दर व सद्यस्थितील दर या बाबत विभागाने अद्यावत रिपोर्टसह स्थायी समितीकडे हा प्रस्ताव फेरसादर करावा.

तरी वरील नमुद मा.स्थायी समितीच्या ठरावान्वये तत्कालीन दर व सद्यस्थितील दर याबाबत निविदेबाबतच्या खर्चाचा तपशिल खालीलप्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| १२ | तत्कालिन दरानुसार येणारी किंमत | रू. ७१,२०,३२१/- |
| १३ | सुधारित देकारानुसार येणारी किंमत | रू. ९०,३७,८२३/- |
| १४ | चालु दरसुचीसां.बां.वि.२०१३-१४अनुसार कामाची किंमत (अदयावत) | रू.८९,६०,०४१/- |
| १५ | ठेकेदाराची सुधारीत किंमत व कामाची अद्यावत किंमत या मधील फरक | रू.७७,७८२/- |
| १६ | चालु दरसुची नुसार अधिक्याची टक्केवारी ( १५/१३ x १०० ) | ०.८६८% जादा |

तरी मा. छाननी समितीने केलेल्या शिफारशीनुसार तसेच मा. स्थायी समितीच्या ठरावान्वये मागणी केल्यानुसार निविदाबाबतचा तत्कालिन दर व सद्यस्थितील दर याबाबतच्या तक्त्यासह सदरची निविदा ठेकेदार मे.ए.सी.कोठारी यांना निविदा दरापेक्षा २६.९३% जादा दराने देणेस सदरची निविदा मंजुरीस्तव तथा मा.स्थायी समितीसमोर निर्णयास्तव पाठविणेस सविनय सादर.

येणेप्रमाणे कनिष्ठ अभियंता यांचा अहवाल असे.

यावर मा. शहर अभियंता यांचा अभिप्राय की, मान्यतेस सादर.

यावर मुख्य लेखापरिक्षक यांचा अभिप्राय की, प्रस्तावाप्रमाणे मा. छाननी समितीचे शिफारसीनुसार व मा. स्थायी समिती ठराव क्र.१२ दि.२/६/२०१४ चे ठरावाप्रमाणे निविदाबाबतचे तत्कालीन दर व चालू दरसुचीनुसार सद्यस्थितीतील दर याबाबतच्या तक्त्यासह सदरची निविदा निविदा दरापेक्षा २६.९३% जादा दराची निविदा दर मान्यतेकरिता मा.स्थायी समिती समोर निर्णयास्तव ठेवणेस हरकत नाही.

यावर मा.उपायुक्त (सा.) यांचा अभिप्राय की, विभागाने प्रस्तावीत केलेनुसार व मा. छाननी समितीच्या शिफाशीनुसार सन २०१३-२०१४ चे DSR नुसार सदर काम ०.८६% जास्तीचे दराने असलेला प्राप्त निविदा दरपत्रक मंजुरीस्तव मे. स्थायी समिती सभेत निर्णयास्तव ठेवणेबाबत मे. आदेशार्थ स. सादर.

यावर मा.आयुक्त साहेब यांचा सहमती दर्शक सही

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--**--

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- पाईपलाईन रस्त्यावरील मनमाड रस्त्याजवळील पुलाचे रूंदीकरण करणे.ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवा.

त्याप्रमाणे ऑफिस रिपोर्ट सभेमध्ये वाचून दाखविण्यात आला.

मा.श्री.अजिंक्य बोरकर :- मागची निविदा काय होती.

मा.उपायुक्त (कर) श्री. बेहेरे :- मागील वेळी आताच्या DSR प्रमाणे सादर करा असे सांगितले.आपण आता सध्याच्या नुसार केले आहे.

मा.श्री.अजिंक्य बोरकर :- कामाचा कालावधी ठरवला पाहिजे.

शहर अभियंता श्री. मगर :- आपण त्याला मुदतवाढ देणार नाही असे करारात आहे. म्हणून ९ महिन्याची मुदत आहे सहा महिन्यातच काम पूर्ण करू. करंटचे रेट येतात

मा.श्री. दिप चव्हाण :- परत तो त्यावेळेचे DSR मागेल. अर्धवट काम करून रेट वाढवू नका.

शहर अभियंता श्री. मगर :- बदल करता येत नाही.

मा.श्री. अजिंक्य बोरकर :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.श्री.संपत बारस्कर :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.सभापती साहेब ऑफस रिपोर्ट सर्वानुमते मंजूरी करण्यांत यावा.

**ठराव:-** फेरसादर ऑफिस रिपोर्टानुसार अहमदनगर महानगरपालिका हददीतील पाईपलाईन रस्त्यावरील मनमाड रस्त्याजवळील पुलाचे रूंदीकरण करणेकामी, मागविण्यात आलेल्या निविदांपैकी मा. छाननी समितीने केलेल्या शिफारशीनुसार कमीचे दराचे निविदा धारक ठेकेदार मे.ए.सी.कोठारी यांच्या सदरच्या निविदेस,निविदा दरापेक्षा २६.९३%जादा दराच्या (सन२०१३-२०१४ चे DSR नुसार सदर काम ०.८६ % जास्तीचे दराने) निविदेस ही सभा मान्यता देत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर, खर्च मंजूर नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- मा.श्री. अजिंक्य बोरकर

अनुमोदक :- मा.श्री. संपत बारस्कर

ठराव सर्वानुमते मंजूर.

सभापती<br>
स्थायी समिती<br>
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

**मा. स्थायी समिती सभा क्रमांक- ८**

विषय क्रमांक- ९१ बुधवार दि.१०/०९/२०१४

ठराव क्रमांक- ९१ बुधवार दि.१०/०९/२०१४

**प्रस्तावाचा विषय :-** मा.स्थायी समिती ठराव क्र.१० दि.०२/०६/२०१४ अन्वये अहमदनगर महनगरपालिकेचे पाणी पुरवठा विभाग अत्यावश्यक सेवेसाठी कंत्राटी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात कनिष्ठ अभियंता (सिव्हील) व (मॅकेनिकल) या पदांवर तांत्रिक खंड देवुन अटी व शर्ती नुसार सहा महिन्याकरीता मानधनावर केलेल्या संबधितांच्या करारबध्द पुर्ननियुक्तीस कार्योत्तर मंजुरी मिळणेबाबतचा फेरसादर.

**प्रस्तावाचा मजकुर :-** अहमदनगर महानगरपालिका आस्थापना विभाग

संदर्भः-१]मा.मॅकेनिकल इंजि.पा.पु.विभाग प्रमुख यांचेकडील जा.क्र.पाणी पुरवठा विभाग १७७७ दि.२८/३/२०१४ अन्वयेचा प्रस्ताव

२] संदर्भ क्र.१ च्या अहवालावर जा.क्र.आस्था./ कंत्राटी करारबध्द नेमणूक ७७९ दिनांक २५/४/२०१४ व जा.क्र.आस्था./कंत्राटी करारबध्द नेमणूक ७८० दिनांक २५/४/२०१४ अन्वयेचा कार्यालयीन आदेश.

३] जा.क्र.आस्था./वर्क. ८१ दि.५/५/२०१४ अन्वये कार्योत्तर मंजूरी मिळणे करीता मा. स्थायी समितीकडे पाठविलेला प्रस्ताव

४] मा. स्थायी समिती ठराव क्र. १० दि.२/६/२०१४ अन्वये पारित झालेला ठराव

विनंती अहवाल सादर करण्यांत येतो की, संदर्भ क्र.१ नुसार मा. मॅकेनिकल इंजि. पा.पु. विभाग प्रमुख यांनी त्यांचे कडील जा.क्र.पा.पु.वि.१७७७ दि.२८/३/२०१४ अन्वये प्रस्ताव सादर करून त्यामध्ये पाणी पुरवठा विभागामार्फत मा.केंद्र शासनाच्या व मा.राज्य शासनाच्या विविध योजने अंतर्गत वेगवेगळया योजना राबविण्यात येत आहे. केडगाव प्रभाग पाणी पुरवठा योजना, अहमदनगर शहर पाणी पुरवठा योजना टप्पा-२ अहमदनगर शहर भुयारी गटार योजना दलित वस्ती पाणी पुरवठा योजना वितरण व्यवस्था इत्यादी महत्वपुर्ण योजनांची विविध प्रकारची कामे प्रगतीपथावर असुन या अनुंषगाने या विभागास अभियंत्याची आवश्यकता आहे. तद्नंतर कंत्राटी अभियंत्याच्या विनंती अर्जावर सहानुभुतीपुर्वक विचार व्हावा. असे नमुद केलेले होते.

त्यानुषंगाने पाणी पुरवठा विभाग अत्यावश्यक सेवेसाठी कंत्राटी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात कनिष्ठ अभियंता (सिव्हील) व (मॅकेनिकल) यापदी जा.क्र.आस्था./कंत्राटी करारबध्द नेमणूक७७९ दिनांक २५/४/२०१४ अन्वये राहुल सदाशिव गिते व इतर ३ यांची तांत्रिक खंड देवून दि.२५/४/२०१४ पासुन सहा महिन्याकरीता व तसेच जा.क्र.आस्था./कंत्राटी करारबध्द नेमणूक ७८० दि.२५/४/२०१४ अन्वये बल्लाळ किरण सुरेश यांची तात्पुत्या स्वरूपात कनिष्ठ अभियंता (मॅकेनिकल) या पदी तांत्रिक खंड देवुन दि.२०/५/२०१४ पासून सहा महिन्याकरिता कंत्राटी करारानुसार अटी व शर्ती प्रमाणे दरमहा मानधनावर मा.स्थायी समिती ठराव क्र.२८ दि.४/५/२०१३ च्या पारित ठरावा मधील परिच्छेद क्रमांक २ मध्ये नमूद केल्यानुसार पाणी पुरवठा विभागामध्ये करारबध्द पुर्ननियुक्ती करण्यात आलेली होती.

मा.स्थायी समिती ठराव क्र. २८ दि.४/५/२०१३ च्या पारित ठरावाच्या अनुषंगाने पाणीपुरवठा विभाग अत्यावश्यक सेवेसाठी कंत्राटी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात कनिष्ठ अभियंता (सिव्हील ) व (मॅकेनिकल) यापदी जा.क्र.आस्था./कंत्राटी करारबध्द नेमणूक ७७९ दि.२५/४/२०१४ व जा.क्र.आस्था./कंत्राटी करारबध्द नेमणूक७८०दि.२५/४/२०१४अन्वये संबधितांची तांत्रिक खंड देवून सहा महिन्याकरिता केलेल्या मानधनावरील

कराररबध्द पुर्ननियुक्तीस कार्योत्तर मंजुरी मिळणे करीता सदरचा प्रस्ताव हा मा.स्थायी समितीकडे जा.क्र.आस्था./वर्क. ८१ दि.५/५/२०१४ अन्वये पाठविण्यांत आलेला होता.

तथापि सदर प्रस्तावावर मा.स्थायी समितीने ठराव क्र.१० दि.२/६/२०१४ अन्वये खालील प्रमाणे ठराव पारित केलेला आहे.

पाणी पुरवठा विभाग अत्यावश्यक सेवेसाठी कंत्राटी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात कनिष्ठ अभियंता(सिव्हील) व ( मॅकेनिकल) या पदांवर तांत्रिक खंड देवून अटी व शर्ती नुसार सहा महिन्याकरीता मानधनावर केलेल्या करारबध्द पुर्ननियुक्तीस कार्योत्तर मंजुरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट वर सर्वानुमते खालील प्रमाणे ठराव करण्यात येत आहे.

या प्रस्तावासोबत आवश्यकते नुसार फिटर व वॉलमन यांची नियुक्ती करणे बाबत प्रस्ताव दयावा.वॉलमनचे,फिटर यांचे नेमणुकीच्या कार्यवाहीच्या प्रस्तावासह कनिष्ठ अभियंता (सिव्हील)व(मॅकेनिकल) यांना मानधनावर पुर्ननियुक्ती बाबत फेरप्रस्ताव सादर करावा.नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

उपरोक्त वरील ठरावामध्ये नमुद केल्याप्रमाणे पाणी पुरवठा विभाग अत्यावश्यक सेवेसाठी कंत्राटी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात व्हॉलमन यांची अटी व शर्ती नुसार दरमहा मानधनावर करारबध्द नियुक्ती संदर्भात त्याबाबतचा आस्थापना विभागामार्फत स्वतंत्र्यरित्या सविस्तर अहवाल सादर करण्यात आलेला असुन सदर प्रस्तावावर मा.वरिष्ठांनी निर्देशित केल्यानंतर मंजुरी प्राप्तीनंतर आवश्यकत ती पुढील कार्यवाही ही तातडीने करण्यात येईल.

पाणी पुरवठा विभाग अत्यावश्यक सेवेसाठी कंत्राटी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात कनिष्ठ अभियंता (सिव्हील) व (मॅकेनिकल) या पदी उपरोक्त केलेल्या संबंधीतांची मानधनावरील करारबध्द पुर्ननियुक्तीस मा. स्थायी समिती ठराव क्र.१०दि.२/६/२०१४ च्या पारित झालेल्या ठरावाच्या अनुषंगाने तत्पुर्वी मा.स्थायी समितीची उपरोक्त प्रकरणास तात्काळ कार्योत्तर मंजुरी मिळणे अत्यावश्यक आहे अन्यथा सदरची नियुक्ती बाबत लेखा परिक्षणामध्ये आक्षेप निघुन भविष्यामध्ये प्रशासकीय तांत्रिक अडचणी निर्माण होण्याची शक्यता आहे.

तरी जा.क्र.आस्था. कंत्राटी करारबध्द नेमणूक ७७९ दि.२५/४/२०१४ व जा.क्र.आस्था. कंत्राटी करारबध्द नेमणूक ७८० दि.२५/४/२०१४ अन्वये संबंधीतांची पाणीपुरवठा विभाग अत्यावश्यक सेवेसाठी कंत्राटी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात कनिष्ठ अभियंता (सिव्हील) व (मॅकेनिकल) या पदांवर तांत्रिक खंड देवुन सहा महिन्याकरिता दरमहा रूपये २०,०००/- (अक्षरी रूपये वीस हजार मात्र) या मानधनावर अटी व शर्ती प्रमाणे केलेल्या करारबध्द पुर्ननियुक्तीस मा.स्थायी समितीची तात्काळ कार्योत्तर मंजुरी मिळणे अत्यावश्यक असल्याने सदरचा प्रस्ताव हा मा.स्थायी समिती ठराव क्र.२८ दि.४/५/२०१३ अन्वये पारित झालेल्या ठरावाच्या अनुषंगाने सदरचा प्रस्ताव मा. स्थायी समितीकडे पाठविणेस मंजुरीस्तव आदेशार्थ सविनय सादर.

येणेप्रमाणे आस्थापना प्रमुख यांचा अहवाल असे,

यावर प्र. सहा. आयुक्त यांचा अभिप्राय की, "अ" नुसार मान्यतेस्तव आदेशार्थ सादर.

यावर मा.उपायुक्त (सा.) यांचा अभिप्राय की, विभागाने प्रस्तावीत केलेनुसार "अ" प्रमाणे मान्यतेस्तव व प्रस्ताव पुन्हा मे. स्थायी समिती सभेपुढे ठेवणेसाठी आदेशार्थ स. सादर.

यावर मा.आयुक्त यांचा सहमती दर्शक सही

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--**--

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- पाणी पुरवठा विभाग कंत्राटी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात कनिष्ठ अभियंता (सिव्हील) व (मॅकेनिकल) या पदांवर पुर्ननियुक्तीस कार्योत्तर मंजुरी मिळणे विषयी प्रस्ताव आहे. ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवा.

मा.श्री. सचिन जाधव :- कशा संदर्भात

मा.सभापती साहेब :- पाणीपुरवठा इंजिनिअर, मुदत संपली होती.

मा.श्री.दिप चव्हाण :- कॅान्ट्रॅक्ट हा शब्द वापरू नका. मानधनावर नेमणूक करावी लागेल कंत्राटी हा शब्द काढून टाका.

मा.श्री. सचिन जाधव :- तुमच्या विभागातील टायीपस्टला सांगा हा शब्द वापरू नका.

मा.श्री.अजिंक्य बोरकर :- कंत्राटी हा शब्द वापरू नका.ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा. श्री. संपत बारस्कर :- फेरऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.सभापती साहेब :-फेर ऑफिस रिपोर्टानुसार प्रस्ताव सर्वानुमते मंजूर करण्यांत यावा. तसेच अत्यावश्यक सेवेचा विचार करून देण्यात आलेल्या या कार्योत्तर मंजूरी चा कालावधी संपल्यावर संबंधीतांना तांत्रीक खंड देउन पुढील तीन महिन्यांकरीता मानधनावर नियुक्ती द्यावी. त्यास याच ठरावाव्दारे मंजूरी देण्यात येत आहे. या प्रक्रिये मधील कंत्राटी हा शब्द वगळण्यात यावा. या वाढीव तीन महिन्यांच्या कालावधीत पदोन्नतीने कर्मचारी भरण्याची प्रक्रीया सुरू करावी व ज्या पदावर कर्मचारी उपलब्ध होणार नाहीत,त्या पदावर नव्याने जाहिरात देउन प्रक्रियेने मानधन तत्वावर नव्याने भरतीबाबत कार्यवाही करावी.

**ठराव :-** जा.क्र.आस्था. कंत्राटी करारबध्द नेमणूक ७७९ दि.२५/४/२०१४ व जा.क्र.आस्था. कंत्राटी करारबध्द नेमणूक ७८० दि.२५/४/२०१४ अन्वये पाणीपुरवठा विभाग अत्यावश्यक सेवेसाठी कंत्राटी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात कनिष्ठ अभियंता (सिव्हील) व (मॅकेनिकल) या पदांवर तांत्रिक खंड देवुन सहा महिन्याकरिता ऑफिस रिपोर्टमध्ये नमूद केलेल्या मानधनावर अटी व शर्ती प्रमाणे केलेल्या करारबध्द पुर्ननियुक्तीस ही सभा मान्यता देत आहे.

तसेच अत्यावश्यक सेवेचा विचार करून देण्यात आलेल्या या कार्योत्तर मंजूरी चा कालावधी संपल्यावर संबंधीतांना तांत्रीक खंड देउन पुढील तीन महिन्यांकरीता मानधनावर नियुक्ती द्यावी. त्यास याच ठरावाव्दारे मंजूरी देण्यात येत आहे. या प्रक्रिये मधील कंत्राटी हा शब्द वगळण्यात यावा. या वाढीव तीन महिन्यांच्या कालावधीत पदोन्नतीने कर्मचारी भरण्याची प्रक्रीया सुरू करावी व ज्या पदावर कर्मचारी उपलब्ध होणार नाहीत,त्या पदावर नव्याने जाहिरात देउन प्रक्रियेने मानधन तत्वावर नव्याने भरतीबाबत कार्यवाही करावी.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- मा.श्री. अजिंक्य बोरकर सही /-

अनुमोदक :- मा.श्री. संपत बारस्कर सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा. स्थायी समिती सभा क्रमांक- ८**

विषय क्रमांक- ९२ बुधवार दि.१०/०९/२०१४

ठराव क्रमांक- ९२ बुधवार दि.१०/०९/२०१४

**प्रस्तावाचा विषय :-** मा.स्थायी समिती ठराव क्र.८ दि.२/६/२०१४ अन्वये अहमदनगर महानगरपालिकेचे पाणी पुरवठा विभाग अत्यावश्यक सेवेसाठी कंत्राटी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात पंपचालक, विजतंत्री या पदांवर तांत्रिक खंड देवुन अटी व शर्ती नुसार सहा महिन्याकरिता मानधनावर केलेल्या संबधितांच्या करारबध्द पुर्ननियुक्तीस मंजुरी मिळणेबाबतचा फेरसादर.

**प्रस्तावाचा मजकुर :-** अहमदनगर महानगरपालिका आस्थापना विभाग

संदर्भ- १. जा.क्र.आस्था./कंत्राटी करारबध्द नेमणूक ८०९२ दि.४/३/२०१४ अन्वयेचा कार्यालयीन आदेश

२. जा.क्र.आस्था./वर्क. ३ दि.३/४/२०१४ अन्वये कार्योत्तर मंजुरी मिळणेकरीता मा.स्थायी समितीकडे पाठविलेला प्रस्ताव

३. मा. स्थायी समिती ठराव क्रमांक-८ दि.२/६/२०१४ अन्वये पारित झालेला ठराव.

विनंती अहवाल सादर करण्यांत येतो की, आस्थापना कायम सुचीवरील विजतंत्री, पंपचालक, जोडारी ही पदे सद्यस्थितीमध्ये बहुतांशी रिक्त आहेत त्यामुळे मा. मॅकेनिकल इंजि. पा.पु.विभाग प्रमुख यांनी समक्ष वेळोवेळी संयुक्त बैठकामध्ये चर्चे दरम्यान पाणी पुरवठा विभाग हा नागरिकांच्या दृष्टीकोनातून अत्यंत अत्यावश्यक सेवा असल्याने तांत्रिक कर्मचा-यांची पाणी पुरवठा विभागामध्ये कमतरता असल्याने पाणी वितरणामध्ये अनेक तांत्रिक अडचणी निर्माण होत असल्याने आवश्यक त्याप्रमाणे तांत्रिक कर्मचारी तातडीने मिळणेबाबत मागणी केलेली आहे.

त्यानुषंगाने पाणी पुरवठा विभाग अत्यावश्यक सेवेचा विचार करता कंत्राटी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात पंपचालक, विजतंत्री यापदी जा.क्र.आस्था./कंत्राटी करारबध्द नेमणूक ८०९२ दिनांक ४/३/२०१४ अन्वये महेश बाळासाहेब कुळधर व इतर ४ यांची तांत्रिक खंड देवुन दि.२०/३/२०१४ पासुन सहा महिन्याकरीता अटी व शर्ती प्रमाणे दरमहा रूपये ७५००/- या मानधनावर पाणी पुरवठा विभागामध्ये करारबध्द पुर्ननियुक्ती करण्यात आलेली होती.

पाणी पुरवठा विभाग अत्यावश्यक सेवेसाठी कंत्राटी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात पंपचालक, विजतंत्री यापदी वरील संबंधीतांची जा.क्र.आस्था./ कंत्राटी करारबध्द नेमणूक ८०९२ दि.४/३/२०१४ अन्वये तांत्रिक खंड देवुन दि.२०/३/२०१४ पासुन सहा महिन्याकरिता केलेल्या मानधनावरील करारबध्द पुर्ननियुक्तीस कार्योत्तर मंजुरी मिळणेकरीता सदरचा प्रस्ताव हा मा.स्थायी समितीकडे जा.क्र.आस्था./वर्क.३ दि.३/४/२०१४ अन्वये पाठविण्यांत आलेला होता.

तथापि सदर प्रस्तावावर मा.स्थायी समितीने ठराव क्र.८ दि.२/६/२०१४ अन्वये खालील प्रमाणे ठराव पारित केलेला आहे.

"अहमदनगर महानगरपालिकेचे पाणीपुरवठाविभाग अत्यावश्यक सेवेसाठी कंत्राटी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात पंपचालक,विजतंत्री यापदी तांत्रिक खंड देवुन अटी व शर्ती प्रमाणे सहा महिन्याकरीता मानधनावर केलेल्या करारबध्द पुर्नेनियुक्तीस कार्योत्तर मंजुरी बाबत.

उपनगरातील पाणीपुरवठा विस्कळीत झाल्यानंतर व शहरातील पाईपलाईन हया जुन्या झालेल्या असुन त्या वारंवार नादुस्त होत असतात.त्यामुळे पाणीपुरवठा विस्कळीत होत असतो.त्या करीता फिटर व वॉलमन यांची आवश्यकता असुन सुध्दा उपरोक्त प्रस्तावामध्ये वेळोवेळी मागणी केली असतांना या बाबत कार्यवाही झालेली नाही.

तरी वरील प्रस्तावासोबत आवश्यकते नुसार फिटर व वॉलमन यांची नियुक्ती करणे बाबत प्रस्ताव दयावा. वॉलमनचे , फिटर यांचे नेमणुकीच्या कार्यवाहीच्या प्रस्तावा सोबत पंपचालक,विजतंत्री यांना मानधनावर पुर्ननियुक्ती बाबत फेरप्रस्ताव सादर करावा. नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी."

उपरोक्त वरील ठरावामध्ये नमुद केल्याप्रमाणे पाणीपुरवठा विभाग अत्यावश्यक सेवेसाठी कंत्राटी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात व्हॉलमन यांची अटी व शर्ती नुसार दरमहा मानधनावर करारबध्द नियुक्ती संदर्भात त्याबाबतचा आस्थापना विभागामार्फत स्वतंत्र्यरित्या सविस्तर अहवाल सादर करण्यात आलेला असुन सदर प्रस्तावावर मा. वरिष्ठांनी निर्देशित केल्यानंतर मंजुरी प्राप्तीनंतर आवश्यक ती पुढील कार्यवाही ही तातडीने करण्यात येईल.

पाणीपुरवठा विभाग अत्यावश्यक सेवेसाठी कंत्राटी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात पंपचालक, विजतंत्री या पदी उपरोक्त केलेल्या संबंधीतांची मानधनावरील करारबध्द पुर्ननियुक्तीस मा.स्थायी समिती ठराव क्रमांक-८दि.२/६/२०१४ च्या पारित झालेल्या ठरावाच्या अनुषंगाने तत्पुर्वी मा.स्थायी समितीची उपरोक्त प्रकरणास तात्काळ कार्योत्तर मंजुरी मिळणे अत्यावश्यक आहे अन्यथा सदरची नियुक्तीबाबत लेखा परिक्षणामध्ये आक्षेप निघुन भविष्यामध्ये प्रशासकीय तांत्रिक अडचणी निर्माण होण्याची शक्यता आहे.

तरी जा.क्र.आस्था./कंत्राटी करारबध्द नेमणूक ८०९२ दि.४/३/२०१४ अन्वये संबंधीतांची पाणी पुरवठा विभाग अत्यावश्यक सेवेसाठी कंत्राटी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात पंपचालक, विजतंत्री या पदांवर तांत्रिक खंड देवुन दि.२०/३/२०१४ पासुन सहा महिन्याकरिता दरमहा रूपये ७५००/-(अक्षरी रूपये सात हजार पाचशे मात्र ) या मानधनावर अटी व शर्ती प्रमाणे केलेल्या करारबध्द पुर्ननियुक्तीस मा. स्थायी समितींची तात्काळ कार्योत्तर मंजुरी मिळणे अत्यावश्यक असल्याने सदरचा प्रस्ताव हा मा.स्थायी समिती पाठविणेस मंजुरीस्तव आदेशार्थ सविनय सादर.

येणेप्रमाणे आस्थापना प्रमुख यांचा अहवाल असे.

यावर प्र.सहा.आयुक्त यांचा अभिप्राय की, प्रस्तावामधील "अ" नुसार मान्यतेस्तव आदेशार्थ सादर.

यावर मा. उपायुक्त (सा.) यांचा अभिप्राय की, विभागाने प्रस्तावीत केलेनुसार प्रस्तावीत ५ जणांनी संख्या मानधनावर घेणेस्तवचा विषय मे.स्थायी समिती सभेकडे पाठविणेबाबत मान्यतेस्तव स. सादर.

यावर मा.आयुक्त साहेब यांचा सहमती दर्शक सही.

सबब प्रकरण मा. स्थायी समिती सभे पुढे सादर.

--**--

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- पाणी पुरवठा विभाग अत्यावश्यक सेवेसाठी कंत्राटी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात पंपचालक, विजतंत्री या पदांवर तांत्रिक खंड देवुन अटी व शर्ती नुसार सहा महिन्याकरिता मानधनावर केलेल्या संबधितांच्या करारबध्द पुर्ननियुक्तीस मंजुरी मिळणे विषयी प्रस्ताव आहे.

मा. श्री. अजिंक्य बोरकर :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवा.

त्याप्रमाणे ऑफिस रिपोर्ट सभेमध्ये वाचून दाखविण्यात आला.

मा.श्री. सचिन जाधव :- कशा संदर्भात

मा.सभापती साहेब :- पाणीपुरवठा इंजिनिअर, मुदत संपती होती.

मा.श्री. दिप चव्हाण :- कॅान्ट्रॅक्ट हा शब्द वापरू नका. मानधनावर नेमणूक करावी लागेल कंत्राटी हा शब्द काढून नका.

मा.श्री. सचिन जाधव :- तुमच्या विभागातील टायीपस्टला सांगा हा शब्द वापरू नका.

मा.श्री.अजिंक्य बोरकर :- कंत्राटी हा शब्द वापरू नका.ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा. श्री. संपत बारस्कर :- फेरऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.सभापती साहेब :-फेर ऑफिस रिपोर्टानुसार प्रस्ताव सर्वानुमते मंजूर करण्यांत यावा. तसेच अत्यावश्यक सेवेचा विचार करून देण्यात आलेल्या या कार्योत्तर मंजूरी चा कालावधी संपल्यावर संबंधीतांना तांत्रीक खंड देउन पुढील तीन महिन्यांकरीता मानधनावर नियुक्ती द्यावी. त्यास याच ठरावाव्दारे मंजूरी देण्यात येत आहे. या प्रक्रिये मधील कंत्राटी हा शब्द वगळण्यात यावा. या वाढीव तीन महिन्यांच्या कालावधीत पदोन्नतीने कर्मचारी भरण्याची प्रक्रीया सुरू करावी व ज्या पदावर कर्मचारी उपलब्ध होणार नाहीत,त्या पदावर नव्याने जाहिरात देउन प्रक्रियेने मानधन तत्वावर नव्याने भरतीबाबत कार्यवाही करावी.

**ठराव :-** फेरसादर ऑफिस रिपोर्टानुसार अहमदनगर महानगरपालिकेचे पाणी पुरवठा विभाग अत्यावश्यक सेवेसाठी कंत्राटी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात ऑफिस रिपोर्टमध्ये नमूद पंपचालक, वीजतंत्री या पदांवर अटी व शर्ती नुसार जा.क्र.आस्था./कंत्राटी करारबध्द नेमणूक ८०९२ दि.४/३/२०१४ अन्वये महेश बाळासाहेब कुळधर व इतर ४ यांची दि.२०/३/२०१४ पासुन सहा महिन्याकरीता दरमहा रूपये ७५००/- या मानधनावर केलेल्या करारबध्द पुर्ननियुक्तीस कार्योत्तर मंजुरी देण्यांत येत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर, खर्च मंजूर.

तसेच अत्यावश्यक सेवेचा विचार करून देण्यात आलेल्या या कार्योत्तर मंजूरी चा कालावधी संपल्यावर संबंधीतांना तांत्रीक खंड देउन पुढील तीन महिन्यांकरीता मानधनावर नियुक्ती द्यावी. त्यास याच ठरावाव्दारे मंजूरी देण्यात येत आहे. या प्रक्रिये मधील कंत्राटी हा शब्द वगळण्यात यावा. या वाढीव तीन महिन्यांच्या कालावधीत पदोन्नतीने कर्मचारी भरण्याची प्रक्रीया सुरू करावी व ज्या पदावर कर्मचारी उपलब्ध होणार नाहीत,त्या पदावर नव्याने जाहिरात देउन प्रक्रियेने मानधन तत्वावर नव्याने भरतीबाबत कार्यवाही करावी.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- मा.श्री. अजिंक्य बोरकर सही /-

अनुमोदक :- मा.श्री. संपत बारस्कर सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा. स्थायी समिती सभा क्रमांक- ८**

विषय क्रमांक- ९३ बुधवार दि.१०/०९/२०१४

ठराव क्रमांक- ९३ बुधवार दि.१०/०९/२०१४

**प्रस्तावाचा विषय :-** मा.स्थायी समिती ठराव क्र.५ दिनांक २/६/२०१४ अन्वये अहमदनगर महानगरपालिकेचे पाणी पुरवठा विभाग अत्यावश्यक सेवेसाठी कंत्राटी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात पंपचालक, विजतंत्री व जोडारी या पदांवर तांत्रिक खंड देवुन अटी व शर्ती नुसार सहा महिन्याकरिता मानधनावर केलेल्या संबधितांच्या करारबध्द पुर्ननियुक्तीस मंजुरी मिळणेबाबतचा फेरसादर.

**प्रस्तावाचा मजकुर :-** अहमदनगर महानगरपालिका आस्थापना विभाग

संदर्भ- १. जा.क्र.आस्था./कंत्राटी करारबध्द नेमणूक ६४५१ दि.२१/१२/२०१३अन्वयेचा कार्यालयीन आदेश

२. जा.क्र.आस्था./वर्क. १६३ दि.१/१/२०१४ अन्वये कार्योत्तर मंजुरी मिळणेकरीता मा.स्थायी समितीकडे पाठविलेला प्रस्ताव

३. मा. स्थायी समिती ठराव क्रमांक-५ दि.२/६/२०१४ अन्वये पारित झालेला ठराव.

फेरसादर,

विनंती अहवाल सादर करण्यात येतो की, संदिप प्रभाकर पुंड व इतर यांनी दि.१९/११/२०१३ रोजी अर्ज देवुन त्यामध्ये "आम्ही पाणी पुरवठा विभागामध्ये कंत्राटी करारानुसार तात्पुरत्या मानधनावर मुळानगर, विळद व नागापुर पाणीपुरवठा केंद्र येथे पंपचालक, विजतंत्री व जोडारी या पदावर काम करीत आहोत.सदर कराराची मुदत दिनांक १८/१२/२०१३ रोजी संपत आहे. तरी आम्हाला तात्पुरत्या स्वरूपात पुढील कालावधी करीता मानधनावर नेमणूक करण्यात यावी" असे नमुद करून विनंती केलेली होती.

त्यानुषंगाने पाणी पुरवठा विभाग अत्यावश्यक सेवेचा विचार करता कंत्राटी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात पंपचालक, विजतंत्री व जोडारी यापदी जा.क्र.आस्था./कंत्राटी करारबध्द नेमणूक ६४५१ दिनांक २१/१२/२०१३ अन्वये सागर आसाराम खताडे व इतर ६ यांची तांत्रिक खंड देवुन दि.२१/१२/२०१३ पासुन सहा महिन्याकरीता अटी व शर्ती प्रमाणे दरमहा रूपये ७५००/- या मानधनावर पाणी पुरवठा विभागामध्ये करारबध्द पुर्ननियुक्ती करण्यात आलेली होती.

पाणी पुरवठा विभाग अत्यावश्यक सेवेसाठी कंत्राटी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात पंपचालक, विजतंत्री व जोडारी यापदी वरील संबंधीतांची जा.क्र.आस्था./ कंत्राटी करारबध्द नेमणूक ६४५१ दि.२१/१२/२०१३ अन्वये तांत्रिक खंड देवुन दि.२१/१२/२०१३ पासुन सहा महिन्याकरिता केलेल्या मानधनावरील करारबध्द पुर्ननियुक्तीस कार्योत्तर मंजुरी मिळणेकरीता सदरचा प्रस्ताव हा मा.स्थायी समितीकडे जा.क्र.आस्था./वर्क.१६३ दि.१/१/२०१४ अन्वये पाठविण्यांत आलेला होता.

तथापि सदर प्रस्तावावर मा.स्थायी समितीने ठराव क्र.५ दि.२/६/२०१४ अन्वये खालील प्रमाणे ठराव पारित केलेला आहे.

"अहमदनगर महानगरपालिकेचे पाणीपुरवठाविभाग अत्यावश्यक सेवेसाठी कंत्राटी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात पंपचालक,विजतंत्री व जोडारी यापदी तांत्रिक खंड देवून अटी व शर्तीप्रमाणे सहा महिन्या करीता मानधनावर केलेल्या करारबध्द पुर्ननियुक्ती बाबत हा प्रस्ताव आहे.तथापी पाणीपुरवठा विस्कळीत झाल्यानंतर किंवा शहरातील पाईपलाईन हया जुन्या झालेल्या असुन त्या वारंवार नादुरूस्त होत असतात.त्यामुळे पाणीपुरवठा विस्कळीत होत असतो.त्या करीता फिटर व वॉलमन यांची आवश्यकता असुन

सुध्दा वेळोवेळी सुचना देवूनही पाणीपुरवठा विभागाच्या उपरोक्त प्रस्तावामध्ये वॉलमन व फिटर यांना नेमणुका देणे बाबत कार्यवाही झालेली नाही.

तरी वरील प्रस्तावासोबत आवश्यकते नुसार फिटर व वॉलमन यांची नियुक्ती करणे बाबत प्रस्ताव दयावा. वॉलमनचे , फिटर यांचे नेमणुकीच्या कार्यवाहीच्या प्रस्तावासह पंपचालक,विजतंत्री व जोडारी यांना मानधनावर पुर्ननियुक्ती बाबत फेरप्रस्ताव सादर करावा. नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी."

उपरोक्त वरील ठरावामध्ये नमुद केल्याप्रमाणे पाणीपुरवठा विभाग अत्यावश्यक सेवेसाठी कंत्राटी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात व्हॉलमन यांची अटी व शर्ती नुसार दरमहा मानधनावर करारबध्द नियुक्ती संदर्भात त्याबाबतचा आस्थापना विभागामार्फत स्वतंत्र्यरित्या सविस्तर अहवाल सादर करण्यात आलेला असुन सदर प्रस्तावावर मा. वरिष्ठांनी निर्दशित केल्यानंतर मंजुरी प्राप्तीनंतर आवश्यक ती पुढील कार्यवाही ही तातडीने करण्यात येईल.

पाणीपुरवठा विभाग अत्यावश्यक सेवेसाठी कंत्राटी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात पंपचालक, विजतंत्री व जोडारी या पदी उपरोक्त केलेल्या संबंधीतांची मानधनावरील करारबध्द पुर्ननियुक्तीस मा.स्थायी समिती ठराव क्रमांक-५ दि.२/६/२०१४ च्या पारित झालेल्या ठरावाच्या अनुषंगाने तत्पुर्वी मा.स्थायी समितीची उपरोक्त प्रकरणास तात्काळ कार्योत्तर मंजुरी मिळणे अत्यावश्यक आहे अन्यथा सदरची नियुक्तीबाबत लेखा परिक्षणामध्ये आक्षेप निघुन भविष्यामध्ये प्रशासकीय तांत्रिक अडचणी निर्माण होण्याची शक्यता आहे.

तरी जा.क्र.आस्था./कंत्राटी करारबध्द नेमणूक ६४५१ दि.२१/१२/२०१३अन्वये संबंधीतांची पाणी पुरवठा विभाग अत्यावश्यक सेवेसाठी कंत्राटी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात पंपचालक, विजतंत्री व जोडारी या पदांवर तांत्रिक खंड देवुन दि.२१/१२/२०१३ पासुन सहा महिन्याकरिता दरमहा रूपये ७५००/-(अक्षरी रूपये सात हजार पाचशे मात्र ) या मानधनावर अटी व शर्ती प्रमाणे केलेल्या करारबध्द पुर्ननियुक्तीस मा. स्थायी समितींची तात्काळ कार्योत्तर मंजुरी मिळणे अत्यावश्यक असल्याने सदरचा प्रस्ताव हा मा.स्थायी समितीकडे पाठविणेस मंजुरीस्तव आदेशार्थ सविनय सादर.

येणेप्रमाणे आस्थापना प्रमुख यांचा अहवाल असे.

यावर प्र.सहा.आयुक्त यांचा अभिप्राय की, प्रस्तावानुसार जा.क्र. आस्था.६४५१ दि.२१/१२/२०१३ अन्वये केलेल्या नेमणुकीस मा.स्थायी समितीची कार्योत्तर मंजुरी घेणे आवश्यक असल्याने सदरचा प्रस्ताव मा.स्थायी समितीपुढे पाठविणेस आदेशार्थ सादर.

यावर मा.उपायुक्त यांचा अभिप्राय की, प्रस्तावीत नुसार दि.२०/६/२०१४ रोजी संबंधीतांच्या नेमणूकीस दिलेली मान्यतेची मुद संपलेली असुन त्यांचे नेमणूकीस मे.स्थायी समिती सभेची मान्यता आवश्यक आहे, करिता मे.आदेशार्थ स. सादर.

यावर मा.आयुक्त साहेब यांचा सहमती दर्शक सही

सबब प्रकरण मा. स्थायी समिती सभे पुढे सादर.

--**--

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- पाणी पुरवठा विभाग अत्यावश्यक सेवेसाठी कंत्राटी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात पंपचालक, विजतंत्री व जोडारी या पदांवर तांत्रिक खंड देवुन अटी व शर्ती नुसार सहा महिन्याकरिता मानधनावर केलेल्या संबधितांच्या करारबध्द पुर्ननियुक्तीस मंजुरी मिळणे विषयी प्रस्ताव आहे.

मा. श्री. अजिंक्य बोरकर :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवा.

त्याप्रमाणे ऑफिस रिपोर्ट सभेमध्ये वाचून दाखविण्यात आला.

मा.श्री. सचिन जाधव :- कशा संदर्भात

मा.सभापती साहेब :- पाणीपुरवठा इंजिनिअर, मुदत संपती होती.

मा.श्री. दिप चव्हाण :- कॅान्ट्रॅक्ट हा शब्द वापरू नका. मानधनावर नेमणूक करावी लागेल कंत्राटी हा शब्द काढून नका.

मा.श्री. सचिन जाधव :- तुमच्या विभागातील टायीपस्टला सांगा हा शब्द वापरू नका.

मा.श्री.संपत बारस्कर :- कंत्राटी हा शब्द वापरू नका.ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.श्री.अजिंक्य बोरकर :- फेरऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.सभापती साहेब :-फेर ऑफिस रिपोर्टानुसार प्रस्ताव सर्वानुमते मंजूर करण्यांत यावा. तसेच अत्यावश्यक सेवेचा विचार करून देण्यात आलेल्या या कार्योत्तर मंजूरी चा कालावधी संपल्यावर संबंधीतांना तांत्रीक खंड देउन पुढील तीन महिन्यांकरीता मानधनावर नियुक्ती द्यावी. त्यास याच ठरावाव्दारे मंजूरी देण्यात येत आहे. या प्रक्रिये मधील कंत्राटी हा शब्द वगळण्यात यावा. या वाढीव तीन महिन्यांच्या कालावधीत पदोन्नतीने कर्मचारी भरण्याची प्रक्रीया सुरू करावी व ज्या पदावर कर्मचारी उपलब्ध होणार नाहीत,त्या पदावर नव्याने जाहिरात देउन प्रक्रियेने मानधन तत्वावर नव्याने भरतीबाबत कार्यवाही करावी.

**ठराव :-**फेरसादर ऑफिस रिपोर्टानुसार अहमदनगर महानगरपालिकेचे पाणी पुरवठा विभाग अत्यावश्यक सेवेसाठी कंत्राटी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात पंपचालक, विजतंत्री व जोडारी या पदांवर श्री.सागर आसाराम खतोडे व इतर ६ यांची अटी व शर्ती नुसार जा.क्र.आस्था./कंत्राटी करारबध्द नेमणूक ६४५१ दिनांक २१/१२/२०१३ अन्वये सागर आसाराम खताडे व इतर ६ यांची तांत्रिक खंड देवुन दि.२१/१२/२०१३ पासुन सहा महिन्याकरीता दरमहा रूपये ७५००/- या मानधनावर केलेल्या संबधितांच्या करारबध्द पुर्ननियुक्तीस कार्योत्तर मंजुरी देण्यांत येत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर.

तसेच अत्यावश्यक सेवेचा विचार करून देण्यात आलेल्या या कार्योत्तर मंजूरी चा कालावधी संपल्यावर संबंधीतांना तांत्रीक खंड देउन पुढील तीन महिन्यांकरीता मानधनावर नियुक्ती द्यावी. त्यास याच ठरावाव्दारे मंजूरी देण्यात येत आहे. या प्रक्रिये मधील कंत्राटी हा शब्द वगळण्यात यावा. या वाढीव तीन महिन्यांच्या कालावधीत पदोन्नतीने कर्मचारी भरण्याची प्रक्रीया सुरू करावी व ज्या पदावर कर्मचारी उपलब्ध होणार नाहीत,त्या पदावर नव्याने जाहिरात देउन प्रक्रियेने मानधन तत्वावर नव्याने भरतीबाबत कार्यवाही करावी.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- मा.श्री. संपत बारस्कर सही /-

अनुमोदक :- मा.श्री.अजिंक्य बोरकर सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा. स्थायी समिती सभा क्रमांक- ८**

विषय क्रमांक- ९४ बुधवार दि.१०/०९/२०१४

ठराव क्रमांक- ९४ बुधवार दि.१०/०९/२०१४

**प्रस्तावाचा विषय :-** मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०६(३) अन्वये अहमदनगर महानगरपालिकेचे सन २०१२-२०१३ चे बाबवार जमा- खर्चाचे वार्षिक लेखे, वार्षिक लेख्यांचा गोषवारा व मत्ता- दायित्वे तसेच मुख्य लेखापरिक्षकांचा सन २०१२-२०१३ चा अहवाल व स्थानिक निधी लेखापरिक्षा सन २०११-२०१२ चा लेखापरिक्षा अहवालबाबतचा ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-** अहमदनगर महानगरपालिका अर्थ विभाग /३४० दि.३०/८/२०१४

विषय- सन २०१२-२०१३ चे वार्षिक लेखे, वाष्रिक लेख्यांचा गोषवारा व मत्ता दायित्व तसेच मुख्य लेखापरिक्षकांचा सन २०१२-१३ चा अहवाल व स्थानिक निधी लेखा परिक्षा सन २०११-२०१२ चा लेखापरिक्षा अहवाल बाबत.

विनंती टिप्पणी देण्यांत येते की, सन २०१२-१३ चे बाबवार जमा- खर्चाचे वार्षिक लेखे, वार्षिक लेख्यांचा गोषवारा व मत्ता- दायित्वे मुख्य लेखापरिक्षकांचा सन २०१२-१३ चा अहवाल व स्थानिक निधी लेखापरिक्षा सन २०११-१२ चा लेखापरिक्षा अहवाल मा.स्थायी समिती पुढे ठेवण्यास मा.आयुक्त यांनी मंजुरी दिलेली आहे. तरी सदरचा विषय मा. स्थायी समिती पुढे ठेवण्यात यावा, ही विनंती.

**सोबत-** मा.आयुक्त यांची मंजूर टिप्पणी व सन २०१२-२०१३चे १] वार्षिक लेखे ,२] वार्षिक लेख्यांचा सारांश ,३] मत्ता- दायित्व ,४] मुख्य लेखापरिक्षकांचा सन २०१२-१३ चा अहवाल ,५] स्थानिक निधी लेखापरिक्षा सन २०११-२०१२चा लेखापरिक्षा अहवाल

येणेप्रमाणे मुख्य लेखाधिकारी यांचा अहवाल असे.

--००--

जा.क्र.अर्थ/अंदाजपत्रक/१४०/१४
दिनांक ९/६/२०१४

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९चे कलम १०६(३)अन्वये महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता१९७१ मधील नियम क्र.६०नमुना क्र.२८प्रमाणे अहमदनगर महानगरपालिकेचा एप्रिल २०१२ ते मार्च२०१३ अखेर वार्षिक लेख्यांचा सारांश तयार करण्यांत आला आहे.यात सुरूवातीची शिल्लक रू.१९ कोटी ७५लाख ७०हजार ५७७असून आर्थिक वर्षात रू.१अब्ज ७५कोटी ६३ लाख १५ हजार ८६५ इतके जमा आहेत. सुरूवातीची शिल्लक धरून एकूण जमा रू.१ अब्ज ९५कोटी ३८ लाख ८६ हजार ४४२ असून रू.१ अब्ज ६९ कोटी ३७ लाख १९ हजार ३०१ खर्च वजा जाता रू.२६ कोटी ०१ लाख ६७ हजार १४१ इतकी अखेरची शिल्लक राहिली.

तसेच नियम नं.६१ नमुना नं.२९ प्रमाणे ३१ मार्च २०१३ अखेरचे मत्ता व दायीत्व तयार करण्यात आलेले आहे. यात मत्ता हे रू.१ अब्ज ९३ कोटी ५६ लाख १३ हजार ३२५ असून दायित्व २ अब्ज ३ कोटी ५५ लाख ९० हजार ३०९ आहे. दायित्व हे मत्तेपेक्षा ९ कोटी ९९ लाख ७६ हजार ९८४ ने अधिक आहे.

तरी मुख्य लेखा परिक्षकांचा अहवाल घेउन मा. स्थायी समिती सभे पुढे मंजुरीस ठेवणेसाठी आपले स्तरावर आदेश होणेस विनंती.

येणेप्रमाणे मुख्य लेखाधिकारी यांचा अहवाल असे.

**सोबत-** सन २०१२-२०१३ चा १] वार्षिक लेख्यांचा सारांश, २] मत्ता- दायित्व तक्ता ,३] स्थानिक निधी लेखापरिक्षा सन २०११-२०१२ चा ऑडीट रिपोर्ट.

यावर मुख्य लेखा परिक्षक यांचा अभिप्राय की, प्रस्तावाप्रमाणे लेखा विभागाने मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०६(३) अन्वये महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता १९७१ मधील नियम ६० व ६१ नुसार अहमदनगर महानगरपालिकेचे सन २०१२-२०१३ या वित्तीय वर्षाचे सादर केलेल्या वार्षिक लेख्यावर मुख्यलेखापरिक्षक यांचा स्वतंत्र अभिप्राय अहवाल सोबत जोडुन पाठविला आहे. मु.ले.अ. यांनी सादर केलेल्या सन २०१२-१३ च्या वार्षिक लेख्यांची तपासणी / लेखा परिक्षण करण्यांत येवुन मनपा अधिनियम १९४९ चे क १०६(३) अन्वये मुख्य लेखा परिक्षक यांचा लेखा परिक्षण अहवाल मा.स्थायी समितीस सादर करण्याकरिता स्वतंत्रवित्या संचिकेसोबत सविनय सादर करण्यात येत आहे.**/अ**

यावर मा.उपायुक्त साहेब यांचा अभिप्राय की, विभागाने प्रस्तावीत केल्यानुसार व मु.ले.प. यांचे तपासणी अभिप्रायानुसार सन २०१२-१३ चे वार्षिक लेखे नमूद मे. स्थायी समिती सभेसमोर मंजूरीस्तव सादर करणे योग्य राहील. मे. आदेशार्थ स. सादर.

यावर मा.आयुक्त साहेब यांचा सहमती दर्शक सही

--००--

जा.क्र.अर्थ/अंदाजपत्रक/ /१४ दिनांक ५/८/२०१४

फेरसादर,

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०६(३) अन्वये महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता १९७१ मधील नियम क्र.६० नमुना क्र.२८ प्रमाणे अहमदनगर महानगरपालिकेचा एप्रिल २०१२ ते मार्च २०१३ अखेर वार्षिक लेख्यांचा सारांश तयार करण्यांत आला आहे. तरी सन २०१२-१३ अखेरचे वार्षिक लेखे, मत्ता व दायित्व लेखापरिक्षण अहवालासाठी मुख्य लेखापरिक्षक यांचेकडे सादर करण्यांत आली होती. मुख्य लेखापरिक्षक यांनी त्यांचा लेखा परिक्षण अहवाल सोबत जोडून इकडेस पाठविला आहे. त्यात वार्षिक लेख्यांत अपेक्षित रक्कम महसूली जमा "अ" मधील भाग क्र.३ (इतर) ची बेरीज अनावधानाने रू.३६,११,१२,०००/- ऐवजी रू.६१,८९,१२,४००/- इतकी दर्शविण्यांत आली आहे. तरी सदर बेरजेची दुरूस्ती करून लेखे पुन्हा सादर करण्यांस विनंती.

येणेप्रमाणे मुख्य लेखाधिकारी यांचा अहवाल असे.

**सोबत-** १]सन २०१२-२०१३ चा २] वार्षिक लेख्यांचा सारांश, ३] मत्ता- दायित्व तक्ता ,४] लेखापरिक्षकांचा अहवाल ,५] स्थानिक निधी लेखापरिक्षा सन २०११-२०१२

यावर मा.उपायुक्त साहेब यांचा अभिप्राय की, दुरूस्ती लेखे सादर करण्यास हरकत नाही.

यावर मा.आयुक्त साहेब यांचा सहमती दर्शक सही

--०००--

जा.क्र.अर्थ/अंदाजपत्रक/ /१४ दिनांक ५/८/२०१४

सादर,

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०६(३) अन्वये महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता १९७१ मधील नियम क्र.६० नमुना क्र.२८ प्रमाणे अहमदनगर महानगरपालिकेचा एप्रिल २०१२ ते मार्च २०१३ अखेर वार्षिक लेख्यांचा सारांश तयार करण्यांत आला आहे. यात सुरूवातीची शिल्लक

रू. १९ कोटी ७५ लाख ७० हजार ५७७ असून आर्थिक वर्षात रू.१ अब्ज ७५ कोटी ६३ लाख १५ हजार ८६५ इतके जमा आहेत. सुरूवातीची शिल्लक धरून एकूण जमा रू. १ अब्ज ९५ कोटी ३८ लाख ८६ हजार ४४२ असून रू. १ अब्ज ६९ कोटी ३७ लाख १९ हजार ३०१ खर्च वजा जाता रू. २६ कोटी ०१ लाख ६७ हजार १४१ इतकी अखेरची शिल्लक राहिली.

तसेच नियम नं. ६१ नमुना नं.२९ प्रमाणे ३१ मार्च २०१३ अखेरचे मत्ता व दायित्व तयार करण्यात आलेले आहे. यात मत्ता हे रू.१ अब्ज ९३ कोटी ५६ लाख १३ हजार ३२५ असुन दायित्व २ अब्ज ३ कोटी ५५ लाख ९० हजार ३०९ आहे. दायित्व हे मत्तेपेक्षा ९ कोटी ९९ लाख ७६ हजार ९८४ ने अधिक आहे.

तरी सन२०१२-२०१३अखेरचे वार्षिक लेखे,मत्ता व दायित्व लेखापरिक्षक अहवालासाठी मुख्य लेखा परिक्षक यांचेकडे सादर करण्यांत आली होती. मुख्य लेखापरिक्षकांचा अहवाल सोबत जोडून सादर करीत आहे.

तरी मा. स्थायी समिती सभेपुढे मंजुरीस ठेवणेसाठी आपले स्तरावर आदेश होणेस विनंती.

येणेप्रमाणे मुख्य लेखाधिकारी यांचा अहवाल असे.

**सोबत-** १]सन २०१२-२०१३ चा २] वार्षिक लेख्यांचा सारांश, ३] मत्ता- दायित्व तक्ता ,४] लेखापरिक्षकांचा अहवाल ,५] स्थानिक निधी लेखापरिक्षा सन २०११-२०१२

यावर मा.उपायुक्त साहेब यांचा सहमती दर्शक सही

यावर मा.आयुक्त साहेब यांचा सहमती दर्शक सही

--००--

जा.क्र.अर्थ/अंदाजपत्रक/१४०/१३
दिनांक ९/६/२०१४

सादर,

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे नियम क्र.५९ (१) नमुना क्र.२७ प्रमाणे अहमदनगर महानगरपालिकेचा एप्रिल २०१२ ते मार्च २०१३ अखेर बाबवार जमा खर्चाचे वार्षिक लेखे तयार करण्यात आले असुन मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०६(३) अन्वये नगरपालिकेच्या मुख्य लेखापरिक्षकाने प्रत्येक सरकाीर वर्ष सुरू झाल्यानंतर शक्य तितक्या लवकर महानगरपालिकेच्या मागील सरकारी वर्षाच्या संपुर्ण लेख्यावरील आपला अहवाल मा. स्थायी समितीस सादर केला पाहिजे. असे नमुद करण्यात आले आहे. **/अ**

तरी मुख्य लेखापरिक्षकांचा अहवाल घेउन मा.स्थायी समिती सभेपुढे मंजुरीस ठेवणेसाठी आपले स्तरावर आदेश होणेस विनंती.

येणेप्रमाणे मुख्य लेखाधिकारी यांचा अहवाल असे.

**सोबत-** सन २०१२-२०१३ चा जमा खर्चाचा वार्षिक लेखा

यावर अर्थ विभाग यांचा अभिप्राय की, मा.मु.ले.प. अहवालासह पुढील कार्यवाहीस्तव सादर.

यावर मा.उपायुक्त साहेब यांचा अभिप्राय की, सन २०१२-२०१३ चे वार्षिक लेखे प्रस्तावीत **"अ"** नुसार मे.स्थायी समिती सभेत ठेवणेस हरकत नाही मे. ओदशार्थ स. सादर.

यावर मा.आयुक्त साहेब यांचा सहमती दर्शक सही

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--**--

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- सन २०१२-२०१३ चे बाबवार जमा- खर्चाचे वार्षिक लेखे, वार्षिक लेख्यांचा गोषवारा व मत्ता- दायित्वे तसेच मुख्य लेखापरिक्षकांचा सन २०१२-२०१३ चा अहवाल व स्थानिक निधी लेखापरिक्षा सन २०११-२०१२ चा लेखापरिक्षा अहवाल विषयी प्रस्ताव आहे.

मा. श्री. अजिंक्य बोरकर :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवा.

त्याप्रमाणे ऑफिस रिपोर्ट सभेमध्ये वाचून दाखविण्यात आला.

मा.सभापती साहेब :- हा विषय पुढच्या मिटींगला ठेवा.

मा.श्री.दिप चव्हाण :- आम्हाला आकडेवारी दिलेली नाही. बँक गॅरंटी कशा आधारे दिली. हा विषय सेप्रेट पुढच्या मिटींगला ठेवा भविष्य निर्वाह निधीचे तुम्ही काय केला.

मा.उपायुक्त (सा.) श्री. बेहेरे :- वार्षिक लेखे, वार्षिक लेख्यांचा गोषवारा व मत्ता- दायित्वे सन २०१२-२०१३ चे ऑडीट २०११-२०१२ चे हा विषय स्थगित ठेवा.

मा.श्री.दिप चव्हाण :- तुम्हा ATR आमच्या समोर ठेवणार ना. प्रत्येक प्यारे वाईज वाचन करा. कर्मचा-याच्या पैशाच व्याजाच काय, तुम्ही तुमच्या संस्थेच्या व्याजाच पाहता. साडे पाच कोटी रूपये एफ.डी. आहे ना तुमची आर्थिक परिस्थिती तुम्ही कर्मचा-यांच्या पैशाशी कंपेयर करू नका.

मा.श्री.संपत बारस्कर :- ऑफिस रिपोर्टानुसार मंजूर करावा. मा.महानगरपालिका सभे पुढे मंजुरीकरीता सादर करण्यांत यावे.

मा.श्री. अजिंक्य बोरकर :- ऑफिस रिपोर्टास मंजूरी दयावी व मा.महानगरपालिका सभे पुढे मंजुरीकरीता सादर करण्यांत यावे.

मा.सभापती साहेब :- ऑफिस रिपोर्ट व सभागृहात झालेल्या चर्चेनुसार सर्वानुमते मंजूर करण्यात यावा.अखेर मंजुरीसाठी मा. महानगरपालिका सभेकडेस सादर करण्यांत यावे.

**ठराव:-** ऑफिस रिपोर्टानुसार सभागृहात झालेल्या चर्चेनुसार मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०६(३) अन्वये अहमदनगर महानगरपालिकेचे सन २०१२-२०१३ चे बाबवार जमा- खर्चाचे वार्षिक लेखे, वार्षिक लेख्यांचा गोषवारा व मत्ता- दायित्वे तसेच मुख्य लेखापरिक्षकांचा सन २०१२-२०१३ चा अहवाल व स्थानिक निधी लेखापरिक्षा सन २०११-२०१२ चा लेखापरिक्षा अहवालबाबतच्या ऑफिस रिपोर्टास मंजुरी देण्यांत येत आहे. अखेर मंजुरीसाठी लेखा विभागाने मा.महानगरपालिका सभेकडेस सादर करावे.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- मा.श्री. संपत बारस्कर सही /-

अनुमोदक :- मा.श्री. अजिंक्य बोरकर सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा. स्थायी समिती सभा क्रमांक- ८**

विषय क्रमांक- ९५ बुधवार दि.१०/०९/२०१४

ठराव क्रमांक- ९५ बुधवार दि.१०/०९/२०१४

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियान योजने अंतर्गत अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील मार्केट यार्ड चौक, चांदणी चौक, जुनी महानगरपालिका चौक , काटनेटीक चौक, राज चेंबर चौक, अप्पु हत्ती चौक येथे ट्रॅफिक सिग्नल बसविणेकामी मागविण्यांत आलेल्या कमीचे निविदा दरास मंजुरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-** अहमदनगर महानगरपालिका विदयुत विभाग

मा. फेरसादर,

मा. मुख्य लेखा परिक्षक यांनी उपस्थित केलेले १ ते १० मुद्याच्या अनुषंगाने खुलासा खालील प्रमाणे..

१] मा. शहर अभियंता यांचा दि. १/३/२०१४ चा अभिप्राय १९९६-९७ ते २०१३-२०१४ दरम्यान दर सुची (Traffic Dept.) उपलब्ध करून त्या अनुषंगिक दराबाबत तुलना करणे संयुक्तीक तसेच दि.०१/०८/२०१४ चे मा.आयुक्त यांच्या शेरा औरंगाबाद व पुणे मनपाकडून अशा प्रकारची माहिती / दर उपलब्ध करून घ्यावेत. त्यानुसार अहवाल खालील प्रमाणे..

मा. अतिरिक्त शहर अभियंता, विदयुत विभाग पुणे मनपा यांना इकडील जा.क्र.१०२४ दि.७/८/२०१४ व मा. शहर अभियंता औरंगाबाद मनपा यांचे इकडील जा.क्र.९९४ दि.२/८/२०१४ अन्वये तुलना करणे बाबतचे मार्गदर्शन किंवा त्याबाबतची दरसूची उपलब्ध असल्यास इकडेस कळवावे. त्यानुसार प्रतिनिधी पाठवून समक्ष चर्चा केली असता Tratic somged बाबतची दरसुची उपलब्ध नसून तुलना करणेकामी बाजार भावाप्रमाणे करून कार्यवाही केली जाते. परंतू लेखी उत्तर अप्राप्त.

दरम्यान बाजार भावाप्रमाणे दराचे कोटेशन मागविणेची रिपोर्टवर मा.आयुक्त यांची दि.०१/०८/२०१४ नुसार मान्यता घेवून दर मागविले असता तुलनात्मक तक्ता पाहाता कमी दर न्युक्लेओनिक्स लि. पुणे यांचे आहे व निविदा दरांशी तुलना करता सुमारे ४२% जादा आहे व ई- निविदा क्र.६९६ चे न्युनतम ठेकेदार मे. प्रभंजन इले., अ. नगर यांचा छाननी समितीस वाटाघाटीअंती मान्य केलेला दर ४०% आहे व सदरचा दर कमीत कमी बाजार दरापेक्षा कमी आहे.

२] सुधारित देकार म्हणजे निविदा दर छाननी समितीमध्ये वाटाघाटी मध्ये कमी केल्यानंतर येणारा दर व १९९६ नंतर आजतागायत दरसूची उपलब्ध नाही. याबाबत मा. कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, (विद्युत) अहमदनगर यांचेकडेस इकडील पत्र जा.क्र. १२८ दि.१६/०७/२०१४ अन्वये पाठविले असता त्यांनी त्यांचेकडील पत्र जा.क्र./काअविना / लेखा १/८२६/२०१४ दि.१७/७/२०१४ अन्वये सदर विभागाकडे ट्राफिक डिपार्टमेंटची दरसुची उपलब्ध नाही. असे कळविले आहे सोबत सदर पत्र जोडले आहे.

३] इतिवृत्तावर उपस्थित सदस्य व प्र.उपायुक्त (सा.)तथा सभापती,मा.छाननी समिती यांचे स्वाक्षरी घेतलेली आहे.

४] मा.आयुक्त यांचा दि. ०१/८/२०१४ ची मान्यता घेवून बाजार दराचे कोटेशन मागवून न्युनतम दराची तुलना करून दर निश्चित केला.

५] मा.शासन निर्णय दिनांक २७/०८/२००९ नुसार प्रशासकीय मान्यता असून ५०% निधी व उर्वरित मनपा निधी असे नियोजन आहे. मनपाचे मंजूर बजेट रजिस्टर मधील पान नं.११३ अ.क्र.११३ अ.क्र.२९ अन्वये १७५२.४४ लक्ष प्राप्त व पान नं.११९ अ.क्र.२६ अन्वये मनपा हिस्सा १०० लक्ष अशी तरतूद उपलब्ध आहे. व सदर तरतूद प्रशासकीय मान्यता प्राप्त सर्व निविदांना लागु आहे.

६] वरील प्रमाणे शासन निर्णय व दि.३१/०३/२०११ व दि.२६/०३/२०१३ चे मा. शासनाचे प्राप्त पत्रानुसार निधी उपलब्ध आहे.

७] तांत्रिक मान्यता पी. डब्ल्यु. डी. नं.३१५ दि.१६/१/२०१४ अन्वये दिलेली आहे व सोबत जोडली आहे.

८] मूळ डी.पी.आर. ला सर्व उपलब्ध आहे.

९] मा.शासन निर्णय अन्वये एकूण २३ कामांना रक्कम रू.७०.०९८१ कोटीस मंजूरी प्राप्त आहे. व त्यातील अ.क्र.१५ वर हे काम मंजूर आहे.

१०]मूळ १निविदा अधिक ९फेर ई-निविदा असे मिळून एकूण १०व्या वेळेस निविदा मागवून प्रतिसाद मिळालेला नाही.फक्त ९ व्या फेर निविदेस दोन वेळा मुदतवाढ देवून दोन निविदा प्राप्त असलेने नियमानुसार योग्य तसेच वाहतुक सुरक्षा समिती, मा.जिल्हाधिकारी, पालकमंत्री, सामाजिक संस्था इत्यादी सदर कामाबद्दल वारंवार मागणी करीत असलेने व प्रत्यक्षात सदर कामाची वाहतुक नियोजनाकरीता काम करणे अत्यावश्यक आहे.

तसेच मा.अतिरिक्त शहर अभियंता, विदयुत विभाग पुणे मनपा यांना इकडील जा.क्र. १०२४ दि.७/८/२०१४ व मा. शहर अभियंता औरंगाबाद मनपा यांचे इकडील जा.क्र.९९४ दि.२/८/२०१४ अन्वये तुलना करणे बाबतचे मार्गदर्शन किंवा त्याबाबतची दरसूची उपलब्ध असल्यास इकडेस कळवावे. त्यानुसार प्रतिनिधी पाठवून समक्ष चर्चा केली असता Tratic somged बाबतची दरसुची उपलब्ध नसून तुलना करणेकामी बाजार भावाप्रमाणे करून कार्यवाही केली जाते. परंतु लेखी उत्तर अप्राप्त.

दरम्यान बाजार भावाप्रमाणे दराचे कोटेशन मागविणेच्या मा.आयुक्त यांच्या दि.०१/०८/२०१४ आदेशानुसार दर मागविले असता तुलनात्मक तक्ता पाहाता कमी दर न्युक्लेओनिक्स लि. पुणे यांचे आहे. व निविदा दरांशी तुलना करता सुमारे ४२% जादा आहे व सदर दरास मा.आयुक्त यांनी दि.२५/८/२०१४ रोजी मान्यता दिलेली आहे. ई- निविदा क्र.६९६ चे न्युनतम ठेकेदार मे. प्रभंजन इले., अ.नगर यंचा छाननी समितीस वाटाघाटीअंती मान्य केलेला दर ४०% आहे. त्यामुळे फेर ई- निविदा न करता तुलनात्मक दृष्टया कमी दराची निविदा मे. प्रभंजन इलेक्ट्रीकल यांची निविदा निविदा दरापेक्षा ४०%जादा दराने मान्य करणेस सदरची निविदा मंजुरीस्तव तथा मा.स्थायी समितीसमोर निर्णयास्तव पाठविणेस सविनय सादर./**अ**

येणेप्रमाणे विदयुत विभाग प्रमुख , कनिष्ठ अभियंता यांचा अहवाल असे.

यावर मा. शहर अभियंता यांचा अभिप्राय की, अहवालानुसार निविदा दराच्या दराबाबत निर्णयास्तव प्रस्ताव मा. स्थायी समिती समोर सादर करणे योग्य.

यावर मुख्यलेखापरिक्षक यांचा अभिप्राय की, विभागाचे प्रस्तावीतानुसार कार्यवाही करणेस हरकत नाही.

यावर मा.उपायुक्त साहेब यांचा अभिप्राय की, विभागाने प्रस्तावीत केलेनुसार **"अ"** प्रमाणे प्रस्तावास मंजूरीस्तव मे.स्थायी समिती सभेत सादर करणे आवश्यक आहे मे. आदेशार्थ स. सादर.

यावर मा.आयुक्त साहेब यांचा सहमती दर्शक सही

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--**--

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियान योजने अंतर्गत अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील मार्केट यार्ड चौक, चांदणी चौक, जुनी महानगरपालिका चौक , काटनेटीक चौक, राज चेंबर चौक, अप्पु हत्ती चौक येथे ट्रॅफिक सिग्नल बसविणे प्रस्ताव विषयी आहे.

मा.श्री. दिप चव्हाण :- :- विदयुत प्रमुख श्री. सावळे नगरोत्थान संदर्भात पहिले काय आहे.

विदयुत विभाग प्रमुख श्री. सावळे :- L.A.D. सिस्टीम, पहिल्यांदा सिग्नल करतो.

मा.श्री. सचिन जाधव :- पहिले बसवलेले सिग्नल चालू आहे का ?

मा.सभापती साहेब :- आधीचे सिग्नल काढणार का ?

विदयुत विभाग प्रमुख श्री. सावळे :- नाही. जुन्या सिग्नल ची यंत्रणा जुनी झाली आहे ती चालू होत नाही

मा.श्री.अजिंक्य बोरकर :- सिग्नल लाचे वेग मर्यादा वगैरे आहे का ?

विदयुत विभाग प्रमुख श्री. सावळे :- पुण्यासारखी जी CCTV व RTO ला मेसेज जाणे ही फार नवीन सिस्टीम आहे.

मा.सभापती साहेब :- याला मान्यता दयायची का ?

मा.श्री. सचिन जाधव :- त्याला समक्ष बोलवा का ?

मा.उपायुक्त (कर) श्री. बेहेरे :- माहिती घेतली आहे सन ९६-९७ सालचे आहे.

मा.श्री. सचिन जाधव :- कोणत्या कंपनीचे बसवणार ते आम्हाला सांगा.

विदयुत विभाग प्रमुख श्री. सावळे :- एस्टीमेंट नुसार बसवणार.

मा.उपायुक्त (सा.) श्री. चारठणकर :- तीन शहरात अशा प्रकारचे काम करण्याचा अनुभव आला. मार्केट रेट कंपेअर करून घेन त्याची मंजूरी बांधकाम विभागाकडून घ्यावी लागते. साधारणपणे सिग्नल बसवत असताना नगरोत्थानची जी प्रोव्हीजन आहे. त्यानुसार ही निविदा मागीतली CMS नावाची कंपनी आहे. दुसरी न्युक्लेओनीक्स दुसरी एक कंपनी आहे ती महाराष्ट्रात काम करत नाही.

मा.उपायुक्त (कर) श्री. बेहेरे :- एस्टीमेंट बघून घ्या.

विदयुत विभाग प्रमुख श्री. सावळे :- रू. ३८ लाख ५० हजार ६ सिग्नल

मा.श्री. दिप चव्हाण :- ट्रॅफीक पोलीस जे पावत्या फाडतात ना ते याची पावतीचे पैसे महानगरपालिकेत दयावे ते ॲटोमॅटीक आहे.

मा.श्री. सचिन जाधव :- किती वर्षाचा मेंटनस आहे.

मा.सभापती साहेब :- दोन वर्षाचा

मा.श्री. फैयाज शेख :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.श्री. अजिंक्य बोरकर :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.सभापती साहेबः-ऑफिस रिपोर्टानुसार सर्वानुमते मंजूर करण्यात यावा.ट्रॅफीक सिग्नलचा मेन्टेनन्स महानगरपालिका करीत असल्याने सिग्नल मोडणा-यांकडून वसूल केल्या जाणा-या दंडापोटीची रक्कम महानगरपालिकेकडे जमा करण्यात यावी याकरीता आवश्यक त्या स्तरावर पत्र व्यवहार करण्यात यावा.

**ठराव :-** अहमदनगर महानगरपालिकेचे महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियान योजने अंतर्गत अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील मार्केट यार्ड चौक, चांदणी चौक, जुनी महानगरपालिका चौक , कायनेटीक चौक, राज चेंबर चौक, अप्पु हत्ती चौक येथे ट्रॅफिक सिग्नल बसविणेकामी मागविण्यांत आलेल्या ई- निविदा क्र.६९६ चे न्युनतम ठेकेदार मे. प्रभंजन इले., अ.नगर यांचा छानननी समितीस वाटाघाटीअंती मान्य केलेला दर ४०% आहे. त्यामुळे फेर ई- निविदा न करता तुलनात्मक दृष्टया कमी दराची मे. प्रभंजन इलेक्ट्रीकल यांची निविदा, निविदा दरापेक्षा ४०%जादा दराने मान्य करणेच्या ऑफीस रिपोर्टला ही सभा मान्यता देत आहे. ट्रॅफीक सिग्नलचा मेन्टेनन्स महानगरपालिका करीत असल्याने सिग्नल मोडणा-यांकडून वसूल केल्या जाणा-या दंडापोटीची रक्कम महानगरपालिकेकडे जमा करण्यात यावी या करीता आवश्यक त्या स्तरावर पत्र व्यवहार करण्यात यावा.ऑफिस रिपोर्ट मंजूर, खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- मा.श्री. फैयाज शेख सही /-

अनुमोदक :- मा.श्री. अजिंक्य बोरकर सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका